ग्रं. सं. ठाणे

…य

…स क्रमांक

लेखक [illegible]

पुस्तकाचें नांव [illegible]

सन

११८

# उद्यांवरची गोष्ट.

एक स्ववृत्त-कथनात्मक बोधपर गोष्ट.

कर्त्ता

खंडेराव भिकाजी बेलसरे.

प्रकाशक

के. सी. कुळकरणी आणि मंडळी.

( हक्क स्वाधीन. )

मुंबई-सरस्वती छा० छापली.

किंमत रु. ॥।.

रा. वेलसरे-कृत पुस्तकांची यादी.

# १ तीन गोष्टी.

किंमत आणे ।. ट. ख. ८॥

यांत, १ संसारांत मुख्य प्रेम. २ गुणवती स्त्री. आणि ३ खरें प्रेम. अशा तीन गोष्टी आहेत. यांतील प्रत्येक गोष्ट मासलेवाईक आहे. 'खरें प्रेम' ही गोट वाचून तर रा. टिळक यांच्यावरील सरकारी खटल्याचें व बेबंद लिटनशाहीचें यथातथ स्वरूप लक्षांत येऊन, सात वर्षांपूर्वींच ९७ सालांतील टिळकांच्या स्थितीचें भविष्य वर्तवून ठेवलें होतें कीं काय असा भास होतो ! सुबोध, चटकदार व विशेषेंकरून स्त्रियांनींही अवश्य वाचण्यालायक हें पुस्तक आहे. हें वाचल्यानें द्वाष्ट स्त्रियांस विनयसदयतादि गुण प्राप्त होतील, व पुरुषांस स्त्रियांच्या आंगचे गुण व त्यांची संसारांत योग्यता कळून येऊन, ते आपापल्या अर्धांगीस चांगल्या रीतीनें वागवूं लागतील हें खास आहे. विविधज्ञानविस्तार मासिक पुस्तककारांनीं छापिलें आहे.

# २ विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचें चरित्र.

कोरीव तसबिरीसहित पृष्ठें १५० किं. आणे ।।- ट ८॥

या अलौकिक देशाभिमानी निबंधकाराचें नाव माहीत नाहीं असा मराठी वाचक कोण आहे? या चरित्रांत देशाभिमान ओतप्रोत भरला आहे. मराठी पुस्तकांच्या भोक्त्यांनीं याचा आस्वाद घेतल्यावांचून राहूंच नये. खरा देशाभिमान, स्वभाषाभिमान व स्वाभिमान त्यांच्या अंगीं या चरित्राच्या वाचनानें अवश्य बाणेल अशी यांतील लिहिण्याची ढब आहे. यांत चरित्राचा भाग रसभरित वर्णिला असून शास्त्रीबुवांच्या मतांचें व लेखनशैलीचेंही स्वरूप दाखविलें आहे.

पत्ता--के. सी. कुळकरणी आणि मंडळी

काळकादेवीचा रस्ता, मुंबई.

# समर्पण

## कै० श्रीमंत शेठ हरिश्चंद्र वासुदेवजी

### यांस.

काय सांगावें !-सन १८९७ सालाच्या आरंभींच मुंबई शहरीं साथीच्या महाराज रोगानें कहर उसळून दिला असतां, गरीबांची तर गोष्टच नको, परंतु मोठमोठ्या गर्भश्रीमंतांवर व चांगल्या विद्वान आणि प्रतिष्ठित गृहस्थांवरही केवढा प्रसंग ओढवला व त्यांची कोण तारांबळ उडाली, यांची माहिती सर्वांसही आहे. अशा अडचणींत सांपडून पनवेल मुक्कामीं मी सुखवस्तु रहावयास गेलों असतां व नीचबुद्धि दुष्ट अधिकाऱ्यांच्या हातें नाडलों असतां, कै. श्री० हरिश्चंद्रजींचा प्रथमच परिचय झाला व त्यांच्या सुखकर समागमामध्यें मोठें समाधान प्राप्त झालें; याची आठवण दीर्घकाळ रहावी, या हेतूनें हें पुस्तक त्यांस सन्मानपूर्वक समर्पण केलें आहे. पुस्तक छापत असतांच समर्पणाचा स्वीकार कै. श्री० हरिश्चंद्रजींनीं करण्याचें कबूल केलें होतें. परंतु मध्यंतरी निर्दय मृत्यूनें त्यांच्यावर झडप घातली ही मोठी दुःखाची गोष्ट घडली. प्रस्तुत त्यांच्याच सारखे उदार व थोर त्यांचे चिरंजीव, श्रीमंत शेठ खंडेराव हरिश्चंद्रजी यांनीं पूर्वसंकेताप्रमाणें त्यांच्या पित्याच्या नांवें हें पुस्तक अर्पण करण्यास अनुमति दिली हें त्यांचे मजवर मोठे उपकार होत.

मुंबई, ता. २१ जानेवारी १८९८. } त्यांचा स्नेहांकित
खंडेराव भिकाजी बेलसरे.

MISCELLANEOUS WRITINGS & LETTERS.

## ३-४ विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या किरकोळ लेखांचा संग्रह.

भाग १ व २; दोहोंमिळून किं. रु. २॥ ट. ख. ≈

प्रसिद्ध "निबंधमाले" शिवाय विष्णुशास्त्र्यांचे दुसरे पुष्कळ वाचनीय लेख व त्यांचीं खासगी पत्रें मिळविलीं आहेत. त्यांचा संग्रह या दोन भागांत झाला आहे, तो असा:–१ शालापत्रक. २ ज्ञानप्रकाश (इंग्रजी लेख). ३ सत्यशोधक. ४ केसरी ५ हातचीं पत्रें. ६ प्रस्तावना. ७ सूचि. याप्रमाणें विविध विषय असून विद्यार्थी, बहुश्रुत, सुधारक, देशाभिमानी वगैरे सर्वांसच वाचण्यालायक हे लेख आहेत.

## ५ लार्ड नेल्सन याचें चरित्र.

किं. रु. १ ट. ख. ८–

इंग्लंडांतील ह्या महायोद्ध्याचें हें चरित्र आपल्या लोकांस बोधपर होईल अशा खुबीनें रसाळ भाषेंत लिहिलें आहे. त्यास दक्षिणाप्राइझ कमिटीनें बक्षीस दिलें आहे. तरुण विद्यार्थ्यांनीं अवश्य वाचावें.

## ६ वटसावित्रीचें जुनें गाणें.

किं. आणे ≈ ट. ख. ८॥.

हें गाणें बायकांस प्रत्येक वर्षी वडपुनवेला म्हणावें लागतें. परंतु तें मोठें असल्यामुळें बहुतेकींस स्वतः पाठ होत नाहीं व इतरापासूनच ऐकावें लागतें. वाचणाऱ्या स्त्रियांच्या हातीं हें पुस्तक पडलें असतां, ही नड सहज दूर होईल शुद्ध करून, जुन्या व कठिण शब्दांवर विपुळ टिपा देऊन, हें छापलें आहे.

पत्ता—के. सी. कुळकरणी आणि मंडळी
काळादेवीचा रस्ता, मुंबई.

# सूचना.

**ही** स्ववृत्तकथनात्मक बोधपर गोष्ट एका इंग्रेजी पुस्तकाच्या आधारानें लिहिली आहे. तथापि मूळांतील आशय मात्र घेऊन सर्व रचना आपल्याकडील रीतरिवाजास साजेल अशी केली आहे. या योगानें वर्णिलेली हकीगत विश्वसनीय वाटून ती वाचणाराच्या मनावर चांगली ठसेल व त्यास तिच्यापासून इष्ट बोध सुलभतेनें प्राप्त होईल असें वाटतें. कोणतीही हकीगत संभवनीय असली तर व्यवहारांत तिचा प्रत्यय येतो आणि प्रत्यय आला तर विश्वास बसतो असा नियम आहे. त्यास अनुलक्षून श्रीधरानें म्हटलें आहे--

प्रत्ययसदृश बोलावें वचन
ना तरी अंगास येतें मूर्खपण ।

**शिवलीलामृत. ११.**

**या** पुस्तकांत, हयगईनें कसें नुकसान होतें, हें दाखविलें आहे. याचा अनुभव व्यवहारांत आबालवृद्धांसही आहे, त्यापक्षीं सर्वांच्याच उपयोगी पडण्यासारखें हें पुस्तक आहे. तथापि लहान मुलांस व तरुण विद्यार्थ्यांस त्याचा विशेष उपयोग होईल. यास्तव त्यांच्या हातीं हें पुस्तक पडेल अशी अवश्य तजवीज करण्याविषयीं त्यांच्या सुज्ञ पालकांस व शिक्षकांस शिफारस आहे. हयगईच्या द्वाड खोडीपासून कोणाचेंही मन परावृत्त होण्याला जर हें पुस्तक अंशतः तरी कारण झालें असें मला कळलें, तर माझे हे अल्पश्रम सफळ झाले असें मी मानीन.

हें पुस्तक छापतांना माझे मित्र रा. **दत्तात्रय दिवाकर भट** यांनीं मदत केली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

**कर्त्ता.**

रा. वेलसरे-कृत पुस्तकांची यादी.

# ७ मदालसा व ऋतुध्वज.

किंमत रु. ॥. टपाल ख. ८/

ही एक नवीन तऱ्हेची पौराणिक कादंबरी. (शुद्ध करून दिलेली). सुबोध व चित्तवेधक भाषेत लिहिली आहे. नवीन तऱ्हा, बांधणी सुरेख, आणि ५० सांवर कोरीव चित्रें घातलीं असल्यामुळें, भेटादाखल इष्टमित्रांस बक्षीस देण्यास हें पुस्तक चांगलें आहे.

---

# ८ बिल्हणचरितम्.

किंमत ।/ ट. ख. ८॥

बिल्हण हा मूळचा काश्मीरकवि असून, त्यानें केलेलें 'विक्रमांकदेवचरित' नामें ऐतिहासिक महा काव्य प्रसिद्ध आहे. त्यानेंच आपण आपलें रचलेलें हें चरित्र मोठें रसाळ व शृंगारिक असून, हा एक अद्भुत शृंगाररसाचा उत्कृष्ट चुटका आहे. यांत मुळ संस्कृत व त्याचें मराठींत कविताबद्ध भाषांतर आलें आहे. हें पूर्वीं कोठेंही छापलेलें आढळांत नाहीं.

**पत्ता-के. सी. कुळकरणी आणि मंडळी**

काळकादेवीचा रस्ता, **मुंबई.**

# अनुक्रमणिका.


| प्रकरण | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | बाळाभ्यास .... .... .... .... .... | १ |
| २ | थोरांच्या ओळखी .... .... .... .... | १७ |
| ३ | चीनदेशाची सफर .... .... .... .... | ४३ |
| ४ | चीनच्या प्रवासाचा वृत्तांत .... .... .... | ७१ |
| ५ | बीज तशीं फळें .... .... .... .... | १०० |
| ६ | देवावर हवाला .... .... .... .... | १२५ |
| ७ | सुखदुःखाची परमावधि. .... .... .... | १५७ |
| ८ | कर्त्याचे बोल.... .... .... .... .... | १७७ |

# मुक्ता.

**कर्ते वैद्य शास्त्री मणिशंकर गोविंदजी.**

किं. रु. ४, डेमी अष्टपत्री पृष्ठें ५५० ट. ख. ।=

हा एक उत्कृष्ट अद्भुतकथाग्रंथ आहे. लिहिण्याची ढब प्रौढ व अलंकारिक असून **बाणभट्टाच्या** कादंबरीच्या धरतीवर आहे. वाचून मनन करण्यासारखा ग्रंथ आहे. कागद जाड व घोंटिव; छापणी सुबक; आणखी बांधणी कापडी उंची; सोनेरी अक्षरांसह. मूळ गुजराथीवरून **याचें मराठी भाषांतर रा. खंडेराव भिकाजी वेलसरे यांनीं** केलें आहे.

वाचनेच्छूंस व्ही. पी. नें रु. ४।= ला हा ग्रंथ मिळेल. तथापि आमच्या प्रसिद्ध आतंकनिग्रहादि औषधांपैकीं कोणतींहि रु. ६ चीं औषधें एकाच वेळीं मागविल्यास हें रु. ४ किमतीचें पुस्तक भेटीदाखल दिलें जाईल.

**वैद्यशास्त्री मणिशंकर गोविंदजी.**

कालकादेवीचा रस्ता; मुंबई.

# बाळंतपण.

हें एक संसारोपयोगी, वैद्यकीय माहितीनें भरलेलें पुस्तक, भाषा सुबोध, सरळ व सभ्य, असें आमच्याकडे पोस्ट कार्डवर नांव, गांव वगैरे स्पष्ट लिहून आमच्या खालील पत्त्यावर कळविल्यास, वाचनेच्छूंस पाठविण्यांत येईल. किंमत व पोस्टेज खर्च कांहीं एक पडणार नाहीं.

**वैद्यशास्त्री मणिशंकर गोविंदजी.**

कालकादेवीचा रस्ता, मुंबई.

सं. ग्रं. ८५४

# उद्यांवरची गोष्ट.

## प्रकरण १ लें.

## बाळाभ्यास.

वाईट खोड पडे, ती पावलों पावलीं नडे.

आपली लहानपणापासूनची सारी हकीगत एकदां लिहून काढावी असा माझा कित्येक दिवसांपासून फार हेतु होता. कारण ही हकीगत ज्यांच्या ज्यांच्या वाचण्यांत येईल त्या सर्वांस एका द्वाड खोडीसंबंधें फार चांगला बोध प्राप्त होऊन, त्यांचें निरंतरचें कल्याण होईल असें मला वाटत असे. कांहीं काम करावयाचें असलें तर "करूं उद्यां" असें म्हणून उद्यांवर लोटण्याची मोठी वाईट खोड पुष्कळांस जडलेली असते व मलाही हीच खोड होती. बापाचा माझ्यावर भारी लोभ असल्यामुळें लाडांनीं ही खोड अगदीं लहानपणींच मला लागली आणि क्रमाक्रमानें ती दृढ होत जाऊन एवढी खिळून गेली कीं तिच्या पायीं आजवर अगणित नुकसान होऊन निष्कारण अनेक संकटेंही मला भोगावीं लागलीं. पुढें जी हकीगत मी लिहिणार आहें तींत मुख्यत्वें करून याच गोष्टी येतील व उद्यांवर गोष्ट घालविल्यानें आपले चांगले चांगले उद्देश कसे निरुपयोगी होतात आणि मोठमोठ्या उमे-

दीच्या आशाही कशा आगदीं निष्फळ होऊन धुळीस मिळतात हें वाचकांच्या चांगलें प्रत्ययास येईल.

याप्रमाणें ही गोष्ट मनांत तर आली आणि ती तडीस नेण्याविषयीं पूर्ण निश्चयही होऊन चुकला. तथापि पुष्कळ कालपर्यंत हातानें म्हणण्यासारखें कांहीं एक घडलें नाहीं. अनेक अडचणी मध्यंतरीं येऊन वारंवार उभ्या रहाव्या आणि सगळा मनांतला बेत जागचे जागीं थिजून जावा असा क्रम चालला. या अडचणी तरी नेहमीं असाधारण होत्या असें ही नाहीं. त्यांपैकीं बऱ्याच निव्वळ कल्पितच असून, ज्या कांहीं खऱ्याखुऱ्या असत त्याही थोडासा नेट धरला असता तर टळण्यासारख्या होत्या. खरें म्हटलें तर आजची गोष्ट उद्यांवर ढकलण्याची जी खोड मला लागली होती तिचेंच हेंही एक उदाहरण होय. मला वाटे—"हें काम काय?—आपण वाटेल तेव्हां सहज करूं; हातांत लेखणी धरण्याला काय तो उशीर; एकदा सुरवात केली कीं मग उशीर नाहीं!" अशा घमेंडीवरच एका पाठी मागून एक दिवस निघून गेले. लेखणीची हातांशीं गांठ कांहीं पडली नाहीं, कामाला सुरवात कांहीं झाली नाहीं, व इच्छित हेतु कांहीं तडीस गेला नाहीं. आजवर हें काम आजचें उद्यांवर, उद्यांचें परवांवर, परवांचें तेरवांवर असें पडत जाऊन, मागचें मागेंच राहून गेलें. परंतु आज मात्र माझ्या या द्वाड खोडीचा वीट येऊन, जिवाचा पुरा धडा केला कीं काय व्हायचें असेल तें होवो—आज आपली ही हकीगत लिहावयाला बसावयाचें; कागद, शाई, लेखणी ही त्रिपुटी एके ठिकाणीं मिळवावयाची, आणि एकदा शुभ मुहूर्तावर—नाहीं

नाहीं, आतां मुहूर्त बिहूर्त पाहण्याच्या भानगडींत पडायचें नाहीं, न जणों, न करण्याचा वार शनवार असें व्हायचें; यासाठीं तयारी झाली तोच शुभ मुहूर्त असें मानून या गर्गाचार्यांच्या मुहूर्तावर—आरंभ करावयाचा! आणि ही "**उद्यांवरची गोष्ट**" आजवर आणून पुरी करावयाची !

**मी** अगदीं लहान होतों तेव्हांच मजविषयीं वारंवार असें म्हणत असत कीं माझ्यामध्यें जी काय गोम होती ती ही एकच—कीं अगोदर हा कोणतें ही काम करायचा नाहीं. परंतु एकदा यानें मनावर घेतलें कीं मग याचा हात कोण धरील? याच्यासारखा बुद्धिमान हाच ! आणि मी तरी असेंच समजत होतों कीं माझ्यांत गोम काय ती हीच ! माझ्या घमेंडखोर स्वभावामुळें म्हणा अथवा आळसामुळें म्हणा—मी आणखी असेंही मानीत होतों कीं ही माझी गोम अगदीं क्षुल्लक असून इतकी लक्षांत घेण्यासारखी नाहीं, आणि मी मोठा झालों म्हणजे कदाचित ती आपोआप नाहींशी होईल अथवा अल्पाभ्यासानें मला खचीत काढून टाकतां येईल. खरें म्हटलें तर माझ्या सभोंवतालचे लोक हिला गोम असें सौम्य नांव देत असत इतकेंच, बाकी माझ्या ठिकाणीं ही मोठीच द्वाड खोड होती यांत शंका नाहीं. अद्यापपर्यंत तर ही खोड सुटण्याचा शुभ समय आला नाहीं आणि पुढें ही कधीं काळीं ही समूळीं सुटेल असा विश्वास येत नाहीं. आज मी एवढा वाढलों आहेंना? आणि हिच्या वाईटपणाविषयीं मला एवढी वळवळ वाटत आहेना?— तरी हिच्या कचाटींतून पूर्णपणें सुटण्याची मला बिलकुल आशा नाहीं. मीं आरंभींच सांगतलें आहे कीं माझी ही हकीगत लिहिण्यांत माझा एक मुख्य हेतु असा

आहे कीं पुढच्यास ठेच मागला शाहणा या न्यायानें आपला अनुभव सांगून इतरांस सावध करावें. याशिवाय दुसरा असाही एक हेतु आहे कीं ही द्वाड खोड लागल्याबद्दल मला जो खेद होत आहे तो हलका व्हावा व ती वेळींच काढून टाकण्याचा प्रयत्न मीं केला नाहीं म्हणून जो पश्चात्ताप हृदयांत जळत आहे तो कांहींसा शांत व्हावा आणि आपल्याच पूर्ववृत्तांताचें मनन करण्याची संधि मिळून ही द्वाड खोड सर्वस्वीं न सुटली तरी तिचे कांहीं पेंच कमी करतां आले तर पहावे. इतकें सांगून आतां मी आपल्या हकीगतीस आरंभ करतों.

माझें जन्म पुण्यांत झालें. तरी आमचा मूळचा गांव दक्षिण महाराष्ट्रांत आहे. तेथून माझे वडील गरीबीमुळें लहानपणींच निघून पुण्यास आले होते. तो काळ ह्मणजे अव्वल इंग्रेजीचा. घरची गरीबी तेव्हां माझे वडील पुण्यास आले ते एका अंगवस्त्रानशींच आले. पुढें तेथील पाठशाळेंत कांहीं इंग्रेजी तऱ्हेवर व कांहीं संस्कृताचे धरतीवर थोडा बहुत अभ्यास करून त्यांनीं एका सरकारी खात्यांत लहानशी नोकरी धरली. पोटापाण्याची सोय नसल्यामुळें व दुसऱ्यावर अवलंबून न राहण्याचा बाणा असल्यामुळें, त्यांस लौकर नौकरी धरणें कांहीं अंशीं भागच पडलें. तरी त्यांचा विद्येवर भर फार असे. नोकरी लागून स्वस्थपणा येतांच त्यांनीं आपल्या आईला प्रथम गांवाहून पुण्यास आणलें व लौकरच तिच्या खटपटीनें स्वतांच्या लग्नाचा योग जुळवून आणला. आपल्या कामांतील दक्षतेमुळें माझ्या वडिलांस थोड्या पगारावर फार दिवस कुचंबत बसावें लागलें नाहीं. सुमारें चारपांच वर्षांच्या आंतच त्यांस दरमाहा शंभर

लोहि ५१५

रुपयांपर्यंत बढती झाली. तथापि आमच्या बाबांप्रमाणें, रामभाऊ गोडबोले हा एक गृहस्थ जरी मोठासा सुशिक्षित नव्हता तरी पक्का लबाड होता, तोही आमच्या बाबांचे हपीसांतच नोकर असून त्याची बाबांशीं नेहमीं मोठी चुरस असे. हा गृहस्थ वरिष्ठांशीं लबाड होता तसा आंतूनही खटपटी व लावालावी करणारा होता. यानें हळूहळू साहेबाचें मन वश करून घेऊन आमच्या बाबांविषयीं नाहीं त्या नालस्त्या चालविल्या. अर्थात आमच्या बाबांचें साहेबांशीं पटेनासें होऊन, त्यांस आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला. मग प्रथम त्यांनीं एक इंग्रजी शाळा काढली व पुढें लौकरच एक छापखाना घातला. या वेळेपासून आमचें वास्तव्य स्थाईक पुण्यास झालें म्हणावयाचें.

आपल्या इकडे त्या वेळीं छापखान्याची कला, सुधारणेच्या इतर अंगांबरोबर, नुकतीच कोठें सुरू झाली होती. धंदा नवीन आणि आमच्या बाबांची दक्षता विशेष; यामुळें त्यांस त्यांत चांगली किफायत होऊन प्रतिष्ठितपणानें ही राहतां येऊं लागलें; नौकरी सोडल्याबद्दल यत्किंचितही खेद मानण्यास कारण उरलें नाहीं. विद्येचा स्वतः व्यासंग असल्यामुळें ग्रंथ छापण्याचीं व लिहिण्याचीं अशीं दोनही कामें ते चालवीत असत, त्यामुळें केवळ चार साधारण छापखानेवाल्यांतच त्यांची गणना होत नसून नेहमीं विद्वानांत ते मोडत असत. याप्रमाणें चहोंकडून भरभर होत असतांच माझा जन्म झाला. त्या वेळीं माझे वडील कांहीं एक मोठा ग्रंथ छापण्यासाठीं तयार करण्यांत गुंतले होते असें समजतें. त्या वेळच्या नवीन पंडितांमध्यें संस्कृत ग्रंथ व ग्रंथकार, त्यांतह

विशेषें करून कवि व काव्यें यांच्यासंबंधें वरीच चळवळ सुरू झाली होती. कित्येकांनीं संस्कृत ग्रंथांचा शोध लावून त्यांच्या जीर्णोद्धाराचीं कामें हातीं घेतलीं व कित्येकांनीं त्यांच्या कर्त्यांविषयीं नवीं ऐतिहासिक माहिती गोळा करून प्रगट केली. अशा वेळीं बाबांनीं जो ग्रंथ छापविण्याचें मनांत आणलें होतें त्यांत या सर्व नवीन उपलब्ध माहितींचा व शोधांचा समावेश व्हावयाचा असून, याचें नांव "ऐतिहासिक-महाजन-कथा-कोश" असें होतें. कवि, शास्त्रकार, ग्रंथकार, वीरपुरुष, मुत्सद्दी, शिल्पकार, वगैरे नामांकित महाजनांचे जीवनवृत्तांत व अवांतर माहिती कोशांतल्याप्रमाणें, त्यांच्या नांवाखाली वर्णानुक्रमानें, देण्याची यांत योजना केली असल्यामुळें हे प्रचंड काम मोठ्या मेहनतीचें व शोधकपणाचें होतें व रात्रं दिवस माझे बाबा त्यांतच गढून गेले होते. ज्या दिवशी माझा जन्म झाला—आणि विशेष करून ज्या क्षणीं माझ्या जन्माची खबर त्यांच्या कानीं पडली त्या क्षणीं त्यांचें बो "क" वर्गांतील "**कालीदास**" या सदरावर होतें व कर्म धर्मसंयोगानें, वाचतांना, त्याच्या तोंडांतून पुढील अर्धे वाक्य निघालें—"**कालीदास**, अशेष **भारतवर्षाचा शेक्स्पीयर**, जो कवितावधूचा साक्षात् विलास असून, कविकुलगुरु अशा रूढ संज्ञा पावला आहे, जो रसिक नाटकांचा व महाकाव्यांचा जनिता इ० "

**वरील** बातमी ऐकून माझ्या बाबांस मोठा आनंद झाला असेल यांत कांहीं नवल नाहीं. तथापि माझ्या जन्माची खबर कळावयाला आणि **कालीदास** कवीच्या वृत्तांतांतील वरील वाक्यार्ध वाचावयाला एकच गांठ पडली, या गोष्टीनें त

त्यांच्या मनाला विशेष संतोष वाटला. हा शुभ योग हीच खूणगांठ बांधून ते जसे कांहीं गूढ विचारांतून निश्चयावर आल्याप्रमाणें एकदम ह्मणाले—“ ठीक ठीक ! या महापुरुषाचेंच नांव माझ्या मुलाला ठेवावयाचें. हे प्रभो ! हे सर्वसमर्थ ! परमेश्वर ! माझी एवढीच इच्छा आहे कीं मीं माझ्या ह्यातारपणीं या माझ्या मुलाला नामांकित झालेला पहावें. सत्संकल्पाचा दाता तूंच आहेस, त्यापेक्षां विद्याविनयसंपन्न होऊन, यानें महाकवीची पदवी मिळवावी किंवा तर्कव्याकरणन्यायमीमांसादि शास्त्रांत पारगंत होऊन सर्वमान्य ग्रंथकार व्हावें अशी उत्कृष्ट बुद्धि तूं यास दे अशी मी तुझी अनन्यभावानें प्रार्थना करतों.”

नांव ठेवण्याची वेळ आली तेव्हां माझ्या बाबांनीं सुचविलें कीं मुलाचें नांव कालीदास ठेवावें. त्यावर माझी आजी साकांक्ष मुद्रेनें ह्मणाली—“ काय ? कालीदास ! हें कसलें नांव ? बन्याबा, ( याच नांवानें आमची आजी बाबांस हाक मारीत असे ) तुझें बोलणें कांहीं अकल्पित. असें नांव कुठें ऐकिलें नाहीं.” “ आई ! असें नको ह्मणूं. जुने नवे, आर्य अनार्य अशा सर्व विद्वान लोकांस जें नांव आज प्रिय होऊन बसलें आहे, ज्याच्या उच्चारानेंच उत्तमत्वाचें स्मरण होतें, तें हें नांव या मुलाला काय पण शोभेल ! ” असें म्हणून बाबांनीं आजीची पुष्कळ समजूत केली. मग आजीनें बाबांचा आग्रह जाणून अशी तोड काढली कीं मुलाचा रासनक्षत्रयोग वगैरे पाहून जें नांव येईल तेंच ठेवावें ह्मणजे झालें. जोशीबुवांनीं टिपण तयार केलें तों त्यांतही नांवाचें पहिलें अक्षर “ का ” असावें असेंच आलें. तेव्हां

अर्थातच आजीचें तोंड मिटलें व बाबांच्या इच्छेप्रमाणें माझें नांव "कवीश्वर कालीदास" असें ठेवलें. आजीच्या मात्र मनास हें नांव आलें नाहीं. तिची मुख्य कुरकुर अशी होती कीं कालीदास हें नांव अडनीड असल्यानें हाक मारायला तोंडांत लौकर येत नाहीं. तेव्हां सर्वानुमतें असें ठरलें कीं नांवराशीस आलेलें नांव कालीदास हें तर ठेवावेंच तरी हाक मारणें ती "जगन्नाथ" म्हणून मारावी. बाबा म्हणाले "हें ही नांव ठीक आहे. 'कविराजिराजतिलक' जगन्नाथराय, भामिनीविलास, रसगंगाधर इत्यादिकांचा कर्ता हाही प्रख्यात रसिकवर आहे." या नांवानें मात्र सर्वांचाच संतोष झाला. याप्रमाणें दोन नांवें मला प्राप्त होऊन, या दोहोंचे हे विकार करून दुसरींही कित्येक नांवें आणखी प्रचारांत आलीं. आमचे बाबा व त्यांच्या बरोबरीची मंडळी बहुधा लाडानें मला नुसतें "कवीश्वर" किंवा "कालीदास" अथवा "कवीश्वर कालीदास" असें म्हणत. कागदोपत्रीं मी जगन्नाथ म्हणूनच लिहीत असें. शिवाय घरांत बाहेर "जगु" "जगुभाऊ" "भाऊसाहेब" हीं हीं नांवें रूढ झालीं.

लहानपणची माझी तरतरी व बुद्धि पाहून माझ्या बाबांला पक्कें वाटलें कीं हा मोठेपणीं चांगलें नांव काढील. खरें पुसाल तर माझ्याच वयाच्या इतर मुलांमध्यें व माझ्यामध्यें म्हणण्यासारखा फेर मुळींच नव्हता. परंतु आई-बापांची गोष्ट मुळीं विलक्षण आहे. त्यांस आपलीं मुलें म्हणजे हिरे दिसतात आणि दुसऱ्याचीं मुलें केवळ गार-गोटी. जगांत कोठेंही गेलां तरी हाच प्रकार.

**माझे** शिक्षणाविषयीं लहानपणापासूनच माझ्या बापानें फार काळजी घेतली. सर्वांपाशीं माझे बाबा प्रौढीनें म्हणत कीं अशा मुलाला कालेजांत घालून बी. ए. एम. ए पर्यंत न शिकविणें म्हणजे मूर्खपणाच नव्हे तर पातक करणें आहे. शिक्षण चांगलें व्हावयाला ज्या ज्या गोष्टींची अनुकूळता पाहिजे त्या त्या मिळविण्याला बाबांनीं वास्तविक आपल्या शक्तीबाहेर खर्च केला; व खर्चापक्षांही मेहनत फार घेतली. मी लहान, अज्ञान असतांच मजविषयीं बाबा इतरांशीं जे बोलत त्यावरून माझी दृढ समजूत झाली होती कीं "मी एक मोठा विख्यात मनुष्य होणार आहें." ते वारंवार माझ्या बुद्धीची व स्मरणशक्तीची तारीफ करीत; यांत त्यांचा हेतु असा कीं पोराला अभ्यास करण्याला उमेद यावी. आरंभीं आरंभीं माझे शाळेंतले मास्तरही मजवर खूष असत व माझ्या बुद्धीची खरी किंवा खोटी स्तुतिच करीत. परंतु हा क्रम असाच चालतां चलतां अखेर मी पोंचट मात्र होत चाललों. शिकण्याची सर्व प्रकारें अनुकूळता असल्यामुळें माझे धडे मला भराभर करतां येत व इतरांपेक्षां मी अंमळ हुशार दिसें इतकेंच. तरी यामुळें धडे भराभर पाठ करून टाकावे तें न टाकतां मीं नेहमी म्हणावें—"अं: त्यांत काय आहे? हें मी आतां करून टाकीन." असें म्हणून अगदीं शेवटच्या घटकेपर्यंत पाठ तयार करण्याला बसूंच नये. शाळेंत जाण्याची अगदीं वेळ झाली म्हणजे कसें तरी करून पुस्तकांची मिळवामिळव करावी व टप्फ करून शाळेंत जावें. मग बरोबर उत्तरें कुठून येतील? तीं न आलीं म्हणजे मीं कांहीं तरी सबब सांगून, "वेळ मिळता तर केव्हांच करून टाकले असते" असें म्हणावें.

अशा रीतीनें माझ्या ठिकाणीं आळस आणि त्याबरोबरच घमेंड हीं वाढत जाऊन, अंतीं तींच माझ्या नामोशीस कारण झालीं.

मूळची माझी बुद्धि कांहीं अगदीं वाईट नव्हती. तरी शाळेंत मला जे सोबती मिळाले ते बहुधा खेळाडू, आळशी व उनाड असेच मिळाले. अथवा असेंच कां म्हणूं नये कीं जे असे होते त्यांच्याशींच माझी सोबती जमली. कसेंही असो; मला आळसाची चट लागली व माझ्या बुद्धीचें तेज मंदावलें. शाळेंत मला मार बसूं लागला व पंतोजीही हळुहळू नाखुष झाले. मला समजूं लागल्यावर कदाचित माझी सुधारणा मी केली असती परंतु,बाबा माझी जी वाखाणणी करीत तिच्या ऐटींत मी शेवटपर्यंत राहिलों व आपल्या दोषांकडे माझें अगदीं दुर्लक्ष झालें. सुटीमध्यें मी घरीं असलों कीं शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं, इष्ट मित्रांशीं बाबा माझी फार प्रशंसा करीत. आणि माझ्या गुरुजीकडून, मी अभ्यास करीत नाहीं, आळस करतो वगैरे तक्रारी लिहून येत तेव्हां जरी ते मला दूषण देण्याचा आव घालीत व समयविशेषीं फडाफड शिव्याही देत, तरी लगेच कोणी स्नेही बसायला आला कीं त्यापाशीं मोठ्या भरांत येऊन त्याचें व्याख्यान चाले कीं "पहा ना, हाच आमचा कवीश्वर कालीदास ! कांहीं विलक्षण मूर्ति आहे ! जें मनांत आणील तें करील. त्याच्या एकंदर शिक्षकांचें म्हणणें हेंच. परंतु बाळ्या पक्का आळशी, जसा कांहीं गाढवाचा काका ! बाकी बुद्धिमान मनुष्यें अशींच असतात म्हणा. हातीं धरलेलें काम करील सुरेख, पण तें झटपट व्हायचें नाहीं. अगोदर अगदीं शेवटच्या घटकेला हातीं

 सं. का ५९८४

ध्यावयाचें. बाकी समजलां कां?—बहुधा सर्व बुद्धिमानांची हीच तऱ्हा. फार कशाला?—आमचे ते गोपाळराव मोठे प्रशंसनीय कवि आहेत—ज्यांच्या स्फुट कवितांचें पुस्तक नुकतेंच आम्हीं छापून काढलें आहे ते. कोण आळशी! परंतु हल्लीं त्यांनीं सर्व महाराष्ट्रांत कोण गडबड उडवून दिली आहे म्हणतां! त्यांची तरी रीत हीच—जें तें उद्यां.—निव्वळ आमच्या कवीश्वरासारखेच! नमस्कार असो त्या उद्याला! जें कांहीं करणें तें आयत्या वेळेस. तहान लागली कीं विहीर खणायला सुरवात! एवढें खरें कीं आयत्या वेळीं तर आयत्या वेळीं, पण काम करें चोख कीं तसें सगळ्या महाराष्ट्रांत नाहीं करणारा मिळायचा. परंतु बुवांची लहर लागली तर! सारखें नेटानें काम कधीं व्हायचेंच नाहीं. छेछे, त्यांचें नांव नाहीं. त्यांचें असें म्हणणें येतें कीं आम्हीं मानेवर खडा ठेवून काम करूं लागलों तर आम्ही आमचा मेंदु खचीत बिघडवून घेऊं व वेडयांहून वेडे बनूं! पहा, यांचा डौल तर पहा! पण एवढें खरें कीं जरा तरी आळशी नाहीं असा बुद्धिमंत मनुष्य माझ्या तरी पाहण्यांत नाहीं."

बाबांचीं अशीं भाषणें ऐकण्याला माझे कान कसे सर्वदा तिखट असत. त्यांतला शब्दनी शब्द आणि अक्षरनी अक्षर माझ्या ध्यानांत राहत असे. या स्तुतीनें माझे कान भरून गेले आणि मी असेंच मानूं लागलों कीं बुद्धिमत्ता आणि आळस ही जोडी एकेच ठिकाणीं नांदायची—जो बुद्धिमान तो आपला आळशी असायचाच. माझे गुरूंनीं माझी ही समजूत मोडून काढण्याचा हवा तेवढा यत्न करावा आणि मीं तर असें मानण्यांतच भूषण मानावें. माझ्या या मूर्खपणाचा मला कधीं

खेद तर झाला नाहींच, पण तो उलटा वाढतच चालला. असें करतां करतां असा समय आला कीं त्या वेळीं मात्र माझे डोळे चांगले उघडले. मी हाय स्कुलांत शिकत होतों, उन्हाळ्याची सुटी जवळ आली होती आणि ती व्हायच्या अगोदर जी 'टरमिनल' परीक्षा होते तिच्या बरोबरच अभ्यासाच्या विषयांशिवाय एक स्वतंत्र निबंध लिहून घेण्याची रीत होती. निबंधाचा विषय दोन महिने अगाऊ जाहिर करण्यांत येत असे. सर्वांनीं आपापले निबंध घराहून तयार करून परीक्षेच्या शेवटले दिवशीं गुरूपाशीं द्यावयाचे व ज्याचा निबंध सर्वांत उत्तम ठरेल त्याला सुंदरसें घड्याळ इनाम मिळावयाचें असें या वर्षीं ठरलें होतें. हा निबंध चांगली मेहनत घेऊन लिहिण्याविषयीं मला बाबांनीं बजावून सांगितलें होतें. त्यांची खात्री होतीच कीं हें इनाम नेमकें मला मिळावयाचेंच. मींही उमेदीनें उत्तम निबंध लिहिण्याचा निश्चय केला. त्यासाठीं सर्व सामग्री मिळाविली आणि एकदा सुरवात तर केली. परंतु पुढें, आज लिहूं, उद्यां लिहूं, असें करतां करतां दोन महिने केव्हांच निघून गेले; आणि निबंध नेऊन देण्याचा दिवस येऊन ठेपला तरी आमचा निबंध पुरा होतोच आहे ! अखेर निबंध पुरा झाला नाहीं आणि तो वेळेवर कांहीं देतां आला नाहीं. मग जेवढा लिहिला होता तेवढाच घेऊन आमची स्वारी शाळेंत गेली. तो ज्यांनीं ज्यांनीं पाहिला त्यांनीं त्यांनीं त्याची तारीफच केली. ते ह्मणूं लागले—"याची लिहिण्याची ढब तर मोठी नामी आहे. विचार प्रौढ आणि वर्णनें कशीं रेखल्यासारखीं. संस्कृत, मराठी, इंग्रेजी पद्यांचीं अवतरणें निवडक आणि दृष्टांत व उदाहरणें अगदीं समयो-

चित." एकंदरीनें निबंध फार मनोरंजक व वाचण्यालायक झाला असता. पण करतां काय?–अपुरा! मग इनाम कसें मिळणार? तें मग खंडोबाचे वांट्यास आलें. खंडोबा कसला?–लोखंडोबाच तो; बोजड बुद्धीचा–पक्का ढ. त्याचा गुण काय तो एकच–मेहनती व नेमका. त्याचा फायदा त्याला असा मिळाला. आणि आमच्या आळसट हुशारीचा आम्हाला फायदा मिळाला, तो कोणता?–तर, हातचें इनाम जाऊन कोरडी स्तुति व पोकळ घमेंड यांची रेलचेल!

परीक्षेनंतर बक्षिसें वाटण्याचा समारंभ झाला. शहरामध्यें समारंभाची मोठी धामधूम उडाली. अध्यक्षस्थानीं गव्हर्नर साहेब स्वतः विराजमान व्हावयाचे असून पास झालेल्या विद्यार्थ्यांस त्यांच्या हातें इनामें मिळावयाचीं म्हणून प्रसिद्ध झालें. आणि लोक असेंही म्हणूं लागले कीं, पास झालेल्या विद्यार्थ्यांवर त्यांची कृपादृष्टि राहून, नोकरीलायक इसम या विद्यार्थ्यांमधूनच निवडून घेतले जातील. या गोष्टीमुळें तर सर्व विद्यार्थी मंडळींत चवळवळ सुरू होऊन, बक्षीस-समारंभाचा दिवस केव्हां येतो व त्या वेळीं काय काय घडतें याविषयीं प्रत्येकास मोठी उत्कंठा उत्पन्न झाली. शहरामध्यें याच संबंधाच्या गोष्टी जेथें तेथें निघूं लागल्या. मला निबंधाचें किंवा परीक्षेंत पास झाल्याचें एकही बक्षीस मिळालें नाहीं. कारण निबंध छानदार लिहावयाचा म्हणून मीं परीक्षेच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊं दिलें; यामुळें अभ्यास तर नीट झाला नाहींच; परंतु अखेरीस निबंधही पुरा झाला नाहीं. अर्थात मीं हें बक्षीस घालविलें आणि तेंही घालविलें! सर्वांस मोठा आनंद झालेला दिसत होता. पण मला कसला आनंद?

माझ्या बाबांस तर अतोनात वाईट वाटलें—मोठें दुःख झालें. पहिल्या नंबरचेंच बक्षीस मला मिळेल म्हणून त्यांस मोठी आशा होती; पण कोणतेंच बक्षीस माझ्या वांट्यास आलें नाहीं, यामुळें त्यांच्या मनाचा अगदीं हिरमोड झाला. व्यर्थ याची प्रशंसा करून, असें ते म्हणूं लागले. मीं याला फुकट बिघडविलें मात्र असें वाटून त्यांस भारी पस्तावा झाला. मग मला ताळ्यावर आणण्यासाठीं त्यांनीं पुष्कळ खटाटोप मांडली. रोजच्या रोज मला उपदेश करावा कीं, " बाबारे, आळस सोडून दे, आळसाच्या पायीं व्यर्थ नाश करून घेशील बरें. " हा उपदेश त्यांनीं हवा तेव्हां—वेळीं अवेळीं—प्रसंग असो, नसो—एकसारखा करीत असावें. त्याचा मला सहजच भारी कंटाळा येई.

**मग**, मला सुधारावें म्हणून त्यांनीं एक युक्ति काढिली. " पद्यरत्नमाला " म्हणून नुकतेंच एक पुस्तक एका आधुनिक कविनें रचलेलें प्रसिद्ध झालें होतें. हल्लीं त्याचें नांवही कोठें निघत नाहीं. तरी त्या वेळीं त्याची लोकांत बरीच प्रशंसा चालली होती. बाबानीं त्यांतून " आळस, " " वेळाची किंमत. " " कार्यतत्परता, " " आजची वेळ " " उद्यांची तारांबळ, " इत्यादि विषयांचीं नांवें अनुक्रमणिकेंत धुंडाळून धुंडाळून, फूलस्क्यापचे सात आठ ताव भरतील एवढीं पद्यें निवडून काढिलीं व माझ्या हातीं दिलीं. ते म्हणाले:—

" **घ्या** तुम्ही आतां, आमचे कवीश्वर ! घ्या पाहूं, हें तुमच्या आळसावर वस्ताद औषध ! आतां जन्मभर पाहावयाला नको. हीं पद्यें चांगलीं पाठ करून ध्यानांत

ठेवा वरें. आठ दिवसांच्या आंत जर हीं पद्यें पाठ झालीं तर आठ आणे खाऊला मिळतील, समजलां का ? ”

आठ आण्यांच्या आशेनें मीं तीं पद्यें तावडतोब पाठ केलीं. चार चहूंकडून गोळा केलेलीं तीं पद्यें; मला तीं मुळींच आवडत नसत. त्यांतलीं पदें, साक्या वगैरे तर मला नीट म्हणतांनाही येत नसत. मग तशींच कशीं तरी, कष्टानें हेल ओढीत ओढीत, तीं मी घोटीत बसलों, तेव्हां एकदाचीं तीं पक्कीं डोक्यांत बसलीं. त्यानंतर शिकलेल्या दुसऱ्या शेंकडों गोष्टी आजला पार विसरूनही गेल्या, तरी या कविता विसरल्या नाहींत;अझून चांगल्या, काल पाठ केल्याप्रमाणें, आठवतात. त्यांचा कांहीं मासला माझ्या वाचणारांसाठीं एथें दाखविला असता, परंतु वर सांगितलेंच आहे कीं, माझ्या मतानें त्या अगदीं नीरस आहेत म्हणून; यास्तव त्या वाचावयास लावून वाचकांस विनाकारण भागवीत नाहीं.

एवढ्या कविता पाठ केल्या आणि स्वतः बाबांच्या उपदेशाची टुमणी सुरू झाली, म्हणून त्यांचा कांहीं उपयोग झाला किं काय ? छिः कांहीं नाहीं. कारण “आळस वाईट,” “ आळसानें नाश होतो,” “ वेळचे वेळीं जपल्यानें फायदा होतो ” या गोष्टी कोणीं मला सांगावयास पाहिजे होत्या असें नाहीं, याविषयीं माझी खात्री झालेली होती; ती पुनः करून देण्याची एवढी आवश्यकता नव्हती. खरें म्हटलें तर, आपलें मूर्खपण कसें सुधारावें व तें सुधारण्याचा दृढ निश्चय कसा करावा याच गोष्टीची मूळ मला कमतरता होती. जी मूर्खपणाची खोड मला जडूं

पहात होती तिचें लहानपणींच निर्मूळ करण्याचा निश्चय माझ्या मनांत मुरला असता व मुरून टिकला असता तर मोठें काम झालें असतें; परंतु अशी खटपट मुळीं झालीच नाहीं. मग नुसत्या कविता पाठ केल्यानें काय होणार ?

बाबानीं एवढ्या खटपटीनें ज्या कविता मजकडून पाठ करविल्या त्यांचा मला कांहींच उपयोग झाला नाहीं, असें मीं म्हटलें खरें, तरी तें सर्वांशीं बरोबर नाहीं; त्यांचा उपयोग अन्य मार्गानें पुष्कळ झाला. कारण मला दरमहा दोनशें रुपये पगार मिळण्याचा योग जुळून आला तो त्यांच्या मुळेंच आला असें म्हणावयास कांहीं चिंता नाहीं.

# प्रकरण २ रें

## थोरांच्या ओळखी.

क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे,
विचारी मना, तूंचि शोधून पाहे।

रामदास.

बाबांच्या सांगण्यावरून 'पद्यरत्नावलीं'तल्या बऱ्याच कविता मला येत्या झाल्या. त्या म्हणण्याचा, खरें म्हणाल तर, मला मनापासून भारी कंटाळा येई. परंतु बाबांची आज्ञा, तेव्हां न म्हणून चालतें कसें? त्यांची मला नित्य आवृत्ति करावी लागे. अशा प्रकारें ज्या कविता आळें बळें माझ्या डोक्यांत कोंबण्यांत आल्या त्याच्यांत काय काय चुका आहेत हें पहावें असें त्या म्हणतां म्हणतां माझ्या सहजच मनांत आलें. मग विचार करतांकरतां पाहतों तों बऱ्याच चुका दिसूं लागल्या. त्यांपैकीं कित्येक तर इतक्या ढोबळ होत्या कीं, आजपर्यंत त्या कोणाच्याच कशा लक्षांत आल्या नाहींत याचेंच मला आश्चर्य वाटूं लागलें. यामुळें आरंभापासूनच 'पद्यरत्नमाले' विषयीं मला जो तिटकारा आला होता तो कमी न होतां उलटा अधिक दृढ मात्र झाला.

पुढें कालेजांत गेल्यावरही 'पद्यरत्नमाले' चें नांव निघालें कीं, मी त्यांतल्या कवितेची अगदीं टर उडवून देऊं लागलों व जे साधारण दोष होते तेही फार फुगवून प्रतिपादन करूं लागलों. माझ्या बरोबरीच्याच माझ्या कित्येक

सोबत्यांचें मत याच्या उलट होतें. ते या कवितांची फार वाखाणणी करीत; आणि जों जों ते वाखाणणी करीत तों तों मी, 'या कविताच नव्हत, व या ज्यानें घडल्या तो कवि नव्हे पण कुंभार होय' असें मत जोरानें बेधडक धुडकावून देऊं लागलों. याबद्दल माझे कित्येकांशीं अनेक वेळां मोठे कडक्याचे वादविवाद झाले. त्यांत बहुधा माझ्या प्रतिपादनाची सरशी होत गेली व त्याच्या योगानें माझी बरीच प्रसिद्धिही झाली. या निमित्तानें शहरांतील कित्येक विद्याव्यासंगी गृहस्थांशीं माझ्या ओळखी झाल्या व चार तरुण होतकरू विद्वानांमध्यें माझी गणना होऊं लागली. तथापि ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, सर्वांचें मत एक आणि माझें त्या सर्वांच्या उलट. माझी जसजशी वाहवा होत गेली तसतसा माझ्या मतांच्या यथार्थपणाविषयीं मला अभिमान वाटूं लागला. लगेच वर्तमानपत्रांत व मासिक पुस्तकांत या वादासंबंधें कांहीं लेख मीं लिहिले व त्यांची नेटानें चर्चा चालविली.

**या** वेळीं मराठींत कविता रचण्याची कांहीं नवीनच तऱ्हा निघाली होती. कवितेंत संस्कृत शब्द येऊं नयेत, समासघटित पदें असूं नयेत, अगदीं प्रचारांतले साधे शब्द योजावे, होतां होईल तों बोलतों तशा भाषेंत कविता असावी अशाविषयीं कित्येकांचा मोठा कटाक्ष होता. अशा कवितेस ते साधी व सरळ म्हणजे प्रसादयुक्त कविता म्हणत. वर सांगितलेल्या " रत्नमालें " तली कविता याच तऱ्हेची होती व म्हणूनच त्या वेळीं मालेची एवढी बडेजाव सर्वत्र चालली होती. ही गोष्ट स्पष्टपणें सर्वांच्या

नजरेस आणून कवितेविषयीं माझीं मतें एकंदरीनें काय काय आहेत तीं मीं एका लेखांत लिहून प्रगट केलीं. दुसऱ्या एका लेखांत पूर्वीच्या मराठी कवींच्या कवितेची व अर्वाचीन तऱ्हेच्या कवितेची तुलना करून दाखविली; आणि त्या दोहोंतून सरस कोणती ? विचार, अलंकार, शब्द-सौष्ठव इत्यादि गुणांनीं मंडित कोणती ? याचा निर्णय, स्वमतसमर्थनार्थ अनेक काव्यांतून उतारे घेऊन सविस्तर केला. तिसऱ्यांत संस्कृत व इंग्रजी कवितेशीं मराठीचा मुकाबला करून उत्कृष्ट कवितेचें मुख्य लक्षण कोणतें तें चांगलें खुलासेवार सांगितलें. याशिवाय आणखी जे कित्येक लेख लिहिले, त्यांत माझा मुख्य रोख असा होता कीं आधुनिक कवींच्या साधेपणाचा बाणा म्हणजे निव्वळ कोरडा डौल आहे हें, स्पष्टपणें दाखवावें. आपलें काव्यशक्तिहीनत्व झांकून नेण्याकरितां हें एक नुसतें त्यांचें ढोंग आहे; या पलीकडे कांहीं नाहीं. एखाद्या कंगाल मनुष्यानें साधेपणाचा डौल घालून, लकतरें नेसून मिरवूं पहावें यासारखाच यांचा हा डौल हास्यास्पद आहे. सारांश या नवीन तऱ्हेच्या कवितेंत कवित्वगुण मुळींच नसून, साधेपणापेक्षां काव्यवंध्यत्वच विशेष प्रगट होत आहे, असें मीं स्पष्टपणें म्हटलें.

हीं माझीं मतें पुष्कळांस पटलीं यांत संशय नाहीं. केवळ पुण्यांतच नव्हे तर मुंबईच्या कालेजांतलि विद्यार्थ्यांमध्यें व इतर विद्याव्यासंगी मंडळमिध्यें सुद्धां माझ्या लेखांची व विचारसरणीची फार प्रशंसा झाली. या वेळीं माझ्या मुंबईकर मित्रांकडून मला जीं पत्रें आलीं

त्यांत नेहमीं माझ्या लेखांच्या प्रशंसेचा मजकूर थोडा बहुत असेच असे. आणि एकामध्यें तर तेथील कालेजांतील एका अध्यापकानें "हा लिहिणारा कोण?" म्हणून उद्देशून चौकशी केल्याविषयीं लिहिलें होतें. आपल्या लेखांविषयीं आपणच बरें वाईट बोलणें योग्य नाहीं हें मी समजतों. तरी येथें इतकें सांगणें अवश्य आहे कीं मीं जे लेख लिहिले त्यांत सत्याचा कांहीं अंश होता खरा, मुळींच नव्हता असें नाहीं; तथापि त्याहून लेखनचातुर्य विशेष होतें. ज्यांनीं ज्यांनीं हे माझे लेख वाचले त्या सर्वांचें तरी असेंच म्हणणें पडलें कीं—"हा लिहितो यांत कांहीं कांहीं भाग अनुभवाला पटतो खरा!" आणि मी ही कबूल करतों कीं या कांहींकांहीं भागाशिवाय बाकी सर्वत्र अभिमानाचाच फार अंश असून तो मात्र चटकदार भाषेनें मीं छान खुलवून दिला होता.

लिहिणारांची ही एक रीतच आहे कीं जो पक्ष त्यांनीं एकदा उचलला तो सिद्ध करण्याच्या भरांत त्यांस प्रतिपक्षाची बाजू तिळमात्रही दिसेनाशी होते. अशा रीतीनें लिहिणाराला वाटत असतें त्या पेक्षांही अधिक उणा मजकूर समयविशेषीं वादप्रतिवादाच्या कडाक्यांत त्याच्या हातून सहज निघून जातो. कदाचित् तितका कडक मजकूर लिहिण्याची आरंभीं त्याची इच्छाही नसते. परंतु लेखणीच्या सफाईसरसें जें एकदा निघून जातें तें जातें. माझ्या लिहिण्याची तरी हीच गति झाली. खरें म्हटलें तर, माझी अटकळ होती तीहून हे लेख अधिक चांगले वठले, त्यांचें जेवढें महत्व होतें त्यांहून अधिक त्यांची

चर्चा झाली आणि या चर्चेंहूनही लोकांस ते अधिक पसंत पडले. सारांश माझ्या लेखणीचा प्रभाव जेवढा गाजेल म्हणून मला वाटत होतें त्याहून तो फारच गाजला, यांत संशय नाहिं. यामुळें मला तर असेंच वाटूं लागलें कीं बाबांनीं भविष्य केल्याप्रमाणें खरोखरच मी एक बुद्धिवान व थोर पुरुष होणार !

माझा कालेजचा अभ्यास पुरा झाल्यावर जसजसा चार चौघांत मी वागूं लागलों तसतशी अधिकाधिक माझी ख्याति होऊं लागली. दक्षिण महाराष्ट्रांतले एक संस्थानिक या वेळीं विद्वानांचे व विद्याकलांचे पोषिंदे म्हणून गाजत होते, त्यांच्या कानावर माझें नांव गेलें, आणि माझे गाजलेले वरील लेखही त्यांच्या वाचण्यांत आले. हे संस्थानिक स्वभावानें उदार व गुणज्ञ असून, नवीन होतकरू गुणी जनांस, त्यांच्या गुणांप्रमाणें, हस्तें परहस्तें मदत करण्याची आणि उत्तेजन देण्याची त्यांस फार हौस असे. त्यांनीं कित्येक निबंध व पुस्तकें आपल्या नांवानें प्रसिद्ध केलीं होतीं. त्यांपैकीं स्वतां लिहिलेलीं किती हें जरी निश्चयानें सांगतां येणें कठीण आहे तरी त्यांचें लक्ष अशा कामाकडे विशेष होतें यांत तिलप्राय संदेह नाहीं. वर सांगितलेले माझे लेख त्यांस मनापासून आवडले. त्यांनीं मजविषयीं लगेच विचारपूस केली, एवढेंच नाहीं, तर माझ्या भेटीचा योगही अचानक जमवून आणला. पहिल्याच भेटीला त्यांच्याशीं माझे जे चार शब्द झाले त्यावरून माझ्या मनांत त्यांच्याविषयीं फार पूज्य बुद्धि उत्पन्न झाली. हें मला येथें प्रांजलपणें

कळविलें पाहिजे. आणि त्यांच्या विनंती वरून दुसऱ्या दिवसापासून महाराजांच्या बंगल्यावर माझें जाणें येणें सुरू झालें.

**मा**झे हे नवे आश्रयदाते, खरें म्हटलें तर, जुन्या मताचे होते. त्यांच्या भाषणावरून, पोषाकावरून व रीतरिवाजावरून पाहिलें तर ते पुरे सुधारक असावे असें वाटत असे, तथापि एकंदरीनें त्यांच्या मनाचा ओढा जुन्या मताकडे फार होता. आणि खरोखरींच त्यांस "नव्या मता"चा आणि " सुधारणे "चा इतका तिटकारा होता कीं, माझ्या मतांचा झोंक प्रथमपासूनच जर त्यांस पुरा कळला असता तर त्यांनीं एवढा आश्रय मला दिला असता किंवा नाहीं याविषयीं वानवाच होता.

**पा**श्चिमात्य शिक्षणाच्या प्रवेशानें हिंदुस्थानांत इतर भागांतल्याप्रमाणें महाराष्ट्रांतही जनसमाजाचे 'नवें मत' व 'जुनें मत' असे दोन मुख्य पक्ष झाले होते. कालेजांत व हायस्कुलांत शिकलेली झाडून सारी मंडळी नव्या मताची असे. ही मंडळी आपल्यास ' सुधारक ' म्हणवी. याशिवाय बाकींचा मोठा जनसमुदाय जुन्या मताचा म्हणावयास चिंता नाहीं. हे पक्ष अझूनही आपल्यामध्यें नांदत आहेतच, त्यापेक्षां त्यांच्याविषयीं येथें विशेष सांगण्याची गरज नाहीं. तथापि एवढें सांगणें जरूर आहे कीं, या दोनही पक्षांच्या मधला एक आडसुधारकांचा पक्ष जसा हल्लीं आहे तसा तो तेव्हांही होताच. आतां आडसुधारकांची संख्या बरीच आहे, तेव्हां एवढी नव्हती इतकेंच. बाकी त्यांचें अस्तित्व अव्वल इंग्रेजीमध्येंही होतें. सुधारक म्हणविणाऱ्यांस राज्यक-

त्यांचा चांगला आश्रय असे, त्यामुळें त्यांनीं आरंभीं आरंभीं लोकसमाजामध्यें मोठी गडबड उडवून दिली होती. पाश्चिमात्य रीतिभातींस अनुसरणें यास ते ‘ सुधारणा ’ असें म्हणत असत आणि त्या रीतिभाती जे कोणी सौम्य अथवा कडक उपायांनीं सरसकट चालू करूं पाहत त्यांची ‘ सुधारकां ’ त गणना होत असे. आडसुधारकांप्रमाणें हें करणें मला अगदीं पसंत नव्हतें. खरें म्हटलें तर माझे व सुधारकांचे उद्देश व विचार मूळांत कांहीं फारसे भिन्न नव्हते. कोणकोणत्या बाबतींत कोणकोणती सुधारणा झाली पाहिजे या संबंधें सुधारक मंडळींचे जे विचार होते तेच माझेही होते; या बाबतींत त्यांचा व माझा मतभेद नव्हता. तथापि त्यांच्या वागणुकींत व माझ्याप्रमाणेंच आडसुधारकांच्या वागणुकींत जमीनअस्मानाचें अंतर होतें. लोकांस सुधारण्यासाठीं जे उपाय ते बिनधास्तपणें सुचवीत व ज्या मार्गाचा बेधडक अंगीकार करीत त्यांच्या संबंधानें मात्र माझें त्यांच्याशीं पटत नव्हतें. लोकसुधारणुकीचे आमचे मार्ग वेगळे व त्यांचे वेगळे. यांतच कायतो सुधारकांचा व आडसुधारकांचा मुख्य मतभेद होता, व याच कारणास्तव आड सुधारकांची गणना जुन्या मताच्या लोकांमध्यें होत असे. माझे आश्रयदाते महाराज तर अगदीं जुन्या चालीचे गृहस्थ; त्यांस नव्या जुन्या पक्षांच्या मध्यंतरीं एखादा लहानसान पक्ष असेल ही कल्पनाही होती-सें दिसत नाहीं आणि म्हणूनच माझ्या मनाचें वळण कोणी-कडे आहे याचीही त्यांस बरोबर अटकळ झाली नव्हती असें वाटतें. संभाषणामध्यें, वादविवादामध्यें व लेखना-मध्यें सुधारणेविषयीं माझे जे वारंवार उद्गार निघत त्यांवरून

मी जुन्या मताचाच पुरस्कर्ता आहे अशी महाराजांची समजूत झाली असावी अथवा इंग्रेजी शिकलेल्या मंडळींत जुन्या पद्धतीचे पुरस्कर्तेही कांहीं आहेत असें जगाला भासविण्याकरतांच कदाचित् त्यांनीं मजविषयी तशी आपली समजूत करून घेतली असेल !

**आतां** आमच्या महाराजांविषयीं जर पाहिलें तर ते जुन्या चालीचे गृहस्थ होते हें मी आरंभींच सांगितलें आहे. तथापि त्यांस बाहेरला थाटमाट सगळा युरोपीयन तऱ्हेचा ठेवावा लागे. त्यांस नेहमीं बूट पाटलोणी घालाव्या लागत, टेबलखुर्चीची गांठ घ्यावी लागे, युरोपीयनांशीं स्पर्शास्पर्श सुद्धां करावा लागे आणि अशीही कुणकुण चालत असे कीं सत्यविशेषीं भक्ष्याभक्ष्याचा आणि पेयापेयाचाही विचार करणें त्यांस योग्य वाटत नसे. सभेला जाणें व अध्यक्ष होणें हें तर आपलें पहिलें कर्तव्य म्हणून ते समजत असत. वर्तमानपत्रादिकांत लिहिणें, ग्रंथ रचून प्रसिद्ध करणें व अशा रीतीनें आपलें नांव जगजाहीर करणें याची त्यांस इतकी हौस होती कीं, सरासरीं तें एक व्यसनच, होऊन बसलें होतें असें म्हणावयास चिंता नाहीं.तथापि त्यांच्या आंगचा मोठा व खरा गुण म्हटला म्हणजे खरी कळकळ व झटून काम करण्याची चाल. याशिवाय दुसऱ्यांचें मन वेधेल असेही जे आणखी कांहीं गुण त्यांच्या आंगी होते ते हे कीं ते मनानें मोकळे; अंतःकरणाचे उदार व स्वभावाचे दयाळु असे होते. तशीच विद्वानांस व गुणिजनांस आश्रय देण्याचीही त्यांस मनापासून इच्छा होती.

आमच्या रावसाहेबांस, वर सांगीतलेल्या त्यांच्या व्यव-सायांमुळें, एखादा हुशार लिहिणारा मनुष्य नेहमीं हाताशीं हवाच असे. त्याचें काम म्हटलें म्हणजे रावसाहेबांस जीं आपणें करावीं लागत व जे लेख लिहावे लागत, ते त्यांच्या साठीं लिहून तयार करून देणें हें होय. माझे प्रसिद्ध झालेले लेख जे त्यांच्या वाचण्यांत आले होते त्यांतील भाषासरणी व लेखनशैली त्यांच्या पसंतीस आल्यावरून त्यांनीं माझी पुष्कळ प्रशंसा करून, एका खेपेला सहज म्हटलें—"हें पहा, जगन्नाथपंत (वरच्या व निकटच्या मित्रमंडळी-वांचून इतरांमध्यें माझें हेंच नांव रूढ होतें,) तुमचें बुद्धिचा-तुर्य पाहून तुम्हाला कांहीं तरी मदत करावी असें माझ्या मनांत येतें. पण—" थोडासा विचार केलासें करून पुनः म्हणतात— "आमच्याकडे तुम्ही नोकरी पत्कराल काय? तुमची मर्जी असली तर दरमाहा दोनशें रुपये पगार मिळेल. आणि कामही तुमच्या योग्य आहे. आमच्या मुलाला शिक-विण्याचें मुख्य काम. याशिवाय, तुम्ही आमच्याबरोबर अस-लां तर आम्हालाही तुमचा पुष्कळ उपयोग होईल, समजलां-का?" दरमाहा दोनशें रुपयांचें नांव ऐकतांच मी मनांत चकित झालों. तथापि बाहेरून मनाची चलबिचल न दाखवितां मीं म्हटलें— "महाराजांच्या आज्ञेबाहेर वाग-ण्याची माझी छाती नाहीं. आपले मजवर पुष्कळ उपकार आहेत. तथापि या बाबतींत मी आपल्या बाबांची सल्ला घेऊन काय तें मुक्रर कळवीन."

या नंतर ही गोष्ट एवढीच राहिली. जाते वेळीं राव-साहेबांनीं वारंवार भेट घेण्याविषयीं मला आग्रह करकरून

सांगितलें व लगेच कोचमनाला हाक मारून हुकूम केला कीं दोन घोड्यांच्या आपल्या ब्रूमगाडींत बसवून यांस यांच्या घरीं नेऊन घाल. मी तर मनांत गारेगार होऊन गेलों, आणि खरेंच सांगतों, ही हकीगत बाबांस केव्हां जाऊन सांगेन असें मला झालें. बाबांसही या हकीगतीनें परम संतोष झाला. ती रात्र मोठ्या आनंदाची गेली. कदाचित माझ्या एकंदर आयुष्यांत असा आनंदाचा समय दुसरा आलाच नाहीं असेंही म्हणतां येईल. रात्रभर घरांत आमचें हेंच खलबत चाललें होतें कीं पुढें कसें वागायचें, महाराजांच्या आश्रयानें कोणते कोणते कसकसे लाभ करून घ्यावयाचे, मोठमोठ्यांच्या ओळखी होण्याचे प्रसंग येतील ते कसकसे साधावयाचे, नांवलौकिक कोणत्या उपायांनीं मिळवावयाचा; सारांश आमच्या महाराजांची ही ओळख म्हणजे माझ्या पुढील आयुष्यामधल्या ऐहिक वैभवाचा पाया असल्याकारणानें आम्हीं हजार विचार मनांत आणले आणि हजार बेत केले. आमच्या बाबांस तर, मी कोणी नामांकित मनुष्य होणार म्हणून त्यांनीं जें भविष्य केलें होतें, तें खरें ठरणार असें आतां खात्रीनें वाटूं लागलें, आणि दरमाहा दोनशांची नोकरी आपल्या पायांनीं चालून आली आहे ती घालवूं नये असें त्यांचें मत पडलें.

महाराजांकडून मला वारंवार बंगल्यावर बोलावणें येई तेव्हां नेहमीं दोन घोड्यांचीच गाडी येत असे. एकंदर मानमरातब फार उत्तम ठेवला जात असे आणि त्यांतले त्यांत महाराजांचें लक्षही मजकडे विशेष दिसून येत असे. तरी मागें एकदा त्यांनीं गोष्ट काढली होती त्यानंतर नोकरी-

विषयीं पुनः बोलणें काढलें नाहीं. मग हें बोलणें त्यांनी मुद्दामच टाळलें होतें किंवा त्यांच्या स्मरणांतूनच ती गोष्ट गेली होती हें कांहीं कळत नाहीं. तथापि असें करतां करतां कित्येक महिने गेले. तों इतक्यांत अकस्मात् एक प्रकरण उपस्थित झालें. त्यांत जर मीं जराशी तरतरी दाखवली असती आणि आळस सोडून झटलों असतों व माझ्या हातून महाराजांस चांगली मदत झाली असती, तर खचीतच माझें दैव उघडलें असतें व आजला मी चिरवांछित अत्युच्च वैभवशिखरावर आरूढ झालों असतों. पण आम्ही पडलों आपले पक्के साताळशी ! आमच्या हातून बोलल्या बोला-प्रमाणें वेळेवर काम उठेल तर शपथ. त्यामुळें एवढी अमोल संधि आली असतांही मीं ती कवडीच्या मोलानें व्यर्थ घालविली.

मुंबई शहरीं सुधारक मंडळीपैकीं कोणी एका नामदारांनीं सुधारणापक्षाच्या मंडनार्थ 'शास्त्र प्रमाण कीं रूढि प्रमाण ?' हा वाद उपस्थित करून व्याख्यानें झोडण्यास सुरवात केली होती. जुन्या पद्धतीच्या मंडळीसही तेव्हां बराच चेव आलेला दिसत होता व त्यांच्या तर्फे या चळवळीस तोंड देण्याची खटपट चालली होती. वर्तमानपत्रांत तर जारीनें चर्चा सुरू झालीच, तरी आपल्या तर्फेच्या एखाद्या नामदारांचें व्याख्यान जर या वेळीं झडेल तर सुधारक पक्षाचा चांगला नक्षा उतरेल असें जुन्या मताच्या लोकांच्या एका मंडळीच्या बाणेदार चालकांस वाटलें. आमचे महाराज हे या सभेचे अध्यक्ष होते. त्यांजकडे उघडच सर्वांचे डोळे लागले, व त्यांसच व्याख्यान देण्याविषयीं कुत्राच्या मंडळीनें विनं-

तिपूर्वक विचारलें. कांहीं अंशीं जुन्या मताच्या रक्षणार्थ या आणीबाणीच्या वेळीं कांहीं तरी खटपट करण्याचें अगत्य वाटल्यावरून आणि कांहीं अंशीं आपला लौकिक वाढविण्याच्या महत्वाकांक्षेला वश झाल्यावरून आमच्या महाराजांनीं क्लबाची ही विनंति मान्य केली व " शास्त्राद्रूढि-र्बलीयसी " या विषयावर आपण व्याख्यान देणार म्हणून जाहीर केलें. ही बातमी बाहेर येतांच, सर्व मुंबईभर मोठी गडबड उडून गेली. जिकडे तिकडे हीच गोष्ट- " अमुक संस्थानचे महाराज व अमुक क्लबाचे अध्यक्ष हे जुन्या मताच्या पुष्ट्यर्थ अमुक दिवशीं व्याख्यान देणार." महाराजांची अनेक प्रकारें स्तुति होऊं लागली. ते असे उदार आहेत, ते तसे हुशार आहेत, ते असें असें व्याख्यान देणार आहेत असे उद्गार ऐकूं येऊं लागले. जुन्या मताच्या तमाम लोकांमध्यें मोठा उत्साह उत्पन्न झाला, इतकेंच नाहीं तर नव्या मताच्या मंडळीलाही हे महाराज आतां काय बोलणार तें ऐकण्याची मोठी उत्कंठा वाटूं लागली. हें व्याख्यान ऐकावयाला हजारों लोकांची गर्दी जमेल अशी सर्वांची अटकळ होऊन चुकली होती. याप्रमाणें आमच्या महाराजांनीं, माझ्या बळावर विश्वसून, व्याख्यान देण्याचें तर अभिवचन दिलें व लोकांमध्यें चळवळीची एकच गर्दी उडवून दिली. झालें हें सर्व ठीकच झालें, पण आतां आमची इकडली कर्मकथा ऐका.

महाराज मुंबईस गेले होते ते पुण्यास लौकरच परत आले. आल्याबरोबर त्यांनीं प्रथम मला बोलावूं पाठविलें आणि भाषण करण्याचें जें काम आपण पत्करलें होतें त्याची

साकल्यानें हकीगत सांगितली. त्यांना माझी खात्री होती कीं हा जें भाषण लिहून तयार करील तें चांगलेंच करील, म्हणून त्यांनीं मुख्य मुख्य तेवढ्या सूचना मला करून बाकी सर्व रचना करण्याचें कौशल्य माझ्या अक्कलेवर ठेवलें. ते शेवटीं म्हणाले-" वर्तमानपत्रांतून तुम्हीं विरुद्ध पक्षाचीं भाषणें वाचलींच आहेत. ते कोणकोणतीं कारणें पुढें आणतात, कोटया काय काय लढवतात, विचारसरणी कसकशी योजतात, या सर्व गोष्टींकडे तुम्हाला अवश्य लक्ष दिलें पाहिजे. भाषण मोठें चटकदार, बेतशीर व कोटीबाज असें वठलें पाहिजे. भाषा वगैरे शान झोंकदार असली पाहिजे. बाकी या गोष्टी तुह्माला सांगणें नलगे. तुम्ही पुरे माहीतगारच आहां. " महाराजांची ही कामगिरी मीं मोठ्या आनंदानें स्वीकारली. आणि उत्साहपूर्वक आश्वसन देऊन मीं म्हटलें-" आपण कांहीं चिंता करूं नये. भाषण तर पहा, कसें मजेदार तयार करतों तें. माझ्याही• मनांतून या चालू विषयावर लेखणी उचलावयाचीच होती. या विषयाचा बराचसा विचारही मीं केला आहे. आतां आणखी कांहीं आधार श्रुतिस्मृतींतून शोधून काढले कीं झाली तयारी ! "

महाराजांस मोठा संतोष झालासें दिसलें. आणि ते म्हणाले-" शाबास शाबास ! करा तर तयारी. लागा याच उद्योगाला. आतां दुसरें तिसरें काम हातीं घेऊं नका. तुह्मी उद्यांपासून आमच्या बंगल्यावर रोज येत जावें. आमची गाडी रोज १० । ११ वाजतां तुम्हाला आणण्याकरतां आपल्याकडे येत जाईल, अथवा जो वेळ

तुह्माला बरा वाटेल त्या वेळीं, मी आमच्या कोचमिना-ला सांगून ठेवलें आहे, तो तुमच्याकडे गाडी आणील. उद्यांपासून आपली नोकरी चालू झाली. भाषणाला आजपासून बरोबर एक महिना पांच दिवसांचा अवधि आहे. आणखी पंधरा दिवसांनीं महिना दोन महिने मुंबई-सच जाऊन राहण्याचा आमचा विचार आहे. आपल्यालाही बरोबर यावें लागेल. परंतु त्याच्या पूर्वी सर्व सामुग्री मिळवून भाषण लिहून मजजवळ द्या ह्मणजे बरें. मुंबईस गेल्यावर पुढें बरेंच गडबडीचें काम आहे, मग वेळ बिलकुल मिळ-णार नाहीं. समजलांना? तर आतां विलंब लावूं नका. ह्या कामाला बिलगा."

मीं ही गोष्ट खुशीनें कबूल केली, व तसाच रजा घेऊन निघालों. "उद्यांपासून सात रुपये रोज चालू. आणखी पंधरा दिवशीं मुंबईस जावयाचें. मग तेथें मोठमोठ्यांच्या सहज ओळखी व्हावयाच्या आणि एकंदर मोठी चैन उडा-वयाची, दुसरें काय?" अशा आनंदाच्या विचारांत मी गर्क होऊन गेलों. घरीं येतांच झालेला प्रकार बाबांस सां-गीतला. त्यांनाही संतोष झाला. पण त्यांनीं मला बजावून सांगीतलें कीं—"या वेळीं तरी नीट जप आणि भा-षण सुरेख, महाराजांच्या मनाप्रमाणें, तयार करून दे. बाकी तुझी बुद्धि चांगलीच आहे व लिहिण्याची ढबही चांगलीच साधली आहे, ह्मगा; तेव्हां भाषण कसें उतरेल याची मला विशेष काळजी नाहीं. पण, बाबा, तूं आळसानें पहिल्यानें दिवस फुकट घालविशील आणि अखेरीस सगळा

घोटाळा करून सोडशील, याचीच काय ती मला मोठी भास्ती वाटते."

मीं उलटून म्हटलें—"हो तर, माझ्यासारख्याला एक भाषण लिहून काढणें म्हणजे काय मोठी मात आहे? हं हं म्हणतां लिहून काढीन. एकदा लेखणी होतीं घेण्याचा उशीर!" यानंतर बाबांनीं मान डोलविली आणि कांहींच भाषण केलें नाहीं.

दुसरे दिवशीं उठल्याबरोबर मीं प्रथम कांहीं पुस्तकें गोळा केलीं व कांहीं जुन्या पोथ्याही मिळविल्या. दौत, लेखणी, कागद वगैरे आणून ठेवले. मग ह्या पुस्तकाचीं पानें चाळ, त्या पुस्तकामध्यें खूण घालून ठेव, असें करीत बसलों. असें चाललें असतांना माझ्या मनांत वारंवार विचार घोळत होता, तो हाच कीं "काय चिंता आहे! अजून एक महिना पांच दिवसांचा चांगला लांबलचक अवधि आहे. मग आजच काय अडलें आहे एवढें मनाला शीण देण्यावांचून? आपण म्हणूं तेव्हां चार घटकेंत करून टाकूं. आज नाहीं, उद्यां करूं. त्याचें काय?" असें म्हणून रोजच्या रोज मी ही गोष्ट आजची उद्यांवर ढकलीत चाललों. रोज गाडींत बसून बंगल्यावर जाऊन येण्याचा मात्र क्रम चालू होता. गाडी फुकाची आणि मजीस वाटलें तर शहराबाहेर किंवा शहरांतही गाडी घेऊन फिरावयास जाण्याला महाराजांची कांहीं अडकाठी नव्हती, मग काय? मी मार थाटानें गाडी घेऊन माझ्या आप्तमित्रांस भेटावयास जाऊं लागलों. नोकरी लागल्यापासून माझ्या पोशाकांत व राहण्याच्या पद्धतींतही थोडासाच, तरी लगेच लक्षांत येण्या-

सारखा, फेरफार आपोआपच झाला कारण मी आतां विद्यार्थी नसून चार चौघा थोर लोकांत वागणारा मनुष्य; तेव्हां एवढा हा फेरफार अवश्यच झाला. जिथें जिथें मी जाई तिथें तिथें आदरानें माझी विचारपूस होऊं लागली. बोलण्यांत बहुधा माझ्या व महाराजांच्या संबंधाचा विषय निघावयाचाच व त्यांत नेहमीं माझी प्रशंसाच झालेली माझ्या कानीं यावयाची. ती माझ्या कानाला किती मिष्ट लागे म्हणून सांगूं! ती पुनः पुनः ऐकण्याची जणों मला एक प्रकारची चटच लागली असें म्हणावयास चिंता नाहीं. माझ्या पुढील वैभवाची सर्वांस पुरी आशा वाटूं लागली, मग त्यांनीं तरी माझी तोंडची स्तुति करायला कशाला कमी करावें? पण तेणें करून मला मात्र, आमच्या बाबांप्रमाणेंच, खास वाटूं लागलें कीं मी कोणी अलौकिक थोर मनुष्य होणार खचीत!

ह्या प्रमाणें थाटानें मिरवण्यांत सबंध पंधरा दिवस मीं घालविले; तरी शाई, कागद, लेखणी यांशीं आमची गांठ पडली नाहीं–मग भाषण लिहून काढण्याची गोष्ट कशाला? आणखी चार दिवस वर लोटले. तरी रोज, "**उद्यां करूं, उद्यां करूं**" हा आमचा मंत्र कांहीं सुटला नाहीं. मी रोज बंगल्यावर जात असें पण पोटांत नेहमीं धास्ती कीं न जाणों आज महाराज भाषणाविषयीं गोष्ट काढतील. अखेरीस एकोणिसाव्या दिवशीं महाराजांनीं मला मुजरत बोलावून सांगितलें कीं "मागें म्हटल्याप्रमाणें मला उद्यांच्या टपालाच्या गाडीनें मुंबईस जावयाचें. तुमची निघण्याची तयारी असूं द्या बरें. तुमच्या राहण्याची व खाण्यापिण्याची व्यवस्था

आमच्या तर्फेनें होईलच." नंतर भाषण लिहून झालें असेलच असें समजून त्यांनीं सहज विचारलें–"कां? आपलें तें भाषण लिहून झालेंना? मला एकदा तें पाहिलें पाहिजे." हे शब्द ऐकतांच मनांत तर चरकलों पण तसें न दाखवितां मीं शिताफीनें ताबडतोब उत्तर दिलें–"हो हो. सगळी तयारी आहे. पहिल्यापासून शेवटपर्यंत कसकशी रचना करावयाची तें विचार करून ठरवून ठेवलें आहे. श्रुतिस्मृतींचीं वचनें शोधून काढलीं आहेत. चांगले चांगले नीतिवादाचे श्लोक, संस्कृत, मराठी, इंग्रेजी ग्रंथांतून निवडून टाचून घेतले आहेत व ते कोठें कोठें कसकसे गुंफून द्यावयाचे हेंही मुक्रर करून ठेवलें आहे. आतां काय तें दोन तीन तासांचें काम आहे. फक्त एकामागून एक, जागच्या जागीं, हे वेंचे घालायचे व मधून मधून भरतीला कांहीं मजकूर लिहून काढावयाचा एवढेंच काय तें बाकी राहिलें आहे; दुसरें कांहीं नाहीं. तेवढें मुंबईस गेल्यावरही करतां येण्याला नड नाहीं. गेलों कीं पहिलें काम हेंच."

महाराजांनीं पुढें अधिक विचारपूस केली नाहीं त्यावरून मी सांगितलें तेवढ्यानें त्यांची समजूत झाली असें दिसलें. वेळ मोठी कठिण आली होती पण ती मोठ्या मजेनें निभावली, या माझ्या चातुर्याबद्दल माझें मलाच कौतुक वाटूं लागलें. आणि मीं आपल्याशीं म्हणालों–"शाबास, कवीश्वर, शाबास. धन्य आहे तुझ्या निपुणतेची. वेळ मारून न्यावी अशी तूंच. पण आतां मात्र संभाळ बरें. उद्यां मुंबईस गेलास कीं मग भाषण लिहून टाकण्याला विलंब लावूं नको म्हणजे झालें."

मुंबईस जाण्याची बांधाबांध करून घेतली, आणि कोणकोणतीं पुस्तकें बरोबर न्यावयाचीं म्हणून पाहूं लागलों तों कोणतीं घ्यावीं आणि कोणतीं वगळावीं हें कांहींच कळेना. कारण, म्हटल्याप्रमाणें, वेच्यांचें टिपण करून ठेवलेलें मुळींच नव्हतें. मग अनमानदपक्यानें कांहीं पुस्तकें मीं बांधून घेतलीं इतकेंच. अशा धांदलीनें आमची स्वारी एकदाची मुंबईस जाऊन थडकली. तेथें मला नेमून दिलेल्या खोलींत बोजे सोडून मीं सामानसुमान लावूं लागलों तों बांधून घतलेल्या पुस्तकांचा बोजा विसरून घरीं राहून गेला असें आढळलें अरेरे ! केवढा घात झाला, असें मीं म्हटलें आणि याबद्दल मला प्रथम बरेंच वाईट वाटून मीं आपल्याला पुष्कळ बोल लावून घेतला. तरी मुंबईंत कांहीं उत्कृष्ट पुस्तकालयें आहेत, त्यांत आपल्यास हवीं तीं पुस्तकें सहज मिळूं शकतील असा विचार मनांत येतांच पुनः मनाला धीर देऊन मी पुढील उद्योगाला लागलों महाराजांचें व्याख्यान एकदा लिहून काढावें असें माझ्या मनांत पुष्कळ होतें व हजार वेळां मीं तसा बेतही केला, तथापि जागा पागा नवीन, सोई हव्या त्या नाहींत; यामुळें कांहीं बेत जमेना. रोज नवी नवी आणि बडी बडी मंडळी महाराजांस भेटावयास येई, तेव्हां मलाही त्यांच्याशीं चार शब्द बोलावे लागत. शिवाय ओळखी देळखी करून घेण्याची ही संधि दवडणेंही वाजवी नव्हतें. हें सगळें खरें, परंतु त्यामुळें वेळ फार मोडूं लागला. तशांत मुंबईच्या कालेजांपैकीं माझ्या कित्येक सोबत्यांच्या भेटी होऊन पूर्वींचा स्नेह अधिक दृढ होऊं लागला. यांपैकीं कोणी तरी

मधून मधून भेटावयास येतच. अशा गर्दींत लिहिणें कोठून सुचणार? भराभर दिवसामागून दिवस निघून गेले आणि तिसावा दिवस उजाडला! या दिवशीं महाराजांनीं मजपाशीं व्याख्यानाविषयीं पुनः चौकशी केली. तेव्हां, "लिहिलें तर नाहीं. पण उद्यां खचीत लिहून काढतों" असें माझें गोंधळलेलें उत्तर येतांच, महाराजांनीं सचिंत मुद्रेनें म्हटलें-"ओहो! आतां दिवस काय ते चारच राहिले. पांचवे दिवशीं संध्याकाळीं पांच वाजतां भाषण व्हावयाचें मुक्रर झालें आहे. मी तर आज बडोद्यास जाणार, तो भाषणाच्या आदले दिवशीं परत येणार. आतां मी हें भाषण पाहूं केव्हां? वाचूं केव्हां? आणि होईल तरी कसें?"

मीं बेधडक म्हणालों-"काय चिंता आहे? आपण बिनदिक्कत बडोद्यास जावें. मी उद्यांच्याच पोष्टांतून, भाषण लिहून, कमजास्त पाहून सवरून, पाठवून देतों. मग तर अडचण नाहीं?" या माझ्या बोलण्यावर ते कांहीं बोललेच नाहींत.

महाराज तर बडोद्यास निघून गेले. आणि मी भाषण लिहिण्याच्या निश्चयानें आपल्या खोलींत गेलों. त्या दिवशीं कोट, बाहेरकोट, महालक्ष्मी वगैरे ठिकाणीं गेल्यामुळें रखडपट्टी फार झाली होती, तेव्हां म्हटलें जरा गरम गरम चहा बिहा पिऊं आणि एकामीं लिहावयास बसूं. मग नोकर चहा करून आणतोच आहे इतक्यांत दोघे तिघे मित्र भेटावयास आले. हास्यविनोद चालतां चालतां चहा पिणें झालें. मागून थोडा उपहारही झाला, आणि मी लिहिण्याची सामुग्री घेऊन टेबलाशीं जाऊन बसलों. तों एकजण म्हणतो-"वाहवाजी वाहवा!

लिहावयास बसायची हीच वेळ नव्हे काय? चला. जरा चौपाटीवर फिरावयास तर जाऊं या." मीं म्हटलें–" नाहींरे बाबा! मला आज फार काम आहे. मला लिहिलेंच पाहिजे. उद्यां सांजपत्रींतां भाषण लिहून टपालानें बडोद्यास पाठविलें पाहिजे" दुसरा मित्र म्हणतो–"या:, ही काय रिकामी सबब? जसें कांहीं आतां लिहिण्यास बसलां कीं आतांच्या आतांच पुरें करून टाकणार! चला, फिरायला तर चला. मग सगळी रात्र आणि सगळा दिवस तुमचाच आहे. वाटेल तेवढें लिहीत बसा. कोणी हात धरायला येत नाहीं."

मीं विचार केला कीं–" हे म्हणतात तेंही खरें आहे. दोन तास फिरण्यांत गेले म्हणून मोठेंसें बिघडलें नाहीं. तशांत समजाविलें तरी हे समजावयाचे नाहींत, आणि एवढ्यासाठीं यांस नाखुश करणेंही ठीक नाहीं. म्हणून मीं पोषाक केला, आणि निघालों. चौपाटीवर गेलों तों तेथें आणखी कित्येक मित्र भेटले. गप्पा गोष्टी होतां सवरतां बराच वेळ झाला. मला मागच्या कामाची आठवणच नाहीं. मग एक जणानें सुचविलें कीं " उद्यां रविवार आहे, सर्वांना सुटी आहे, तर चला, आपण सर्व घारापुरीचीं लेणीं पाहण्याला जाऊं या." हीं लेणीं पाहण्यासारखीं आहेत असें मींही पुष्कळांचे तोंडून ऐकलें होतें. तर या वेळीं पाहून यावें असें सहजच मनांत आलें. वरील सूचना मीं लागलीच झेलली आणि सगळ्यांच्या वतीनें जाण्याची व्यवस्था करण्याचा सर्व पत्कर मींच पुढें होऊन आपल्या अंगावर घेतला. एवढ्या खटपटींत त्रिव्हाटीं यात्र यास रात्र झाल्यामुळें जेवलों आणि तसाच जाऊन झोपीं गेलों. सकाळीं लौकर उठून बंदरावर गेलों तों तेथें ठरल्या-

प्रमाणें सर्वजण जमा होऊन माझी वाटच पाहत होते. संध्याकाळ पावेतों लेणीं पाहण्यांत व तेथील उंच डोंगरावरून सभोंवरच्या मनोहर देखाव्याचें नेत्रसुख अनुभविण्यांत सर्व वेळ गेला. विन्हाडीं आलों तों अपरात्र झाली, मग तसाच आंथरुणावर जाऊन पडलों. सकाळीं उठतां क्षणींच भाषण लिहिण्याची आठवण झाली. आजपासून चौथ्या दिवशीं भाषण व्हावयाचें हेंही लक्षांत आलें. बडोद्यास काल्च्या टपालानें भाषण लिहून पाठवावयाचें होतें तेंही पाठविलें नाहीं, हें मनांत येतांच चटकन डोळे उघडले. मग विचार केला कीं "कांहीं नाहीं. आजचें टपाल मात्र चुकवावयाचें नाहीं हाच निश्चय. आतां आंघोळ, जेवणखाण वगैरे उरकून एकदम जें बसायचें तें पुरें करून उठायचें." मग खातां जेवतां बारावर एक वाजला आणि आमची स्वारी पोट चोळीत चोळीत टेबलाशीं येऊन बसली. सर्व ठाकठीक जमलें, आणि लिहिण्यास सुरवात केली. विषयाचें नांव लिहिलें आणि शिरोभागीं मराठी, संस्कृत किंवा इंग्रजी कवितेचें एकेक सुंदर अवतारण घालावें असें मनांत आलें. विचार करतां करतां अशा कविता तर आठवल्या पण त्यांचे सगळे चरण नीट आठवतना. मग ह्या कवितांचीं पुस्तकें पाहूं लागलों तों तीं जवळ नाहींत व रायल एशियाटिक मंडळीच्या पुस्तकालयावांचून इतर कोठें मिळाण्याचाही संभव नाहीं असें दिसलें. त्यांवाचून तर लिहिण्याचें गाडें अडलें. म्हणून गाडी जोडून आणण्याला सांगून, गाडींत बसून आमची स्वारी टौन हालाकडे चालती झाली.

सदर्हु पुस्तकालयांत गेलों तों तेथें चार गृहस्थ बसले होते व ते माझे नवे स्नेहीच होते. त्यांचा कांहीं एका विष-

यासंबंधें वादविवाद चालला होता. मला पाहतांच त्यांपैकीं एकजण म्हणाला—" हे घ्या. हे आले कवीश्वर! यांच्या पुढें आपला वाद ठेवा, हेच सांगतील याचा निर्णय काय तो." मला वादविवाद करण्याची आवडच, मी लागलाच त्यांच्या वादांत शिरलों. अशा प्रकारें तोही सारा दिवस लिहिल्या-वांचून निघून गेला.

मला पाहिजे होते ते ग्रंथ तर पुस्तकालयांत मिळाले व मीं ते काखेंस मारून बिऱ्हाडींही घेऊन आलों. परंतु आतां लागावें तसें मन लागेना. भाषणाला मध्यें दिवस राहिले कोरे करकरीत दोन. हे दोन दिवस गेले कीं तिसरे दिवशीं संध्याकाळीं आमच्या महाराजांचें भाषण!! या वेळीं मात्र मी जरा बाबरलों—उद्यां महाराज येतील, त्यांना काय उत्तर देऊं? पण मीं आपल्याशीं म्हटलें—" कांहीं नाहीं. भाषणाच्या आदले दिवशीं दुपारीं महाराज आले कीं भाषण समग्र लिहिलेलें त्यांच्या पुढें टाकावें म्हणजे झालें." ही बरी युक्ति आहे असें समजून लिहावयास बसलों. एक दोन पद लिहिले. इतक्यात वांद्ऱ्याहून एका स्नेह्याकडून, चार दिवस राहण्यास येण्याविषयीं आग्रहपूर्वक चिठ्ठी आली. माझेंही मन लिहिण्याकडे लागेना. तेव्हां म्हटलें—" बरी आहे संधि. वांद्र्यास जावें. तेथें तरी एकांतांत मन स्थिर होऊन, लिहण्याला सुचलें तर सुचेल." लागलीच बंगल्याच्या व्यवस्थापकास कळविलें कीं कांहीं कामाकरतां अमुक अमुक गृहस्थांकडे मी वांद्र्यास चार दिवस राहण्यास जात आहें. उद्यां महाराज येतील तोंवर मी भाषण

सांगा म्हणजे झालें. इतकी व्यवस्था केल्यावर मी वांद्र्यास निघून गेलों.

दुसरे दिवशीं ठरल्याप्रमाणें महाराज आले, तों प्रथम त्यांनीं माझीच चौकशी केली. परंतु माझा ठिकाण नाहीं असें पाहतांच, त्यांनीं मजकडे मुजरत मनुष्य पाठविला व भाषण जेवढें व जसें झालें असेल तसेंच्या तसेंच घेऊन येण्याविषयीं सांगितलें. पण भाषण लिहून झालें होतें कोठें ? महाराजांपुढें जाण्याची माझी तर छाती कांहीं होईना. तेव्हां मनुष्याला म्हटलें—" चल पुढें-मी सकाळीं कागद घेऊन येतों म्हणून महाराजांस सांग." तो कांहीं ऐकेना. तो म्हणाला—" तुम्हीं मजबरोबर चला किंवा मला उत्तर लिहून द्या."यांपैकीं दोनही गोष्टी माझ्यानें होतना. मग तसाच, थोडें थोडकें लिहून देऊं म्हणून बसलों. पण लेखणी चालेल तर शपथ ! डोकें एकदम चढून गेलें, अंगाला दरदरून घाम सुटला, डोळे जळूं लागले आणि घेरी आल्यासारखें वाटूं लागलें. लेखणीतर बिलकुल चालेना आणि विचारांतल्या विचारांतच तास पाऊण तास निघून गेला. बाहेर मनुष्य तिष्ठत बसला होता, तो कंटाळला आणि आंत येऊन घाई करूं लागला—" वेळ फार झाला, रावसाहेब. मला उत्तर द्या म्हणजे मी जातों. मला उशीर होतो." मला तर तो प्रतियमदूतच भासूं लागला. माझ्यानें तर जाववेना. मग एक चिठ्ठी खरडली आणि त्याच्या हवालीं केली. या चिठ्ठींत एवढाच मजकूर लिहिला.—" परम पूज्य महाराज,—कळविण्याला फार कष्ट वाटतात कीं एकाएकीं माझी प्रकृति बिघडुन गेल्यामुळें संकेताप्रमाणें भाषण माझ्यानें लिहून झालें

नाहीं. तरी याची माफी असावी" !!! मीं लिहिलें यांत एक अक्षरही खोटें नव्हतें. कारण चिठ्ठी लिहिते वेळीं खरोखरीच अशी माझी स्थिति झाली होती !

महाराजांकडून आलेला मनुष्य एकदाचा निघून गेला आणि तूर्त पाठीची पीडा टळली असें पाहून क्षणभर जिवाला विश्रांति मिळाली. पण मला आतां कृतकर्माचा फार पश्चात्ताप होऊं लागला. या वेळीं मला सगळें ब्रह्मांड आठवलें. माझ्या हातून कसकसें आचरण झालें व कसकसें मूर्खपण घडलें त्याचा नकाशा मला समग्र दिसूं लागला. जेव्हां जेव्हां निकडीची वेळ आली तेव्हां तेव्हां, "कांहीं नाहीं, कांहीं नाहीं" असें करून मी कसकसे बहाणे शोधून काढले, वेळ कसकशी मारून नेली व नेहमीं आजची गोष्ट उद्यांवर कसकशीं ढकलीत नेली हें सर्व पूर्णपणें आतां माझ्या लक्षांत आलें. महाराजांनीं आतांपर्यंत मला काय नांवें ठेवलीं असतील ? व आज चिठ्ठी पाहून ते काय म्हणतील ? मजवर त्यांचा केवढा कोप होईल ? माझ्या बुद्धिमत्तेचा, माझ्या चतुरस्रपणाचा व माझ्या कर्तृत्वाचा त्यांस जो एवढा विश्वास वाटत होता तो मीं कसा धुळीस मिळविला ! आणि त्याबरोबरच माझ्या पुढील नोकरीच्या, वैभवाच्या व नांवलौकिकाच्या सर्व आशा ज्या महाराजांच्या आश्रयावर अवलंबून राहिल्या होत्या त्या कशा समूळ उमळून पाडल्या ! हा सर्व प्रकार मूर्तिमंत माझ्या डोळ्यांसमोर उभा राहिला ! आणि मी मनाशीं म्हणूं लागलों—हे एवढे परिणाम कशाचे?—तर माझ्या आळसाचे—माझ्या घमेंडीचे—माझ्या मूर्खपणाचे!—आजची

गोष्ट उद्यांवर लोटण्याची जी खोड मीं लावून घेतली तिचे ! दुसरें कशाचे ?

भाषण तयार नाहीं हें कळतांच महाराजांनीं काय केलें—मजवर कितपत रागावले हें समजण्याची मला फार उत्कंठा होती. पण हें कळण्याला मार्ग काय ? महाराजांशीं पहिल्यानेंच संबंध जडला ती रात्र जेवढी आनंदाची गेली तेवढीच—किंबहुना अधिक कष्टाची ही रात्र मला वाटली ! मग सकाळीं पाहतों तो प्रात्याहिक पत्रांत स्थानिक वृत्ताखालीं पुढील बातमी माझ्या वाचण्यांत आली—"आज रोजीं .... संस्थानच्या विद्वान महाराजांचें 'रूढि' या विषयावर भाषण व्हावयाचें होतें, परंतु कांहीं अगत्याची तार आल्यावरून महाराजांस बाहेर गांवीं एकाएकीं जाणें जरूर पडल्यामुळें तें एक महिना तहकूब ठेवलें आहे. पुढें कांहीं होईल तो दिवस मागाहून कळविण्यांत येईल."

आणि ही बातमी वाचून थोडा वेळ झाला नाहीं तोंच पुढील चिठ्ठी आणून एका मनुष्यानें माझ्या हातांत दिली.—"कष्टानें कळवावें लागत आहे कीं महाराजांस आजचें भाषण बंद ठेवून कांहीं निकडीच्या कामानिमित्त बाहेरगांवीं निघून जावें लागलें. जातांना त्यांनीं आपल्यास कळविण्यास सांगितलें कीं, आपल्या नोकरीची तूर्त गरज नसल्यामुळें आपल्यास रजा देण्यांत आली आहे. मागील तसदीबद्दल या सोबत रु. ५० ची नोट एक, पाठविली आहे. पोंचल्याचें कळवावें. हे विनंति.—**कृष्णाजी गोविंद**, खासगीकडील कारकून."

याप्रमाणें महाराजांचा आश्रय सुटला व त्याबरोबरच पुढील सगळ्या आशाही सुटल्या. आतां ही बातमी घेऊन हिरमुसल्या तोंडानें परत पुण्यास जावें, तर तें अगदीं जिवावर आलें. मग कांहीं दिवस मुंबईतच रहावयाचा बेत केला. खरोखरींच माझें मन या वेळीं अगदीं खट्टू होऊन गेलें होतें. आणि ही जी न विसरे अशी ठेंच मला लागली तिची पक्की आठवण राहून मी पुढें कदाचित पुरतेपणीं सुधारलोंही असतों; परंतु माझ्या सुदैवानें अथवा दुर्दैवानें एकाएकीं उडी मारली आणि चीन देशच्या सफरीचा योग अचानक जुळवून दिला.

# प्रकरण ३ रें

## चीनदेशाची सफर.

आधीं होता वाग्या, मग झाला पाग्या।
त्याचा एळकोट राहिना, मूळ स्वभाव जाईना ॥

**तुकाराम.**

माझ्या कालेजामधील मित्र मंडळीमध्यें जे कित्येक तरुण पारशी गृहस्थ होते, त्यांच्यांत मिस्तर सोराबशा म्हणून एक मोठा गडबडया व विनोदी विद्यार्थी होता. सर्वांपेक्षां त्याशींच माझें फार जमत असे. मि. सोराबशा मूळचा मुंबईचा राहणारा; तथापि मुंबईच्यापेक्षां त्याच्या प्रकृतीला पुण्याचें हवापाणी चांगलें पाळत असल्यामुळें त्याचें बहुतेक शिकणें पुण्यांतच झालें. सहवासानें त्याला मराठी चांगलें येत होतें आणि त्याच्या गडबड्या स्वभावामुळें कोणाशींही त्याचा स्नेह जमण्याला फारसा उशीर लागत नसे. तथापि तो मोठा चतुर व मर्मज्ञ होता आणि कोण मनुष्य कसा आहे याची पारख त्याला फार चांगली होती. माझ्यामध्यें काय पाणी आहे हें त्यानें चटकन ताडलें असावें असें दिसतें. कारण माझ्याशीं स्नेहभाव असावा म्हणून तो नेहमी उत्सुक असे. मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें ज्या वेळीं महाराजांबरोबर माझें येणें मुंबईस झालें त्या वेळीं तोही मुंबईसच होता. मी आल्याची खबर

कळतांच तो मला मोठ्या उत्कंठेनें येऊन भेटला. आणि त्यानंतरही मधून मधून येऊन मला भेटत असे. सोराबशा आला कीं मला मोठा आनंद होई; कारण तो आला आणि त्यानें कांहीं तरी खुबीदार थट्टा करून मनाला रंजविलें नाहीं असें कधीं झालेंच नाहीं.

मि. सोराबशा घरचा चांगला सधन होता. त्याचा बाप, शेठ धनजीशा, हा मुंबईतील चार प्रसिद्ध व्यापाऱ्यांपैकीं असून, त्यांत विशेष हा होता कीं इंग्रज लोकांमध्यें त्याचें वजन फार होतें. त्याचा व्यापार मुख्यत्वें करून चीन देशाशीं होता व म्हणूनच त्याचें आडनांव "चिनाई" असें पडलें होतें. शेठ धनजीशा चिनाई याचें नांव निघालें म्हणजे सर्वांच्या तोंडून त्याच्या सज्जनपणाविषयीं व व्यापारी चतुरस्रपणाविषयीं नेहमीं नांवाजणूकच ऐकूं येत होती. त्याचा चिनाशीं व्यापारच असल्यामुळें चीन देशाला कित्येक सफरी त्याला कराव्या लागल्या होत्या. एवढ्यानेंही चीन देशासंबंधीं बरेंच ज्ञान त्याला प्राप्त होण्याजोगें होतें. परंतु त्याचा स्वभाव मोठा चौकस, जिज्ञासा फार प्रबळ, म्हणून सवडी सवडीनें चीनच्या मध्य भागांमध्येंही प्रवास करून, तत्रस्थ लोकांच्या रीतिभातींची व स्थितीची त्यानें माहितगारी करून घेतली होती. त्याला चिनी भाषा इतकी उत्कृष्ट येत होती कीं बोलण्या चालण्याची तर त्याला बिलकुल अडचण पडत नव्हती. एकंदरीनें चीन देशाविषयीं त्याच्या एवढी माहिती असलेला मनुष्य सगळ्या हिंदुस्थानांतही त्या वेळीं विरळाच सांपडला असता. सरकारामध्यें त्याचें जें एवढें वजन होतें त्याचें इंगित यांतच होतें. साधारणपणें इंग्रज लोकांपैकीं

कोणीही व्यापारी असो किंवा सरकारी कामदार असो, त्याला देशी लोकांच्या संबंधें व विशेषतः चिनी लोकांच्या संबंधें कांहीं गरज लागली तर तो पहिल्यानें शेठ धनजीशा चिनाईकडे धावत यावयाचा व त्याच्या मसलतीप्रमाणें मग सर्व तजवीज व्हावयाची. मुंबई सरकाराला तर त्याच्या सल्ला-मसलतीची वारंवार गरज लागे व तोही सरकाराची सेवा इमानें इतबारें व मोठ्या उत्साहानें बजावी.

या समयीं मुंबईहून एक 'मिशन' चीन देशांत पाठवावें म्हणून पार्लमेंटाचा ठराव झाला होता व त्या अन्वयें ताबडतोब तजवीज करण्याविषयीं विलायत सरकाराकडून मुंबई सरकारास लिहून आलें होतें. मुंबई सरकाराला शेठ धनजीशावांचून या कामाला लायक मनुष्य दुसरा कोण सापडला असता? लगेच गव्हर्नरसाहेबांनीं शेठजीस बोलावून पाठविलें व कसकशी व्यवस्था ठेवावयाची तें ठरवून, मिशनच्या मंडळीला सोय करून देण्याची व हरएक प्रकारची मदत करण्याची कामगिरी त्यांजकडे सोंपविली. यांत सरकाराचा खरोखर उद्देश काय असावा हें कांहीं एक बाहेर आलें नव्हतें. एकंदरीनें 'मिशन' ची कामगीरी मोठी नाजूक होती खचीत. बाजारगप्पा हजार चालत. यांत कांहीं गूढ राज्यकारण असावें असा कित्येक कुटाळ लोकांचा तर्क होता. वर्तमानपत्रांतील चर्चेवरून तर मिशनचा उद्देश केवळ व्यापारवृद्धीचा असल्याविषयीं जाहीर झालें होतें. आणि यास आधार मिळून एवढाच कीं गव्हर्नरसाहेबांच्या कौंसलांतील एका भाषणांत तशा अर्थाचा उल्लेख आला होता. तथापि 'कमिशनां ' तले मुख्य कामगार सर्व गोरे असून त्यांची

नेमणूक खुद्द गव्हर्नरसाहेबांनीं केली होती व तें काम करावयाचें त्याची गुणगुणही बाहेर न जाई अशी सक्त सावधगिरी ठेविली होती. स्वतः घनजीशा यांस अंतस्थ माहिती काय होती नकळे; पण तिचा सुगावा त्यांनीं कोणासही लागू दिला नव्हता. त्यांस मिळालेल्या हुकुमांत एवढेंच लिहिलें होतें कीं–“ मिशनचीं मंडळी चीन, तिबेट, सयाम व ब्रह्म वगैरे देशांच्या संबंधें व्यापारोपयोगी माहिती गोळा करील, त्यांशी व्यापार सुरू करण्याच्या काय काय सोई आहेत व कोणकोणत्या करून घेतां येतील हें ती पाहील आणि चिनाशीं सध्यां चालू आहे त्यापेक्षांही अधिक झपाट्यानें व्यापार चालू होण्यास काय काय केलें पाहिजे त्यासंबंधेंही चौकाशी करील, तसेंच सदहू देशांत बुद्ध धर्मासंबंधें जे जुनाट शिलालेख आहेत असें समजतें त्यांचे फोटो घेऊन अवांतर माहितीही मिळवील; तरी या सर्व कृत्यांत शेठ घनजीशा चिनाई यांणीं मंडळीस होण्याजोगी हरएक प्रकाराची मदत करावी व तेथील राजांकडूनही मदत मिळेल अशी तजवीज करावी. ही कामगिरी सरकार मोठ्या महत्वाची समजत आहे व यांत शेठजीस पुष्कळ मेहनत पडणार आहे हें लक्षांत आणून त्यांच्या श्रमांचे व विश्वासुकपणाचे उपकार फेडण्याचा सरकार यत्न करील. मिशनाबरोबर कांहीं देशी मदतनीस कामगार देण्याची आवश्यकता आहे, तरी अशा लायक इसमांचीं नांवें शेठजींनीं सुचवावीं म्हणजे त्यांची सरकारांतून नेमणूक करण्यांत येईल.”

शहरांत या मिशनाविषयीं हव्या तशा गप्पा चालत होत्या. चार चौघे मिळाले कीं बहुधा तेथें याविषयीं बोलणें

निघाल्यानंतर व त्यांत शेठ धनजीशाच्या देवशालित्वाची स्तुति व्हावयाचीच. शेठ धनजीशा हा माझा विनोदी मित्र सोरा-वशा याचा बाप हें मला माहीत होतें. तरी या ओळखीनें माझें कांहीं हित होईल–किंवहुना ज्या अडचणींत मी सध्यां सांपडलों होतों तींतून सुटण्याचा मार्ग मला सांपडेल असें माझ्या स्वप्नींहि आलें नाहीं. आणि खरेंच कशाला येईल? कोठें चीन देश–कोठें तें गोऱ्या लोकांचें मिशन–कोठें ते तरतरीत पारशी–आणि प्रत्येक कामांत ठेंचा खाणारा कोठें मी ? त्यांतून मला दरमाहा रु. २०० ची नोकरी असती तर मग एवढा खटाटोपतरी कोण करायला बसला होता ? पण योगायोग विलक्षण; म्हणूनच अशा गोष्टी घडल्या.

महाराजांकडील नोकरी सुटल्यावर, कांहीं दिवस मुंबईसच राहण्याचा निश्चय करून, पुढें काय करावयाचें या विचारांत मी होतों. नोकरीच्या उद्देशानें मी कित्येक सरकारी आफिसें, कंपन्यांचीं आफिसें व वकिलांचीं आफिसें हिंडलों. परंतु मनाप्रमाणें व्यवस्था कोठेंही जुळेना. मग एके दिवशीं वाचनालयांत बसलों असतां मि. सोरावशाची अवचित गांठ पडली. बोलतां बोलतां 'मिशन' ची गोष्ट निघाली आणि मींही महाराजांकडची माझी नोकरी सुटल्याची हकीगत त्याला सांगितली. तेव्हां तो म्हणाला–" कवीश्वर, तुमची मर्जी असली आणि परक्या दूर देशीं जाण्याला तुम्ही तयार असलां तर एक बरी संधि आली आहे. हल्लीं चीन देशाला जें मिशन जात आहे त्यांत, मी बाबांला सांगून, तुमची योजना करवितों. अनायासें देश पहावयाला सांप-

डेल व **बौद्ध**धर्मासंबंधी कांहीं नवी माहितीही करून घेतां येईल. ”

**मि. सोराब**शाचे हे शब्द ऐकतांच माझ्या मनांत चटकन एक विचार आला आणि मीं लगेच त्याच्या म्हण-ण्याला रुकार दिला. मग आम्ही तसेच उठलों ते त्याच्या बापालाच जाऊन भेटलों. मि. **सोरा**बशानें आपल्या बापास माझी माहिती सांगीतली व नोकरी मिळावी म्हणून माझी इच्छा आहे असें कळविलें. ती गोष्ट **धन**जीशा शेठजीला पट-ली असें दिसलें. त्यानें दोन तीन वेळां मान हालविली व माझ्याकडे जरा रोखून पाहून म्हटलें–“ हा तात्या ! आ-माला तुमचा सारा अदमची जरूरीयात हाय ने तेसाठीं आमी **क**लकत्याला कोई सान्स्कृत जाणणार बाबूचंदरजी मगाविला हाय. पण तुमीं खुशी असल तर तुमची नेमणूक करणेला नामदार साहेबला लिखेल.” यावर, “ लिहा तर शेठ-जी, माझी खुशी आहे. ” असें मीं म्हटलें. त्यानें माझें नांव गांव आपल्या स्मरणवहींत टिपून घेतलें; आणि “ तुमची ‘ फर्स्ट नेटिव क्लार्क ’ चे जाग्यावर पगार रुपये ३०० वर नेमणूक होईल. तुमी आतां आपले तैयारीला लागावे. तुमी कवां ने कोठे यावा ते तुमाला तुमचे पत्यावर कळविण्यांत येल. तुमी जावे. साहेबजी ” असें म्हणून स-लाम करून तो उठला आणि त्याचेसाठीं दोन घोड्यांची गाडी दारांत उभी होती तींत बसून चालता झाला.

**मि.** सोराबशाचे मी फार फार उपकार मानिले, व, त्याची रजा घेऊन, विन्हार्डी आलों. मनांत मी अगदीं खुश खुश झालों होतों. मूर्खपणानें मी हातची एक शिकार घाल-

खिली खरी तरी देवानें वाढलें ताटच हें आणून पुढें ठेवलें असें मला वाटलें. आतां मीं निश्चय केला कीं झालें तें झालें, यापुढें तरी फार दक्षतेनें वागायचें; अगदीं हयगय करायची नाहीं—निदान महत्वाची गोष्ट तरी आजची उद्यांवर टाकायची नाहीं.

चीनची सफर करण्याची ही आलेली संधि दवडायाची नाहीं हें तर मीं पक्कें ठरविलेंच. तरी हा ठराव अमलांत आणण्याला बऱ्याच हरकती येण्याचा संभव होता. पहिली मोठी हरकत माझ्या बाबांच्या रुकाराची. त्यांना माझा हा ठराव कांहीं आवडण्यासारखा नव्हता. ते माझ्या जाण्याला खास मोडती घालतील असें मीं अगोदरच भविष्य केलें होतें. एक तर त्यांची भारी इच्छा होती कीं मीं 'आडव्होकेट' ची परीक्षा द्यावी आणि हायकोर्टाची वकीली करावी. ही इच्छा अगदीं निष्फळ होणार. अर्थात हिच्या बरोबरच—मी कोणी मोठा अलौकिक पुरुष होणार अशी त्यांस जी मोठी आशा होती तीही लयं पावणार ! कुणीकडे चीन, कुणीकडे पुणें ? एवढ्या लांब मला पाठवून स्वतांला घोरांत पाडण्याला त्यांनीं कां म्हणून तयार व्हावें ? अपत्यविरहाचें दुःख त्यांस कसें सहन व्हावें ? शिवाय जातीच्या बहिष्काराची अडचणही थोडी बहुत तरी येणारच. अशा आणखीही कांहीं काल्पनिक व कांहीं खऱ्याखऱ्या, तशाच कांहीं ज्ञातीच्या व कांहीं घरगुती अडचणी माझ्या जाण्याला प्रतिकूळ होत्या व त्या माझ्या लक्षांत येऊनही चुकल्या होत्या. परंतु बाबांच्या या सर्व अड-

चर्णांचें खंडन मीं यथास्थित केलें व तेंही एका लहानशा सोप्या युक्तीनें केलें.

मी म्हणालों–"चीन देशाच्या सफरीची संधि वारंवार येणारी नाहीं. तिच्या पासून आपल्यास काय काय लाभ होतील ते उघड उघड दिसत आहेत. जातीची अडचण एवढी म्हणण्यासारखी नाहीं. शेंकडों लोक एडनला व झांजीबारला जाऊन येत आहेतना? त्यांतून मजप्रमाणें दुसरे बरेच हिंदु गृहस्थ यावयाचे आहेत. जेवणाखाणाची थोडीशी नीट व्यवस्था ठेवीन म्हणजे झालें. याशिवाय मला तर असें वाटतें कीं दुसऱ्याकरतां निबंध लिहिणें, ज्या विषयांची आपल्यास गोडी नाहीं त्यांविषयीं विचार करकरून भाषणें तयार करणें, असल्या नोकरीच्या पाठीस लागून आपल्या मेंदूस शिणविण्यापेक्षां, देशाटन करून नवे नवे प्रदेश पहावे, नव्या नव्या लोकाचाराची माहिती करून घ्यावी, नव्या नव्या राज्यपद्धतीचें मनन करावें आणि असें करून आपल्या बुद्धीला तीव्रता आणावी हें मला बरें वाटतें. दुसऱ्याकरतां खपण्यांत व हमाली करून बुद्धीचा अपव्यय करण्यांत काय अर्थ? आपल्यास ठाऊकच आहे—

केल्यानें देशाटन, पंडितमैत्री, सभेंत संचार, ।
शास्त्रग्रंथविलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार ॥

मी जो हा चीनचा प्रवास करणार त्यांत हे सर्व लाभ होणार आहेत. कसे ते पहा. दूर देश पहावयाचा—मुत्सद्दी, विद्वान, व्यापारी अशा थोर लोकांच्या भेटी व्हावयाच्या—चीनच्या राजदरबारीं संचार व्हावयाचा—चीनसारख्या पुरातन देशांतील शास्त्रग्रंथांची माहिती करून घ्यावयाची—

तात्पर्य बुद्धीचा व्यापार अखंडित चालून, ज्यांच्या योगानें चातुर्य यावयाचें, अशाच गोष्टींची एथें संपूर्ण अनुकूळता आहे. माझ्या मनाचें वळण तर या बाजूकडे आहे. याच बाजूनें मीं आपल्या मनाला जाऊं दिलें तरच, मला वाटतें, मला कोणत्याही उद्योगांत यश येईल. आणि जिकडे मनाचें वळण तो उद्योग करावा म्हणजे चांगला साधतो असा अनुभव आहे. आतां एवढें खरें कीं या चीनच्या सफरींत मला अधिक उणे श्रम पडतील व थोडा बहुत त्रासही सोसावा लागेल. पण त्यांचें काय? आवड गोड असल्यामुळें त्यांचा एवढा विचार करणें नलगे. तशांत या सर्व श्रमांचा व त्रासाचा निराळयाच तऱ्हेनें वचपा काढण्याचें मीं योजलें आहे. एवढ्या श्रमांनीं जी माहिती मी मिळवीन, शोधक बुद्धीनें ज्या गोष्टींचें मी अवलोकन करीन, तात्विक दृष्टीनें ज्या ज्या रीतिभातींचें, व राज्यपद्धतींचें मी मनन करीन—तात्पर्य या प्रवासांत जो जो अनुभव मला प्राप्त होईल तो सर्व एकत्र करून, एक भला थोरला छानदारसा ग्रंथ रचण्याचें मीं मनांत आणलें आहे. माझी खात्री आहे कीं मनांत रेखून ठेवल्याप्रमाणें जर हा ग्रंथ तयार झाला तर तो विश्वसनीय, माहितीनें भरलेला, मनोरंजक, उपयुक्त व प्रमाणभूत असा होऊन लोकांस प्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं. त्याची कमींत कमी पांचशें साहाशें तरी पानें भरतील. त्यांत आणखी नव्या नव्या मौजेच्या वस्तूंचीं व स्थळांचीं चित्रें विलायतेहून मुद्दाम तयार करवून आणून घातलीं म्हणजे तर मोठी बहार होईल. एकंदरीनें हा ग्रंथ आपल्या इकडे केवळ अपूर्वाईचाच होईल. मग कोणा मोठ्या शेठियाला किंबहुना खुद्द गव्हर्नर साहेबांलाही

तो समर्पण करतां येऊन, नांवलौकिक व पैसा अशी दोहों-चीही सहजीं जोड करून घेतां येईल ! ”

मीं जें वाक्पांडित्य केलें त्यांतला पहिला भाग बाबांस बिलकूल पसंत पडला नाहीं. प्रथम प्रथम तर मला ते पुढें बोलूं सुद्धां देतना. परंतु जेव्हां मी ‘ मनाच्या वळणाची व बुद्धीच्या तीव्रतेची गोष्ट ’ काढली तेव्हां मात्र त्यांचा राग जरा शांत झाला. आणि नवीन ग्रंथ तयार करण्याची कल्पना जेव्हां मीं सांगीतली तेव्हां तर ती त्यांच्या फार पसंतीस आली असें दिसलें. आमच्या बाबांच्या संबंधानें खरें म्हटलें तर ‘ मनाचें वळण ’ आणि ‘ बुद्धीची तीव्रता ’ या शब्दांत कांहीं अजब जादू भरलेली होती. कारण ह्या शब्दांपुढें त्यांच्या विचारशक्तीची गति बहुतेक कुंठित झाल्या-सारखीच होई हें मला ठाऊक होतें. तशीच नवीन ग्रंथ रचण्याची कल्पना तर, मि. सोराबशा यानें चीनच्या मिशनांतील नोकरीची गोष्ट सुचविली, तेव्हांच माझ्या मनांत आली होती व ती बाबांच्या मनाचें समाधान करण्यास चांगली उपयोगी पडेल हें मी अगोदरच ताडलें होतें. याच कारणास्तव या दोनही खंडनाच्या तीक्ष्ण शस्त्रांचा उपयोग मीं समजून उमजून शेवटीं केला आणि त्यांचा प्रभावही माझ्या मनाप्रमाणेंच तंतोतंत प्रत्ययाला आला.

माझा फारच आग्रह पाहून बाबा म्हणाले—“ तुझ्या मनाचें वळणच तसें असलें तर जा बापडा. माझी ना नाहीं. बाकी जे बुद्धिमान आसतात ते असेच साहसिक असतात, म्हणा. आतां एक गोष्ट मात्र नीट ध्यानांत धर बरें. बरोबर स्मरण–वह्या बाळगण्यास विसरूं नको आणि

जहाजावर पाय ठेवल्यापासून जें जें तुझ्या पाहण्यांत येईल त्याचें नीट टिपण करून घेत जा. कारण तुझा जो पुस्तकाचा मनोदय आहे तो सफळ व्हावयाला हींच टिपणें मुख्यत्वें करून उपयोगी पडतील. यांत हयगय अगदीं होतां कामा नये. तर्क, कल्पना, विचार वगैरे गोष्टी मागाहून दाखल करतां येतील. पण माहिती टाचून घेणें ती जेव्हांची तेव्हांच घेतली पाहिजे. बाकी तुझी बुद्धि चांगलीच आहे, म्हणा. तेव्हां तुला विशेषसे श्रम पडतील असें नाहीं. तरी इकडे थोडें लक्ष असूं दे म्हणजे झालें, ”

मी बाबांची समजूत केली– “ कांहीं नाहीं ! एवढं काम कां माझ्यानें होणार नाहीं ? मी अशीं सुरेख टिपणें करून घेइन कीं तीं मागें पुढें जुळलीं व मध्यें मध्यें थोडे थोडे मार्मिक विचार गोंवून दिले कीं झाला ग्रंथ तयार ! पांचशें साहाशें पानें म्हणजे काय ? सहज भरून जातील. एवढ्यांत तरी सारी माहिती येईल कीं नाहीं याचाच मला संशय आहे. ”

बाबांची संमति मिळतांच मी प्रवासाच्या तयारीला लागलों. इतक्यांत शेठ धनजीशा चिनाई यांच्या कडूनही पत्र आलें. “ तारीख .... रोजीं मुंबईस येऊन ‘टौन हाल’ मधील हपीसांत कर्नल .... यांस भेटावें म्हणजे ते ‘ मिशन ’ च्या मंडळीची गांठ घालून देतील,” म्हणून त्यांत लिहिलें होतें. निवण्याच्या तारखेला बरोबर दोन आठवड्यांचा अवधि होता. मीं मनाशीं म्हटलें–“कांहीं नाहीं. पुष्कळ वेळ आहे. सामान सुमान तें काय बांधून घ्यावयाचें आहे ? चार स्मरणवह्या, कांहीं पुस्तकें आणि चालीचा लत्ताकपडा, एवढेंचना ! त्याला किती उशीर !

त्याच्या अगोदर, चीनच्या ' अमरनाथ ' म्हणविणाऱ्या बादशाहाला भेट नेण्यासारख्या व तिकडील लोकांस पाहण्याची उत्कंठा वाटेल अशा कांहीं वस्तु मिळाल्यास पाहूं या. " असें म्हणून, पोशाख घालून, बाहेर पडलों. प्रथम चित्रशाळेंत जाऊन तपास केला. त्यांत चीनी बौद्धांनीं पवित्र मानलेलें जें ' बुद्ध गया ' नांवाचें क्षेत्र त्याच्या वर्णनाचें पुस्तक व तेथील देवळाच्या कित्येक तसबिरी मला मिळाल्या. त्यानंतर बुद्ध, शंकराचार्य वगैरे कित्येक धर्मप्रचारक गुरूंच्या तसबिरी, ताजमहाल, वेरूळचीं लेणीं वगैरे स्थळांच्या तसबिरी व तत्संबंधी माहितीचीं पुस्तकेंही मीं मिळविलीं. ही सगळी सामुग्री घेऊन आमची स्वारी वरीं आली. मग रात्रंदिवस चीनच्या प्रवासाचा ध्यास लागला. प्रवासांत काय काय पहावयाला सापडेल? काय काय अडचणी येतील? कोणा कोणाच्या भेटी होतील? आपणास कसकसें वागावयाचें? कसकशीं टिपणें करून घ्यावयाचीं? या संबंधेंच सारे तर्क, साऱ्या कल्पना, सारे विचार मनांत घोळूं लागले! सकाळीं उठल्यापासून तों रात्रीं निजे तों पर्यंत दुसरी गोष्ट नाहीं. कांहीं मला सुचेचना. बसतां उठतां, खातां पितां, चालतां बोलतां—बस, एकच गोष्ट—चीनचा प्रवास! आमचे बाबा मात्र, क्षणक्षणीं, बरोबर न्यावयाची चीजवस्त सावकाशानें बांधून घेण्याविषयीं व काय पाहिजे, काय नको, अजून काय आलें नाहीं याची चौकशी करण्याविषयीं सूचना करीत होते.

**या** प्रमाणें ही अवांतर सामुग्री मिळविण्यांत व इष्टमित्रांच्या भेटी घेण्यांत पहिला आठवडा तर गेला. मग दुसऱ्या

आठवड्यांत काय विचारतां ?–एकच धांदल ! ‘ सामान-सुमान तें काय घ्यावयाचें आहे ! ’ असें आरंभीं मला वाटत होतें, पण तें आतां, एक एक करतां करतां, खंडीभर जमलें. तरी अजून कपडे शिंप्याकडे दिले होते ते यावयाचे होते, बूट घेतलेच पाहिजे होते, स्मरणवह्या अजून बांधवाव-याच्याच पडल्या होत्या. हें एवढें सामान तयार होऊन आतां य-णार केव्हां आणि मी तें व्यवस्थेनें, लौकर सांपडे असें, बांधणार केव्हां ? सगळीच तारांबळ ! मग एकच धावाधाव आणि ओ-रडाओरड मीं मांडली! लांबचा प्रवास–तेथें अमुक वस्तु ला-गली तर काय मिळाणार आहे ? “अरे, शिंप्याला बोलवा, मो-च्यानें बूट आणून दिले कीं नाहीं? बुक-बांधणारानें माझ्या वह्या आणल्या कीं नाहीं ? त्या दुकानदारानें प्रवासी कलमदान पाठवून देण्याचें कबूल केलें होतें तें पाठविलेंसें दिसत नाहीं कोठें ?–काय गुलाम लबाड आहेत सगळे ! आजच्या आज ह्या वस्तु पाहिजेत म्हणून मीं बजावून सांगितलें असतां ते त्या मी निघून गेल्यावर उद्यां पाठविणार कीं काय ? किती यांचा कारखाना आळसट ! हे मला आतां आयते वेळीं फसवणार व तोंडघशीं पाडणार खचीत ! ” असें म्हणून मी त्यांस चापून शिव्या देऊं लागलों व त्यांच्या नांवानें खडे फोडूं लागलों. परंतु मीं थोडाच विचार केला कीं हें सारें फळ माझ्याच आळसटपणाचें व आजची गोष्ट उद्यांवर ढकलण्याचें होय !

खरें म्हटलें तर या वेळीं माझें मन नुसतें बावरलें होतें. तें तिळभर सुद्धां ठिकाणावर नव्हतें. मी बोलतों काय व करतों काय ?–घ्यायचें काय आणि न घ्यायचें काय ?–हें मला कांहीं एक कळेना. अशा स्थितींतच आणखी बाबांनीं, आईनें, आ-

जीनें मधून मधून--' मुला, अंमळ इकडे येऊन जा ' अशा हाका माराव्या. त्यांतच बाहेर, मोच्यानें, शिंप्यानें किंवा दुसऱ्या कोणीं अमुक अमुक वस्तु आणल्याची वर्दी द्यावी--त्यांतच कोणी आप्तमित्र भेटायला यावा आणि 'भाऊ साहेब, पत्रबित्र लिहीत जा, समाचार कळवीत जा, प्रकृतीला जपत जा, आणि मिळाली तर अमुक वस्तु आमच्यासाठीं चिनांतून आणण्याला विसरूं नका बरें ' असें बोलतच असावें. इतक्यांत पटकन मनीनें (मांजरीनें) टेबलावर उडी मारून कांहीं वस्तु पाडाव्या; किंवा माझाच धक्का लागून कांहीं बिघडावें !

मला जिच्याविषयीं अतिशय काळजी होती अशी गोष्ट म्हटली म्हणजे स्मरणवह्यांची व टिपणांची. कारण या प्रवासाच्या हकीगतीचें पुस्तक तयार करून देईन म्हणून मीं बाबांस कबूल केलें होतें, आणि याच वह्यांतील टिपणांवरून आमच्या पुस्तकाची इमारत उठावयाची, यासाठीं या टिपणांची व वह्यांची नीट व्यवस्था ठेवणें फारच अगत्याचें होतें. माझा तर बेत होता कीं लॉकनें आपल्या शिक्षणावरील निबंधांत जशीं टिपणें ठेवावीं व स्मरणवह्या बांधाव्या म्हणून सांगीतलें आहे तसें करावयाचें; त्यांत अंतर पडूं द्यावयाचें नाहीं. यासाठीं बांधवून आलेल्या वह्यांपैकीं एक घेऊन मीं आंखण्यासाठीं टेबलाशीं बसलों. तांबडी, काळी शाई व टिपकागद वगैरे जवळ ठेवले; आणि आखूं लागलों, तों तांबडी शाई झाली पातळ, रेघ कांहीं स्पष्ट उठेना; बरें जरा दाबून टांक ओढावा तर शाई फार

पडून ओघळ पडावा, त्यानें कागद चित होऊं लागले म्हणून टिपकागदानें टिपूं लागावें तों ते लौकर शाई पीईतना. त्यांना काय ? मी मोठा बुद्धिमान झालों म्हणून त्यांना थोडीच बुद्धिमानाची पर्वा ? पातळ शाईला तरी स्पष्ट उठण्याची व चीत न होऊं देण्याची बुद्धिमानाची कां भीड पडावी ? मला वाटलें होतें कीं मी हं हं म्हणतां वह्या आंखून टाकीन; परंतु जों जों मी घाई करूं लागलों तों तों काम अगदींच बिघडूं लागलें व जों जों कागद चीत होऊं लागले तों तों माझा हात जास्तच कांपूं लागला. अशा रीतीनें बस्तान नीट बसत नाहींसें पाहून मला मनांत भारी संताप आला व तसाच नेट धरून घाईघाईनें आखूं लागलों तों इकडे न समजतां पटकन ढका लागून तांबडे शाईची दौत लवंडली ! निरुपायाची गोष्ट. मी एवढा बुद्धिमान खरा, तरी अखेरीस, एवढा वेळ फुकट मोडूनही मला आंखणें बंद करावें लागलें. मग मीं आपलें मनाचें समाधान केलें—" कांहीं नाहीं. धांदलींत कोणतेंही काम नीट होत नाहीं. बोटींत बसल्यावर मग स्वस्थपणानें वह्या आंखतां येतील. आतांच काय त्यांवांचून अडलें आहे ? " असें म्हणून वही दिली बाजूला फेकून, आणि बांधाबांधीला लागलों. इतक्यांत हा काय घोटाळा इकडे झाला पहा ! या वेळीं चारी बाजूंनीं अशी ओढाताण चालली असतां माझ्या मनाची किती विलक्षण स्थिति झाली असेल याची वाचकांस सहज कल्पना करतां येईल.

**धांदल** ही मूर्खपणाची बहीण आहे, असें म्हणतात तें खोटें नाहीं. धांदलीनें अगदीं सोपें कामही

करायला कसें जड जातें हें सर्वांस माहीतच आहे. परंतु एखाद वेळ धांदलींत मोठी भयंकर गोष्टही, ध्यानीं मनीं नसतां, चटकन हातून घडून जाते. मागाहून तिचा पुष्कळ पस्तावा झाला तरी उपयोग काय? या धांदलींत माझ्या हातूनही अशीच एक गोष्ट घडली. ती एवढी भयंकर जरी नसली तरी तिचा चटका माझे जिवाला लागून राहिला आहे. तिची आठवण झाली कीं अझूनही माझें मन मला खाऊं लागतें. गरीब बिचारी **माई**—माझी सात आठ वर्षांची धाकटी वहीण ! ती या वेळीं घरांतून मावशीचा कांहीं निरोप मला घेऊन आली होती. ती एक-सारखी मोठ्या उत्सकतेनें मला हाका मारीत होती. मी मोच्यानें आणलेला बुटांचा जोड तोंडोंतोंड भरलेल्या पाकि-टांत कोंबींत होतों. **माई**ला उत्तर द्यावयालाही मला वेळ नव्हता. इतक्यांत त्या बापडीचा पाय, पोरस्वभावानें, नुक-त्याच आणून ठेवलेल्या स्मरणवह्यांच्या ढिगाला लागून, तो ढीग कोसळला. त्याबरोबर मला इतका राग आला कीं मीं हातांतला बूट ताडकन तिच्या बापडीच्या तोंडावर फेकला ! बुटाचा फटका चांगलाच बसला. **माई**नें एकदम किंकाळी मारली. त्यासरशी बाबा, आई, आजी, मावशी वगैरे घरांतली सर्व मंडळी, मी दिवाणखान्यांत होतों तेथें धावून आली. त्यांनीं काय झालें म्हणून चौकशी केली—पाहतात तों तिच्या तोंडातून रक्त येत आहे व एक दांतही गळून पडला आहे. आई इतकी घाबरली कीं तिच्या तोंडांतून शब्दही निघेना. आजीनें व मावशीनें मात्र फडाफड बोलबोलून मला पाण्या-पेक्षांही पातळ केलें. आणि बाबा मला कधीं बोलायचे

नव्हत पण तेही ' पोराची अक्कल अगदीं जात चालली ' अशा अर्थाचें कांहीं अगडतगड दोन शब्द रागानेंच बोलले. पण इतरांनीं कशाला बोलायला पाहिजे ? ' मीं दुष्टानें काय हें विघ्न उभें केलें ? ' म्हणून मी मलाच बोल लावून घेऊं लागलों. झाल्या गोष्टीचें माझें मलाच वाईट वाटूं लागलें. किती गरीब पोर !–किती गोड मुलगी ! तिच्यावर माझी किती प्रीति ! तिला का मी मारणार ? एक तर काय ?–पण शंभर अपराध तिनें केले असते तरी तिच्यावर माझा हात वाहला नसता ! पण होऊं नये ती गोष्ट चटकन होऊन गेली.

मग मी लागलाच धावून **मा**ईला उचललें, तिचें तोंड धुतलें, आणि कितपत लागलें, कोणता दांत पडला वगैरे पाहिलें. तेव्हां समजलें कीं इजा फारशी झाली नसून दोन तीन दिवस हलत होता तोच दांत धक्का लागून पडला. **माई** पण रडायाची थांबली. बरें थोडक्यावरच गेलें, असें पाहून मला जरा बरें वाटलें. घरांतली माणसें गेल्यावर घटका-भरानें तिला जवळ घेऊन व तिचे तोंडावरून हात फिरवून मीं म्हटलें–" हें बघ **माई**, किनई मी उद्यां लांब, दूर जाणार आहें, तिकडून जेव्हां येईन तेव्हां माझ्या **मा**ईला पहा कशी छानदार चिनई बाहुली घेऊन येईन ? रडूं नको बरें, बये. मी तुला आतां कद्धीं कद्धीं मारणार नाहीं ! हा घे खाऊ, आई जवळ नेऊन दे. " असें म्हणून तिच्या हातावर चवली ठेवली व तिला घरांत लावून देऊन मी आपल्या बांधा-बांधीच्या कामाला लागलों.

वरील गोष्ट अगदीं क्षुल्लक दिसते खरी. तरी तिची आठवण मला पक्की राहिली व म्हणूनच ती मी इतकी सविस्तर सांगितली. याचें कारण, एक तर ज्या माईला मी कधीं दोन बोटांची थपाटीही लाविली नाहीं, इतकी जीच्यावर माझी माया, तिला मजकडून विनाकारण जी एवढी इजा पोंचली, ती अझूनही माझ्या जिवाला खाते आहे. तिची आठवण बुजावी कशी? दुसरें असें कीं अगोदरच माझी धांदल उडाली होती, तशांत आणखी माईच्या या घोटाळ्यानें कमींत कमी माझे दोन तीन तास व्यर्थ मोडले. दुष्काळांत तेरावा महिना तशी गत. यामुळें अखेर असें झालें कीं वेळेवर बांधाबांध कांहीं धड झाली नाहीं आणि माझें जाणें त्या दिवशीं राहिलें. हे एवढे परिणाम कशाचे? तर माझ्या धांदलीचे--आणि--आणि परंपरेनें, आजची गोष्ट उद्यांवर ढकलण्याच्या द्वाड खोडीचे. ! दुसरे कशाचे ?

मग मी दुसरे दिवशींचे गाडीनें गेलों. वास्तविक अदले दिवशींच मुंबईस जाऊन हजर व्हावयास पाहिजे होतें; म्हणजे रीतीप्रमाणें सर्वांच्या भेटी होऊन सर्वजण मिळून दुसरे दिवशीं बोटीनें जावयास मला सांपडलें असतें. आणि मला आलेल्या पत्रांतही अदले दिवशींच येऊन भेटण्याविषयीं लिहिलें होतें. परंतु माझ्या आयते वेळचे धांदलीनें मला तसें येतां आलें नाहीं. मग मीं आपल्याशीं म्हटलें--"कांहीं नाहीं. बरोवर दहा वाजतां मंडळी निघेल, तों आपण आयते वेळीं एकदम हापिसांत जाऊन उभे राहूं म्हणजे झालें. अगोदर भेटून तरी काय करावयाचें आहे ?"

**मग** जेम तेम करून, घरच्या मंडळीचा निरोप घेतला आणि आमची स्वारी रात्रीस मेलगाडींत तर येऊन बसली. गाडी चालू झाली, आणि मध्यंतरीं कोठें हरकत आली नसती, तर मी पहाटे पांच वाजतां **मुंबईस** जाऊन खुशाल पोंचलों असतों व, ' मिशन ' ची मंडळी बोटीवर जावयास निघावयाची, तों मीही त्यांस जाऊन मिळालों असतों. परंतु आमची गाडी वाटांत रिव्हर्सिंगवर आली, तों अगोदरच माल-गाडीचे कांहीं डबे रुळावरून घसरून पडल्यामुळें मार्ग नादुरुस्त झाला होता. अर्थात् तो दुसरी गाडी जाण्यासारखा दुरुस्त होण्याला तीन चार तास लागले. आम्हाला तों पर्यंत, उगडच, तेथेंच कुचंबत पडावें लागलें. आतां कांहीं आपल्याला वेळेवर पोंचता येत नाहीं; उशीर लागणार आणि सगळा बेत फिसकटणार खचीत, असें पाहून माझा जीव प्रतिक्षणीं खालीं वर होत होता. वारंवार मीं आपल्या खिशांतलें घड्याळ काढून पाहावें, व कोणी गार्ड, कोणी स्टेशनावरील मास्तर, कोणी कारकून अथवा कोणी यःकश्चित पोर्टर का चालला असेना, तरी त्याच्या पाशीं गाडीला झालें काय म्हणून चौकशी करावी. परंतु मी कितीही बुद्धिमान असलों तरी आगगाडीला थोडीच माझी कींव यावयाचा संभव होता ! गाडी उशीराच निघाली ती **मुंबईस भायखळा** स्टेशनावर सकाळचे सुमारें आठ वाजतां पोंचली. त्या वेळीं **मुंबईत** हें एकच स्टेशन होतें. मी गाडींतून उतरलों. मजबरोबर सामानसुमानाचीं पाकिटें, पेटारे वगैरे बराच बोजा होता, तो काढवून, ताजे व चपळ दिसणाऱ्या घोड्याच्या व्हिक्टोरियेंत बसून मी एकदम टौन-हालाकडेसच गेलों आणि कर्नल ..... साहे-

यांचा शोध करूं लागलों. साडे दहाचा वेळ झाला नसल्या-मुळें हपीस बंद होतें. तेथें पंधरा मिनिटें मला कोणी भेट-लेंच नाहीं. मग तिकडून एक पटेवाला आला, त्याच्या पाशीं चोकशी करतां त्यानें सांगीतलें, कीं साहेबानें काल रोजीं तुमची फार वाट पाहिली. शेवटीं आज सकाळींच 'मिशन' ची मंडळी 'धी लायन' (जलकेसरी नामें) बोटीवर चढली. बोट बरोबर दहा वाजतां पालव बंदरावरून हाकारावयाची आहे. तुम्ही इतक्यांत घाई करून गेलां तर कदाचित मंडळीला गांठाल."

मग मी तसाच, तें सामानाचें लटांबर बरोबर घेऊन, पालव बंदरावर गेलों, आणि 'धी लायन' नांवाची बोट गेली कीं आहे म्हणून तपास करूं लागलों, तों कोणी कस्टमच्या कारकुनानें सांगीतलें कीं ठरल्याप्रमाणें बोट ब-रोबर दहा वाजतां नांगर उचलून नुकतीच चालती झाली— सुमारें पंधरा मिनिटें झालीं ! मी घड्याळ काढून पाहिलें, तों खरेंच, साडे दाहाला दाहा मिनिटें कमी होतीं !

माझी सर्व प्रकारें अशी फसगत झालेली पाहून मी मनांत फार खट्टू झालों आणि अगदीं गांगरून गेलों. आलों कशाकरतां आणि आतां पुढें करावें काय हें कांहींच मला क-ळेना, आणि मी वेड्यासारखा इकडे तिकडे पाहूं लागलों. अशी माझी अवस्था पाहून सर्वांस माझी फार फार दया आली. जो तो आपापल्यापरी माझ्यापाशीं येऊन चौकशी करूं लागला. कोणी कांहीं विचारावें, कोणी कांहीं विचारावें; इतक्या सर्वांला मी एकटा कोठवर पुरा पडूं ? मग मी त्यांस कांहीं तरी, हो ना म्हणून उगाच रहावें. त्यावर त्यांनीं मग आपले तर्क चालवून

मला हवा तसा उपदेश करावा. 'तुम्ही आतां असें करा' 'तुम्ही आतां तसें करा' म्हणून प्रत्येकानें म्हणावें. सर्वांस एवढें चांगलें कळत असतां, मला मात्र, खरें म्हटलें तर, खरोखर करावें काय हें मुळींच तेव्हां कळत नव्हतें. सर्वजण जें बोलत होते तें आपापल्यापरी, माझ्या कळवळ्यानें व मला साहाय्य करण्याच्या सद्धेतूनेंच बोलत होते. तथापि त्यांच्यांत कित्येक टवाळ लोकही होते, ते माझ्याकडे पाहून टीका करूं लागले व मला नांवें ठेवूं लागले. आणि जे अंमळ दांडगे होते, ते तर 'तात्या, आतां घरीं जा. बोटीवर चढायचें होतें तर घरांतून जरा लौकर निघावें कीं नाहीं? आतां उभे राहून काय करतां?" असें तोंडावर साफ म्हणूं लागले. याप्रमाणें माझ्या सभोंवती जमून सर्वांनीं कावकाव करून सोडलें असतां, त्या कष्टमच्या कारकूनानें, मी कोठून आलों, कोठें जायचें होतें वगैरे हकीगत जरा कळवळ्यानें विचारली व त्यास ती मीही सांगितली, त्यावर तो म्हणाला—"माझ्या माहितीप्रमाणें, 'धी लायन' ही आगबोट उद्यां गोव्यास पोचल्यावर दोन दिवस मुक्काम करणार आहे. तर तुम्ही येत असल्याविषयीं तुमच्या साहेबांस तारेनें कळवा आणि उद्यांच्या निकल कंपनीच्या बोटीनें त्यांस गोव्यास जाऊन गांठा."

ही मसलत मला पसंत पडली. आणि मी आतां परत जाणार तों कांहीं लोक होडींतून कांठावर येऊन उतरले. त्यांत चार पांच शिपाई, दोन कारकून, व एक शेठ धनजीशा चिनाईचा मेथा अशी मंडळी होती. मला पाहतांच मेथ्यानें मला ओळखलें, आणि दोष देण्याच्या स्वरानें मला

तो म्हणाला-"काय, रावसाहेब ! कालपासून साहेबानें किती वेळां तुमची चौकशी केली. आज सकाळीं तरी बंदरावर तुमची गांठ पडेल म्हणून सर्वांस आशा होती. शेवटीं तुम्ही नाहीं असें पाहून साहेब फार संतापला व शेठजी हिरमुसलें तोंड करून खालीं पहात राहिले. त्यांनीं मला सांगितलें आहे कीं तुम्ही भेटलांच तर ताबडतोब तुम्हाला रवाना करून द्यावें म्हणून. तर आज तुम्ही थांबा. दोन दिवशीं 'थ्री अलायन्स' (संगमकारी) बोट 'मिशन' चें कांहीं विशेष सामान घेऊन जावयाची आहे, तिच्यांतून तुम्ही आतां जा. त्यांची आगबोट मधली बंदरें करीत जाईल व तुमची मागाहून निघून तडक कोलंबोला जाईल. शेवटीं मंडळीची व तुमची कोलंबो येथें गांठ पडेल. तुमच्या बरोबर आणखी कांहीं शिपाई, कारकून वगैरे मंडळीही यावयाची आहे."

या बातमीनें माझ्या मनाला पुष्कळ धीर आला. मी म्हणालों-" उद्यां तर उद्यां. आजच्या बोटीनें गेलों तरी एकच आणि उद्यांच्या बोटीनें गेलों तरी एकच. उलट, उद्यांच्या बोटीनें गेलों म्हणजे मध्यंतरीं कोठें उतरायाला नको आणि कांहीं त्रास करायला नको. येथें बसलों कीं एकदम कोलंबोला मुक्काम. तेथें सर्वांच्या भेटी होतीलच. चिनास जायचें तें सर्वांस एकदमच जायचें. त्यांत कांहीं अंतर नाहीं. ठीक आहे ! नशीब असलें म्हणजे आडवें आलें तरी सरळ होतें, नाहीं तर सरळाचेंही आडवें होतें, म्हणून म्हणतात तें असें. बाकी मला वाटलेंच होतें कीं मला मुंबईस यावयाला उशीर होणारच आणि माझ्याप्रमाणें कोणी तरी मागाहून जाणारा भेटणारच. आणि तसेंच झालें, पहाना ! "

आतां मीं विचार केला कीं याउपर राहण्याला शहरांत जायचें नाहीं; न जाणों कांहीं निमित्तानें उशीर झाला तर! यासाठीं आतां या मेथ्याकडे कोटांतच राहवयाचें आणि इतर लोक निघाले कीं त्यांच्याबरोबरच आपणही निघावयाचें. हा मेथा जातीचा हिंदु होता. त्यानें माझ्या राहण्या सवरण्याची व्यवस्था फार चांगली ठेवली. मीं पाहिलें तों मेथा जरी बाहेरून साधारण मनुष्यसा वाटे तरी त्याचें घरडें बरेंच जड दिसलें. त्याच्या घरची टापटीप विशेष आणि रिकामका बडेजाव थोडा. यामुळें तें एक झाकलें माणिक होतें असेंच म्हटलें पाहिजे. मेथाजीची व त्याच्या घरच्या माणसांची, वेळच्या वेळीं व झटपट, कामें उरकण्याची हातोटी पाहून मला खरोखर समाधान वाटलें. आणि माझा तर निश्चय झाला कीं यापुढें आपणही हाच कित्ता उचलावयाचा. गुजराथी लोकांची व्यवहारांतली टापटीप, झटपट, व वेळच्या वेळीं काम करण्याची हातोटी वगैरे गुण मोठे नांवाजण्यासारखे आहेत. होतच आहे, जातच आहे अशा सरदारी थाटाच्या आमच्या महाराष्ट्र बंधुजनांनीं त्यांचें वळण धरल्यास त्यांचें प्रस्तुत पुष्कळ हित होइल असें मला वाटतें. असो; मेथाजींच्या घरची रीतभात पाहून मला संतोष झाला हें खरें, तथापि रात्रीस जेवणखाण आटपल्यावर सुधारणुकीच्या व धर्मसंबंधाच्या बावतींत मेथाजीशीं माझें जें संभाषण झालें तें मला आवडलें नाहीं; इतकेंच नाहीं तर त्यावरून त्याच्या विलक्षण अज्ञानाविषयीं व कित्येक वेडगळ समजुतींविषयीं मला त्याची भारी कींव आली.

नंतर नेमल्या दिवशीं मी 'संगमकारी' बोटीवर चढलों. बोट चालू झाल्यावर इतर मंडळींच्या ओळखी देळखी झाल्या. त्यावरून मला वाटूं लागलें कीं, या बोटींतून तरी, ठाल्यासारखें चीनच्या मिशनाबरोबर जाण्याला मिळालें म्हणून एका प्रकारें समाधान मानलें पाहिजे खरें; तथापि-एकंदरीनें यांत आपलें नुकसानच झालें. या बोटींतून जाणारे दरोबस्त लोक हलक्या वर्गाचे होते, तसेंच त्यांचे विचार व समजु तीही त्याच मानाच्या होत्या. सभ्यपणानें कसें वागावें हें त्यांच्या गांवींही नव्हतें व विदेशीं त्याचें स्वभावतांच वाकडें होतें; यामुळें या प्रवासांत मला बराच त्रास पडला. 'जलकेसरीं-तून' गेलेली मंडळी योग्यतेनें माझ्या बरोबरीची असून, तिच्याशीं घडणाऱ्या सहवासानें व संभाषणानें मला पुष्कळच आनंद झाला असता व अनेक गोष्टींचा लाभ मला करून घेतां आला असता, आणि ज्या ज्या बंदरीं ती बोट लागावयाची होती तेथील स्थळांची व लोकस्थितीची माहिती मला आयतीच झाली असती व जो प्रवासवृत्तांताचा ग्रंथ मी तयार करण्याचें योजलें होतें त्यांत घालण्याला ही माहिती अर्थात फार उपयोगी पडली असती. परंतु दुर्दैवानें या सर्व गोष्टींस मी आंचवलों. वास्तविक, यांत दैव कशाचें ? जी ती गोष्ट, आयते वेळीं, धांदलीनें करायची मला संवयच लागली असल्यामुळें हा माझाच दोष, असें असतां मी विनाकारण दैवाला दोष कां लावावा ?

आमची बोट निघाली ती तडक कोलंबो बंदरीं येऊन दाखल झाली. तेथें चौकशी केल्यावर समजलें कीं 'जलकेसरी' बोट अझून त्या बंदरीं आलीच नाहीं. मग

दोन दिवस आम्हांस तेथेंच मुक्काम करावा लागला. तितक्या अवकाशांत गांवांत जाऊन, मोत्यांच्या व्यापारासंबंधीं, दालचिनीच्या लागवडीसंबंधी, तेथील बौद्ध धर्मासंबंधी बरीच माहिती मीं करून घेतली. तिसरे दिवशीं मिशनची आगबोट बंदरांत आली व आमच्या सर्वांच्या गांठी पडल्या. मला पाहतांच शेठ धनजीशाच्या तोंडावर टवटवी आली व इतर मंडळीलाही आनंद झाला. भेटी झाल्यावर जो तो मला म्हणूं लागला–" ताल्या साहेब ! तुम्ही आलां कसे ? आम्ही तर तुमच्या येण्याची आशाच सोडली होती. आम्हीं म्हटलें– हे दक्षिणी भाई, गलबतावर पाय ठेवायला भ्यायचे, हे कसले येतात, ब्रह्म, सयाम व चीनच्या येवढ्या दूर प्रवासाला ? " यावर मला बोलण्याला सवड मिळतांच, आपल्या धांदली स्वभावाचा दोष लपवून नेण्याच्या इराद्यानें मीं म्हटलें–" हो हो. तुम्हाला वाटलें तें वाजवी वाटलें. आह्मा हिंदु लोकांला समुद्रोल्लंघनाचा प्रतिबंध आहे, त्यापेक्षां जातीची नड तर खरीच. तथापि आमचें घराणें सुशिक्षित असल्यामुळेंच आम्हीं ही नड जुमानली नाहीं ! बाकी माझें येणें दुरापास्तच होतें." हें उत्तर सर्वांस रुचलें व त्यांनीं या माझ्या मर्दुमकीबद्दल माझी फार वाहवा केली. यानंतर ज्ञानसंपन्न मंडळीच्या सहवासाचा आनंद मला मिळूं लागला व तेणेंकरून सर्व कांहीं ठीकठाक जमलें.

कोलंबो सोडून निघाल्यावर वाटेनें आम्ही जागोजाग बंदरें करीत चाललों. ठिकठिकाणचे रम्य देखावे आम्ही पाहिले, झाडेंझुडपें, फळें, फुलें, धान्यें, वनस्पती वगैरे पदार्थ पाहिले व दुसरीही अवांतर माहिती मिळविली. परंतु याबद्दल

जीं टाचणें मीं करून घेतलीं, तीं, ज्या वह्या मीं मुद्दाम बांधून घेतल्या होत्या, त्यांत घेतलीं नाहींत, तर सुट्या चिटोऱ्यांवर करून घेतलीं. कारण लॉकच्या शिक्षणपद्धतीप्रमाणें आंखून घेण्यासाठीं म्हणून त्या वह्या मीं मुंबईस विऱ्हार्डी बाहेर काढ- ल्या होत्या, त्या तेथच्या टेबलावर तशाच राहून गेल्या, असें बोटींत चढल्यावर माझ्या लक्षांत आलें. मग पुनः एक वार जीभ चावली आणि मनाची समजूत केली—" कांहीं नाहीं. उद्यां नवीनच वह्या बांधूं म्हणजे झालें." परंतु पुढें तसें तरी कराव- याचें होतें—तेंही नाहीं! आतांच काय अडलें आहे, कोलं- बो बंदरीं गेल्यावर करूं, असें म्हणून बोटींत सोबत्यांबरोबर खेळण्यांत, गप्पा गोष्टी बोलण्यांत, विनोद करण्यांत व साग- राचे मजेदार देखावे पाहण्यांत सर्व वेळ गेला. कोलंबो एथें गेल्यावर माहिती टाचून घेण्याला पाहूं लागलों तों प्रथम वह्यांची अडचण पडली, परंतु तीही अडचण मीं एका स्वल्पशा युक्तीनें टाळली. म्हटलें—"सुट्या कागदांवरच तूर्त हीं टाचणें करून घेऊं या, मागाहून सावकाशपणें तीं वह्यांत उतरून टाकतां येतील!" या युक्तीनें तूर्त कार्य भागलें. पण एकदा ही युक्ति लागू पडल्यावर मग आम्ही कशाला वह्या बांधण्याच्या खटपटींत पडतों? पुढें वह्या बांधल्याच नाहींत. सर्व टाचणें व टिपणें चिटोऱ्यांवरच करीत चाललों व तीं मग सर्व एका ब्यागेंत फेंकून देऊं लागलों. म्हटलें—"सध्यां ठीक चाललें आहे. चीनच्या किनाऱ्यावर पाय ठेवला म्हणजे मात्र वह्या बांधण्याची हयगय करायची नाहीं आणि टिपणें करायचीं तींही जरा स्वच्छ व अधिक खुलासेवार करून घेतल्याशिवाय रहावयाचें नाहीं."

याप्रमाणें कित्येक दिवसांनीं आम्ही चिनांतील मेटाऊ बंदरीं येऊन पोंचलों. या बंदराचा देखावा दुरून पाहूनच मला मोठें कौतुक वाटलें. हें बंदर इंग्रज सरकारच्या ताब्यांत असून व्यापाराला फार सोईचें आहे. येथील देखावा निसर्गतःच रम्य असून किनाऱ्यावरील चिनी लोकांच्या सुंदर सुंदर इमारतींनीं तर तो फारच शोभिवंत दिसतो. या वेळीं माझ्या मनांत अनेक विचार आले. पुढें काय काय प्रकार दृष्टीस पडणार याची मला बरीच अटकळ होऊं लागली. अलबत, हे सर्व विचार व हे सर्व प्रकार, मी जो ग्रंथ रचणार, त्यांत अवश्य आले पाहिजेत, असें मी आपल्या मनांत म्हणूं लागलों. एकंदरींत हा ग्रंथ खचितच मोठा उपयुक्त, मनोवेधक, प्रौढ व माहितीनें ओतप्रोत भरलेला, असाच निपजेल असें धोरण दिसूं लागलें. अशा विचारसागरांत मी एवढा तरंगत चाललों कीं कल्पनांच्या लहरीवर लहरी माझ्या मनांत उसळूं लागल्या. हा ग्रंथ म्हणजे माझ्या अक्षय्य कीर्तीचा स्तंभ, बाबांच्या सगर्व आशेची नौका, अपार सुखाचें साधन, आणि भावी अभ्युदयाचा पाया होय हें माझ्या पूर्णपणें लक्षांत येऊन चुकलें. असा हा मौल्यवान व अद्वितीय प्रचंड ग्रंथ पाहतांच, त्यावर लोकांच्या कशा उड्यावर उड्या पडतील, वाचतां वाचतां मर्मज्ञ वाचकांची मुरकुंडी वळून ते कसे तोंडांत बोटं घालतील, माझे स्नेही व ओळखीदेखीचे लोक माझी कशी नांवाजणूक करतील, माझ्या बाबांच्या तर आनंदास पारावार ही नाहींसा होईल आणि मजकडे वारंवार वात्सल्यपूर्ण दृष्टीनें पाहून ते माझें कसें अभिनंदन करतील आणि आपल्या मित्रास माझ्या हुशारीच्या व बुद्धिमत्तेच्या गोष्टी फुशारकीनें कशा

सांगत सुटतील–हा सर्व प्रकार, कल्पनेच्या बळानें, माझ्या तंतोतंत नजरेस आला. त्या योगें माझ्या मनाला भारी उत्साह प्राप्त झाला आणि या उत्साहाच्या भरांतच मीं निश्चय केला कीं–"आतांपर्यंत झाली ती गेली, परंतु यापुढें मात्र बिलकुल हयगय होऊं द्यावयाची नाहीं. **उद्यां** अगोदर आपल्या स्मरण-वह्या बांधावयाच्या व आपलीं टाचणें टिपणें–कीं ज्यांवर आपल्या या मौल्यवान व अपूर्व ग्रंथाची आणि वरील मनोराज्याची इमारत उठावयाची–तींही **उद्यांपासूनच** चोख करून घ्यावयास लागावयाचें; लांबणीवर टाकावयाचें नाहीं ! "

# प्रकरण ४ थें

## चीनच्या प्रवासाचा वृत्तांत.

पिंधलें तें मोतीं; खपली ती खेती ।
केलें तें झालें; व्हावयाचें वाहवलें ॥

**एक गुजाराथी म्हण.**

प्रस्तुत प्रकरणांत 'चीनच्या प्रवासाचा वृत्तांत' सांगण्याचा माझा मानस नाहीं; तर 'चीनच्या प्रवासाचा वृत्तांत' म्हणून जो एक थोरला ग्रंथ रचून देण्याविषयीं मीं आपल्या बावांस वचन दिलें होतें, त्यासंबंधीं कांहीं विशेष गोष्टी मात्र मी येथें सांगणार आहें. सदहू थोरल्या ग्रंथांत माझ्या या प्रवासाची सविस्तर हकीगत गोंवून देण्याची मीं योजना केलीच आहे; मग तीच हकीगत फिरून येथें सांगण्यांत अर्थ काय? याशिवाय चीनच्या प्रवासाची एवढी विस्तीर्ण हकीगत अगदीं थोडक्यांत सांगूं म्हटलें, तरी सुद्धां ती मर्यादेपलीकडे वाढणार आहे, हें एक; आणि दुसरें असें कीं, प्रस्तुत गोष्ट लिहिण्यांत माझा उद्देश कांहीं निराळाच असल्यामुळें, प्रवासाची हकीगत सांगणें कांहींसें अप्रयोजकच होणार आहे. यास्तव चीनच्या प्रवासाच्या वृत्तांतांतील ठळक ठळक गोष्टींचा मात्र उल्लेख करून, त्या प्रचंड व गहन ग्रंथांत शोभण्यासारख्या नाहींत अशाच कांहीं गोष्टी मुख्यत्वें करून येथें सांगण्यांत येतील. म्हणजे त्या प्रचंड

ग्रंथाकरितां मीं कसकशी सामुग्री मिळविली, ती मिळवितांना मला कोणकोणत्या अडचणी आल्या आणि एवढें अगत्याचें काम करतांनाही तें आजचें उद्यांवर टाकीत गेल्यामुळें अंतीं माझी कशी फसगत झाली हेंच मीं येथें विशेष फोड करून सांगणार आहें.

एवढें धाडस करून व एवढे कष्ट सोसून जो प्रवास मीं केला त्याची इथंभूत हकीगत एकवार वाचावी अशी पुष्कळांस मोठी उत्कंठा होईल यांत संशय नाहीं. माझी खात्री आहे कीं ही त्यांची उत्कंठा वर सांगितलेला "**चीनच्या प्रवासाचा** वृत्तांत" या नांवाचा माझा प्रचंड व गहन ग्रंथ वाचल्यानें सहज शांत होईल. आतां हें खरें कीं हा मोटा विस्तीर्ण व गहन ग्रंथ अजून अर्धा मुर्धाच लिहून झाला आहे आणि त्यांतही कांहीं ठिकाणीं दुरुस्ती करावयासही पाहिजे आहे; तथापि ती लौकरच करून व उरलेला भागही एकदा संपवून टाकून, विपुल माहितीनें भरलेला हा गहन व प्रचंड ग्रंथ **आज** नाहीं **उद्यां** वाचकांच्या हातीं देतां येईल, अशी मला आद्यपही पूर्ण आशा वाटत आहे. यास्तव सदहू ग्रंथ वाचण्याविषयींच सर्व जिज्ञासूंस मनापासून मी शिफारस करतों.

**हा** ग्रंथ ताबडतोब तयार झाला असता, तर माझा व इतरांचाही पुष्कळ फायदा झाला असता हें खरें, तरी तसें न झालें म्हणून फारसें बिघडलें असें नाहीं. गंभीर विचार, विपुळ व उपयुक्त माहिती आणि चटकदार भाषासरणी, या सर्व गुणांस्तव हा मौल्यवान ग्रंथ केव्हांही वाचण्यांत आला तरी तो सर्वांच्या आदरास पात्र होईलच होईल.

तेव्हां एवढा थोरला ग्रंथ रचण्याच्या कामीं मजकडून कसकशी मेहनत झाली अथवा खरें म्हटलें तर कोणकोणत्या वेळीं कसकशी हयगय होत गेली हें मी आतां प्रांजलपणें निवेदन करतें.

मिशनची मंडळी ज्या दिवशीं मेटाऊ बंदरीं येऊन पोंचली, त्याच दिवशीं किनाऱ्यावर उतरण्यास परवानगी न मिळाल्यामुळें, तो सारा दिवस आम्हांस बोटीवर बसून काढावा लागला. मग दुसरे दिवशीं सकाळीं कांठावर जाण्याला तयार असावें अशी आम्हा सर्वांस ताकीद मिळाली. उद्यां चीनच्या भूमीवर पाय ठेवला म्हणजे काय काय चमत्कार पहावयास सापडतील यांविषयीं सर्वांस मोठी उत्कंठा प्राप्त झाली. परंतु मला दुसरी आणखी माझ्या ग्रंथाची काळजी लागली. माझ्या मनांतला हेतु सिद्धीस जाण्याला मुख्य साधन म्हटलें म्हणजे हा अमूल्य ग्रंथ; तो कसा करावा, त्याचे किती भाग पाडावे, त्यांत कोणती कोणती माहिती कोठें कोठें दाखल करावी वगैरे त्याच्या साधारण स्वरूपाविषयीं विचार सर्व काळ माझ्या मनांत घोळूं लागले. रात्रीं जेवणखाण झाल्यावर आम्ही सगळेजण निजावयास गेलों. पण मला लौकर झोप येईना. म्हणून मग मी त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेचा एक साधारण खर्डा तयार करण्यास बसलों. विचार करतां करतां, अपरात्र झाली व डोळे चुरचुरू लागले. अगदीं पहाटेची वेळ झाली तेव्हां कुठें जरासा डोळा लागला. आणि डोळा लागला मात्र तोंच स्वप्न पडलें कीं मी मोठ्या थाटानें चीनच्या बादशहाला 'कोनान्हीटन्यालगस' हा इंग्रजी लांबलचक शब्द कसा उच्चारावा हें वेडीं वाकडीं तोंडें करून शिकवीत आहें! मग हें गुलजार स्वप्न पुरें

झालें नाहीं तोंच सकाळची घंटा झाली आणि मी जागा होऊन धडपडून उठलों. माझ्या मनाचा पुरा धडा झाला होता कीं यापुढे प्रत्येक काम चटाचट उरकावयाचें. त्याची मला वारंवार आठवण होत होती. म्हणून घंटानाद कानीं पडतांच मीं चूळ भरून टाकला, लगेच कपडे पेहरले, आणि घंटा पुरी झाली नाहीं तोंच, तयार असलेल्या एका चिनी मचव्यांत चटकन उडी मारून उतरलों—खरोखर सर्वांच्या आधीं मीच! खरें विचाराल तर मला माझ्या या चपळाईचें प्रथम मोठें कौतुक वाटलें. परंतु काय सांगूं ?—आह्मी गलबत टाकून थोडेसे गेलों नाहीं, तोंच मी आपल्या खिशांत हात घालून चाचपूं लागलों आणि गोंधळल्याप्रमाणें होऊन ओठ चावीत म्हणालों—" अरेरे ! मी चपळाई केली खरी, पण घाईनें मी आपला रोजचा कोट गलबतावरच टाकून आलों व त्यांतच माझी पेनसील आणि टिपणाचीं चिटोरींही राहून गेलीं ! दोन दिवशीं आमचें सगळें सामान येईल तेव्हां तो कोट माझ्या हातीं येणार, तों पर्यंत मी टिपणें कशीं करून घेऊं ? " निरुपाय होऊन, शेवटीं टिपणांचें अगत्याचें काम मला उद्यांवर टाकावें लागलें. कदाचित माझ्या सोबत्यांपासून पेनसल व कागद हीं दोनही मागून घेतां आलीं असतीं किंवा किनाऱ्यावर उतरल्यावरही बाजारांत विकत मिळणें कठिण नव्हतें. पण कठिण नव्हतें म्हणूनच त्याची एवढी हेळसांड होत चालली होती.

एकदाचे आम्ही चीन देशाची राजधानी पेकीन नगरी एथें येऊन पोंचलों. आमच्या राहण्याची सोय

एका मोठ्या शोभिवंत व विस्तीर्ण वाड्यांत केली होती. लागेल ती वस्तु आम्हास एथें पुरविण्यांत येत होती; कोणत्याही गोष्टींची उणीव म्हणून नव्हती. परंतु, खरें पुसाल तर, येथें केवळ कारागृहांत टाकलेल्या कैद्यांप्रमाणेंच सरासरी आमची स्थिति होती. आमच्यावर चिनी शासुदांची एवढी कडक नजर होती कीं आम्हाला आंखून दिलेल्या मर्यादेच्या बाहेर पाऊलही टाकण्याची परवानगी नव्हती-मग मोकळेपणानें बाजार पहावा, सुंदर सुंदर स्थळें पहावीं, टोलेजंग मंदिरें बघावीं आणि शहरच्या शोभिवंत भव्य चौकांचें व देखाव्यांचें नेत्रसुख अनुभवावें, याची गोष्ट कशाला ? खरें म्हटलें तर आम्ही या ठिकाणीं केवळ अटकेंतच होतों. तथापि एवढी गोष्ट कबूल केली पाहिजे कीं मला ज्या स्मरणवह्या बांधावयाच्या होत्या त्या बांधून घेण्यास कोणत्याही प्रकारची नड नव्हती. बरें, फुरसद नव्हती असेंही नाहीं; बाहेर कोठें जावयाचें नसल्यामुळें फुरसदही हवी तेवढी होती. आणि माझ्या मनाचा निश्चयही झाला होता कीं आतां स्मरण-वह्या बांधून ठेवावयाच्या. पण काय सांगावें ?-माझें मन पुनःपुन्हा याच विचारानें घोटाळूं लागलें कीं चोपड्या बांधावयाच्या हें काम तें काय ? आणि त्याला वेळ तो किती लागणार !-आणि याच विचारानें क्षणक्षणीं हें फार अगत्याचें काम मी पुढें पुढें ढकलीत चाललों. या शिवाय चीनची हवा मोठी भयंकर-फार उष्ण. माझ्या आंगांतून तर दिवसभर सारख्या घामाच्या धारा चालत होत्या, यामुळें वह्या बांधण्याकडे किंबहुना दुसऱ्या कोणत्याच कामाकडे माझें लक्ष

बिलकुल लागेना. कोटाचीं बिर्डी काढतां काढतां, पंख्याचा थंडगार वारा घेतां घेतां, आणि तहान शमविण्याकरितां मधुर चिनी सरबतें पितां पितांच मला पुरे वाट झाली. मग ज्यांच्यावांचून आतांच कांहीं अडलें नाहीं अशा वह्यांकडे कोण लक्ष देतो ?

आम्ही चीन देशांत होतों तों पर्यंत जरी माझ्या हातून वह्या बांधणें झालें नाहीं आणि हिंडण्या फिरण्याची जेवढी मोकळीक जरूर होती तेवढी जरी आम्हाला तेथें मिळाली नाहीं, तरी जेव्हां जेव्हां संधी सांपडे, तेव्हां ती वायां न दवडतां, मी चीन देशांतील रीतभात, वस्तुस्थिति वगैरे लक्षपूर्वक पाहूं लागलों व त्यांचीं टिपणेंही करून घेऊं लागलों. परंतु वह्यांच्या अभावीं, अर्थात, प्रथम बोटीवर असतां जी युक्ति मीं काढली होती, तीच या वेळीं व पुढेंही चालू ठेवणें मला प्राप्त झालें. म्हणजे हीं टिपणें मी पहिल्याप्रमाणेंच चिटोऱ्यावर करून घेत चाललों व तींही होतां होईल तों आटपशीर आणि थोडक्यांतच करून घेण्याचा परिपाठ ठेवला. माझी बुद्धि तीव्र आहे आणि स्मरणशक्ति धड आहे म्हणून माझे बाबा म्हणत असत आणि तशाच त्या आहेत अशी माझीही समजूत होऊन बसली होती; त्यापेक्षां हीं टिपणें मागाहून मला सहज उकलतां येतील अशी माझी अटकळ होती. यामुळें निरनिराळ्या तुकड्यांवर लांबलचक टिपणें लिहून घेणें मला वाजवी दिसलें नाहीं.

आमचा मुक्काम पेकीन येथें असतां मुख्यत्वें करून "म्यांडरीना" पाशीं आमची नेहमी गांठ पडे. म्यांडरीन म्हणजे जासूद; त्यांचें काम म्हटलें म्हणजे बादशहाचे हुकूम

आम्हांस येऊन सांगावें आणि आमची हकीगत बादशहास कळवावी. याशिवाय आम्हांस काय हवें, काय नको, याची तरतूदही तेच करून देत. आम्ही पेकीन येथें आल्यापासून, आम्हांस पाहण्याच्या हेतूनें, कांहीं तरी निमित्त करून, पुष्कळ म्यांडरीन नित्य आमच्याकडे येत. हे म्यांडरीन आपणास मोठे संभावित व मर्यादाशील समजत असत. ते आले ह्मणजे त्यांच्या भेटी घेण्यांत व त्यांची ऊठबस करण्यांत आमचा बराच वेळ मोडे. एक तर त्यांची आदरसत्काराची रीत फारच त्रासदायक होती, म्हणजे कोणी आला तर त्यास अमुकच बोलायचें, असेंच चालायचें, असेच हात करायचे, असचें पहायाचें, असेंच हसायचें, असे त्यांचे बसलेले बेत होते, त्याप्रमाणें ते वागत. आणि आम्हालाही मग त्यांच्या कलाप्रमाणें हा सर्व फार्स करावा लागे. या रिकामट्या उठबशीचा मला खरें ह्मटलें तर भारी कंटाळा आला. याशिवाय त्यांची आनुनासिक भाषा आम्हांस बिलकुल समजत नसे आणि दुभाष्यानें जेव्हां स्पष्टार्थ कळवावा तेव्हांच कांहीं उमज पडला तर पडे. ही गोष्ट झाली, जे म्यांडरीन आमच्याकडे येत त्यांची. आतां कित्येक वेळां पेकीन शहरांतील कांहीं संभावित लोकांकडेही आमचें जाणें झालें; तेथें सुद्धां पाहिलें तों वरीलच छापील थाट दृष्टीस पडला. त्यांचें हालणें झालें, त्यांचें चालणं झालें, त्यांचें बोलणें झालें, त्यांचें पाहणें झालें,— सर्वच कांहीं छापील. जेथें जावें आणि जेव्हां जावें तेव्हां प्रत्येक ठिकाणीं एकच थाट—जणूं, हे लोक सारा दिवस अक्षयीं विझण्यांनीं वारा घेत असावे; चहा पीत असावे; चिम-

त्यांनीं भात आणि मेवामिठाई खात असावें; सुपारी चावीत असावें; आणि कुसुंब्याचा रंग उडवीत असावें असेंच वाटे! मला जेथें तेथें हा एकच देखावा पाहून मोठें आश्चर्य वाटे. आणि मी आपल्याशीं ह्मणें—हाच प्रकार जर येथें पहिल्यापासून शेवटपर्यंत पहावयाचा, तर हिंदुस्थानांतून चिन देशांत येण्याचें तरी आम्हांस काय प्रयोजन होतें? हा देखावा तर, हिंदुस्थानांत दुकानोदुकानीं चिनी छाप आणि चिनी कागद विकत मिळतात, त्यांवर काढलेल्या चित्रांवरून कोणाच्याही ध्यानांत येण्याजोगा आहे.!"

पहिल्या पहिल्यानें या चिनी रीतीभातीचें मला कांहीं-सें कौतुक वाटलें खरें, परंतु हळुहळु त्यांचा मला अगदीं वीट येऊं लागला; आणि आमची मिशनची मंडळी आणि विशेषें करून मी, त्यांचा उपहास करून, वारंवार टर उडवूं लागलों. खरें म्हणाल तर, आपआपसांत हशा पिकवण्याला तो एक आमचा उत्कृष्ट विषयच होऊन बसला होता. मी तर आपल्या मनांत मुक्रर करून ठेवलें कीं चिनच्या प्रवासाच्या वृत्तांतांत या विषयावर मजेदार टीका करून याचें एक वेगळें प्रकरणच करून घालावयाचें.

थोडे दिवस गेल्यावर एके दिवशीं मी पाहिलें, तों कोणी नवाच एक मांडरीन माझ्या दृष्टीस पडला. ते कृश अवयव, तीं चपटीं नाकें, ते लिखांसारखे बारीक डोळे इत्यादि चिनी लोकांच्या स्वरूपाचीं साधारण लक्षणें त्याच्या ठिकाणीं नव्हतीं, त्यावरून हा कोण? आणि हा चिनी लोकांत कसा शिरला? याची मला सहजच जिज्ञासा उत्पन्न झाली. मग मी त्याला हिंदी भाषेंत कांहीं प्रश्न केल्याबरोबर, हसून, त्यानें त्याच

भाषेंत जबाब दिला. चौकशी अंतीं असें समजलें कीं तो मूळचा हिंदु असून बाटलेला ख्रिस्ती होता.

त्याचें मूळ गांव बंगाल देशांत होतें. रीतीप्रमाणें थोडेंसें इंग्रजी शिकल्यावर ख्रिस्ती पाद्र्यांच्या जाळ्यांत तो सांपडला. पुढें ख्रिस्ती झाल्यावर आणखी कोणेकाचे नादीं लागून तो विलायतेस गेला, आणि तेथून चिनी लोकांमध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याकरितां त्यास चीनदेशीं पाठविण्यांत आलें. चिनी लोकांचा स्वभाव मूळचाच कुडा; कधीं कोणा परक्या मनुष्यांशीं ते मोकळ्या मनानें अगोदर बोलावयाचे नाहींत. तशांत ख्रिस्ती उपदेशकांचा तर त्यांस अतिशयें तिटकारा असल्यामुळें, ते या लोकांशीं कोणत्याही प्रकारचा धड संबंधही ठेवूं इच्छित नाहींत. अशा स्थितींत विलायतेहून चिनांत जे ख्रिस्ती उपदेशक आले त्यांची डाळ तेथें कशी शिजावी ? परंतु हा बाटलेला ख्रिस्ती चार ठिकाणचें पाणी पिऊन मोठा वस्ताद बनला होता. आरंभीं फसून जरी त्यानें ख्रिस्ती धर्म स्वीकारला आणि कित्येक वर्षे विलायतेंत पाद्र्यांच्या सहवासांत घालविलीं, तरी त्याच्या मनांत ख्रिस्ती धर्माविषयीं मनोमय अभिमान फारसा उत्पन्न झाला होता असें दिसलें नाहीं. चीनदेशांत येतांच, त्यास, त्याच्या बरोबरच्या इंग्रज पाद्र्यांबरोबर बराच त्रास भोगावा लागला. त्यांत त्याचे सोबती कोणी चिनी लोकांच्या छळणुकीस बळी पडले व कोणी हाल भोगीत भोगीत स्वदेशीं निघून गेले. हा हिंदु बाव्या मात्र चिनी अधिकाऱ्यांस वश करून घेऊन तेथेंच चिकटून राहिला आणि याच्या अंगची हुशारी

दिसून आल्यावरून हळुहळू म्यांडरीनचा हुद्दा त्यानें संपादन केला. प्रस्तुत त्याचा पोषाख चिनी होता; त्याची वागणूकही चिनी होती; त्याची जन्मभाषा जणूं चिनीच झाली होती; सारांश दीर्घ काळच्या सहवासानें तो अंतर्बाह्य चिनी बनला होता. नाक, डोळे इत्यादि अवयवांची ठेवण मात्र तेवढी त्यास चिनी करतां आली नव्हती; त्यास दुर्दैवानें त्याचा उपाय नव्हता.

या ख्रिस्ती म्यांडरीनाची गांठ पडल्यावर त्याचें माझें लागलेंच सख्य झालें, व गमतीची आणि चिनी लोकांच्या संबंधाची पुष्कळ खबरदार, अंतस्थ माहिती त्याच्या कडून मला मिळाली. या सर्व माहितीचीं संक्षिप्त टिपणें करून घेण्यास मी विसरलों नाहीं हें मला येथें बजावून सांगितलें पाहिजे. हिंदुस्थान सोडून जरी त्यास पुष्कळ वर्षे झालीं होतीं, आणि धर्मांतर केल्यानें जरी त्याचा हिंदुलोकांशीं संबंध तुटला होता, तरी या माझ्या देशबांधवाला हिंदुस्थानाच्या स्थितीची हकीगत ऐकण्याची फार उत्कंठा दिसून आली. स्वदेशाचा आणि आपलेपणाचा प्रेमपाश किती बळकट आहे पहा! असो; पुढें कांहीं तरी निमित्त काढून तो बहुधा रोज मला येऊन भेटूं लागला; आणि कित्येक तास आह्मी एकमेकांशीं गप्पागोष्टी सांगण्यांत आणि समागमसुख अनुभविण्यांत घालवूं लागलों. आमच्या कडे वारंवार येण्याजाण्यानें व पुष्कळ वेळपर्यंत गप्पागोष्टी सांगत बसल्यानें, चीनी लोकांच्या मनांत कांहीं भलताच संशय येण्याचा संभव होता; परंतु मिशनचें काम केवळ व्यापारव्यवहाराचें आहे अशी त्यांची समजूत झाली असल्यामुळें विशेष नड

आली नाहीं. फुरसतीच्या वेळीं या ख्रिस्ती मनुष्यानें चिनी लोकांच्या संबंधाच्या कांहीं मौजेच्या गोष्टी सांगाव्या; त्यांच्या धर्मसंबंधी विधींचें व विचारांचें वर्णन करावें; आणि त्यांच्या घरगुती रीतिभातींची माहिती सांगावी. त्याची वर्णन करून सांगण्याची शैली तरी कांहीं खुबीदारच होती, त्यामुळें, कितीही वेळ झाला, तरी त्याचें बोलणें ऐकावें-सेंच वाटे. शिवाय ही सर्व माहिती माझ्या ग्रथांत घालावयास फार उपयोगी पडेल, म्हणून मींही ती विशेष चित्त देऊन ऐकत असें.

पेकीन येथें आमचा कांहीं दिवस मुकाम झाल्यावर, आमच्या मिशनच्या प्रमुखास लिहून आलें कीं, चीनच्या बादशहाची स्वारी जेहाल येथें गेली आहे, आणि बादशहानें भेटीकारितां मिशनच्या मंडळास तिकडेसच बोलाविलें आहे. जेहोल हें चीनच्या ताब्यांतील तारतरी मुलुखाची राजधानी. तेथें उन्हाळ्यांत रहावयास जाण्याचा बादशहाचा परिपाठ होता. तेथें एक बादशाही वाडा होता, त्याचें नांव—पहा हो, कांहीं चमत्कारिकच होतें. त्याचा अर्थ "मधुर आणि सुखकर अशा हिमशीतलतेचें स्थान" आणि "असंख्य वृक्षांची घनवाटिका" असा होता. पुढें लवकरच आह्मी या नामांकित शहरीं गेलों व तेथील बादशाही वैभवाची शोभा प्रत्यक्ष पाहिली. ती पाहून,

वारा कसा शीतल मंद येतो
वारूनि तापा बहु सौख्य देतो।
छाया तरूची बहु तापदायी
आहे तशी हे घन आंबराई॥

भवभूति.

या उत्तररामचरितांतील वर्णनाचीच आठवण मला झाली. आणि ज्यापेक्षां शीतलता, शांतता, आणि वनश्री यांच्या सान्निध्यानें भवभूतीची बुद्धि एवढी विकास पावली, त्यापेक्षां माझ्या बुद्धीलाही अशा ठिकाणी स्फूर्ति प्राप्त होईल असें मीं मानलें. मीं तर पूर्ण निश्चयच करून ठेवला कीं माझ्या नवीन ग्रंथांत जेहोलच्या वर्णनाचें एक स्वतंत्र प्रकरणच घालावयाचें!

आम्ही जेहोल येथें आलों, तेव्हां आमच्याबरोबर माझा नवा मित्र तो ख्रिस्ती म्यांडरीन हाही आला. तो आला हें बरें झालें. कारण त्याच्या साहाय्यानें जेहोल येथील बादशहाच्या महालांतील कित्येक मौजेच्या गोष्टी पहावयास व ऐकावयास मला सांपडल्या, हें खरें; तथापि एका मोठ्या जिवावरच्या संकटांतून पार पडण्यास त्याचा मोठा उपयोग झाला; त्या गोष्टीचा मला कधीं विसर पडणार नाहीं.

जेहोल येथें आल्यावर माहितीचीं टिपणें करून घेण्याविषयीं फारच गर्दी उडाली; कारण पुष्कळच नव्या नव्या व लक्ष देण्यासारख्या गोष्टी येथें आमच्या दृष्टीस पडल्या. त्यांतून कितीकांचीं टिपणें घ्यावीं आणि कितीकांकडे म्हणून ध्यान द्यावें! जें जें पहावें तें तें नवें नवें आणि महत्वाचेंच वाटूं लागलें. तशांत बादशहाला

भेटण्याच्या गडबडींत टेबल, खुर्ची, स्वतंत्र जागापागा वगैरे सर्वच गोष्टींची पंचाईत पडली. म्हणून बऱ्याच गोष्टींचीं टिपणें करून घेण्याचें काम मला 'उद्यांवर' लोटावें लागलें. पहिला दिवस, बोजे सोडून सामान-सुमान लावण्यांत गेला. दुसरे दोन दिवस, बादशहाच्या भेटीची तयारी करण्यांत गेले. चौथा दिवस, बादशहाची प्रत्यक्ष दरबारांत भेट घेण्यांत गेला. पांचवा दिवस, बादशहानें आमच्या प्रमुखास नजराणा पाठविला तो स्वीकारण्याच्या समारंभांत गेला. अशा घालमेलींत 'उद्यां, उद्यां' करतां कांहीं टिपणें करून घ्यावयाचीं राहिलीं तीं शेवटपर्यंत राहिलीं !

बादशहानें दिलेल्या नजराण्यांत एक रत्नजडित मौल्यवान पेटी होती व तींत आजपर्यंत होऊन गेलेल्या चिनी बादशहांच्या तसबिरी ठेविल्या होत्या. त्याच्या बरोबरच बादशहाच्या हातचें एक पत्र असून, त्यांत, या तसबिरी नजर करण्यांत, आपण आपल्या मतें एक महत्वाची व मौल्यवान देणगी देत आहों, असा उल्लेख केला होता. ही देणगी पाहतांच माझ्या मनांतही एक विचार आला. मी, पुण्याहून निघते वेळीं बुद्धाची आणि दुसऱ्या कांहीं साधु पुरुषांच्या तसबिरी आपल्या बरोबर आणल्या होत्या, त्यांची मला आठवण झाली. आणि मी आपल्याशीं म्हणालों—"या सर्व तसबिरींचें एक सुरेख पुस्तक बांधवून प्रत्येक तसबिरीखालीं त्या त्या साधु पुरुषानें केलेल्या शुभ कृत्यांचें कवितांत वर्णन लिहावें. हें पुस्तक नजर केलें असतां, चिनी बादशहा मोठा खुष होईल!"

मी आपला हा हेतु माझा मित्र म्यांडरीन यास सांगितला आणि या कामांत त्याची सल्ला विचारली. त्यानें माझ्या या युक्तीची प्रशंसा करून मला उत्तेजन दिलें; आणि खात्रीनें सांगितलें कीं–"तुमची ही भेट पाहून बादशहा फार खुष होईल आणि तुमच्यावर त्याची मर्जी खचींत बहाल होईल. आणि मग तुम्हाला काय लाभ होईल आणि काय न होईल याविषयीं आतांच कांहीं मला बरोबर सांगतां येत नाहीं. तरी बादशहाला ही तुमची भेट पसंत पडेल याविषयीं मला कांहीं शंका नाहीं. मग तो तुम्हास एखाद मोठ्या मानाची पदवी देवो, अथवा जन्माचें दारिद्र फिटे असें कांहीं बक्षीस देवो. तें तुमचें मग नशीब!" त्यानें आणखी माझ्यासाठीं एवढें सुद्धां करण्याचें कबूल केलें कीं या तसबिरीस चिनी तऱ्हेचें वारनिस मी चढवून देईन. याशिवाय बादशहापाशीं गोष्ट काढून माझी भेट करून देण्याचा योग जुळविण्याचा पत्कर त्यानें आपल्या शिरीं घेतला. सर्व कांहीं मनाप्रमाणें जुळलें. मग माझ्या आनंदास काय पुसावें? मला माझी योग्यता फारच अधिक वाटूं लागली व माझ्या हुपारीचाही मला सगर्व अभिमान वाटूं लागला.

माझ्या हयगयीचा मला यापूर्वींच फार वीट आला होता; म्हणून मीं या वेळीं निश्चय केला कीं हें काम अगदीं लांबणीवर टाकावयाचें नाहीं. कदाचित्, माझें भाग्य उघडावयाचें असल्यास यांतच उघडणार नाहीं कशावरून? व मी कोणी मोठा थोर पुरुष होणार म्हणून माझ्या बाबांचें जें भाकीत होतें, तेंही आतांच

खरें होणार नाहीं कशावरून ? असें म्हणून बादशहाच्या भेटीचा हा योग वायां जाऊं द्यावयाचा नाहीं असें मीं ठरविलें. मी लागलाच कविता करावयास बसलों आणि त्याच बैठकीला एवढ्या व इतक्या सुरेख कविता मीं रचल्या, कीं माझें चातुर्य पाहून, माझ्या मित्रानें तोंडांत बोट घातलें. बादशहाला तसबिरी नजर करण्याची माझी युक्ति ऐकूनच तो अगोदर माझ्या कल्पकतेविषयीं चकित झाला होता. तशांत कविता रचण्याविषयीं माझें सौलभ्य पाहून तर, माझी श्रेष्ठ योग्यता त्याच्या मनांत विशेष बिंबली. आणि त्या योगें मलाही माझ्या योग्यतेची ज्यास्तच घमेंड वाटूं लागली.

ज्या ठिकाणीं मला रहावयास खोली नेमून दिली होती त्या ठिकाणीं आमच्या मिशनच्या मंडळीचा रात्रंदिवस सारखा धुडकूस चालत असे. त्यांस नोकरीचें कामकाज फारसें नसेच आणि नोकरीच्या कामाशिवाय दुसरा कोणताही उद्देश कोणाच्या मनांत नव्हता. यामुळें या मंडळीला वेळ कसा मिळेल याची विशेष पंचाईत नव्हती; हा वेळ घालवावा कसा याचीच कायती पंचाईत होती. यासाठीं त्यांनीं अनेक प्रकारच्या करमणुकी काढल्या होत्या. चिनी लोकांशीं त्यांचें बरेंच दळणवळण पडत चाललें होतें व रिकामपणीं कित्येक चिनी लोक आमच्या या खुशालचंद मंडळीस वारंवार भेटावयास येत असत. मग करमणुकीकरितां जें गप्पाष्टक चाले आणि जो धुडकूस सुरू होई तो कांहीं पुसूं नये. याचा मला अर्थांतच फार त्रास वाटत असे. मला वाटे—" ह्या सामा-

न्य मंडळीहून माझी योग्यता फार मोठी आहे. परदेशीं जाऊन कोणकोणते लाभ करून घ्यावे हें या खुशालचंदांस काय माहीत? माझ्या मनांतील उद्देश याहून फार प्रौढ आणि श्रेष्ठ प्रतीचे होत.” असें म्हणून मला आमच्या या मंडळीच्या खेळाडूपणाचा तिरस्कार वाटूं लागला. याशिवाय त्यांच्या या रोजच्या धुडकुसांनीं कविता रचण्याच्या कामांतही व्यत्यय येऊं लागला. मग मीं दुसरीच एक एकांत जागा मिळण्याविषयीं तजवीज केली. ही जागा, आम्हांस ज्या वाड्यांत राहवयाची सोय केली होती, त्याच्याच देवडीवरल्या माडींत होती. खालीं पाहरेकरी शिपाई राहत होते, परंतु त्यावरलें दालन रिकामें होतें. या दालनाच्या पुढील अंगास उत्तम प्रकारची बागशाई केली होती. त्यामुळें शांततेप्रमाणेंच शीतलतेचाही वास येथें होता. माझा ख्रिस्ती मित्र म्यांडिरीन याच्या खटपटीनें ही जागा मला वापरण्याला मिळाली आणि ज्या दोन गोष्टींची मला आवड होती त्या–शांतता आणि शीतलता–मला येथें प्राप्त झाल्या.

चीनच्या बादशहाची भेट घेण्याची तयारी करण्यांत मी गुंतलों असतां, मला तसबिरीखालीं लिहावयाच्या कविता रचण्याचा नाद लागला. एके रात्रीं सहज लहर लागल्यामुळें काव्यस्फूर्तीच्या ऐन रंगांत दंग होऊन गेलों असतां, टेबलावर हनुवटी टेकून बसलों, तों, विचार करतां करतांच, माझा डोळा लागला. मला कोणत्याही गोष्टीचें भान राहिलें नाहीं. मग, एक मोठा बार झाला, तेव्हां मी दचकून उठलों. तो बार इतका मोठा

झाला कीं त्यानें माझ्या कानटाळ्या बसल्या आणि त्यासरशीं मी जागा झालों—जागा झालों इतकेंच केवळ नव्हे तर माझ्या काव्यस्फूर्तीच्या रंगांतून मी शुद्धीवर आलों असें म्हणावयास चिंता नाहीं. कारण ज्या टेबलावर मी हनुवटी टेकून झोपीं गेलों होतों, तें टेबल बाराच्या धडाक्यानें उलथून पडलें व आमची स्वारी धाडकन भुईवर आपटली. मी शुद्धीवर येतांच प्रथम आंग चांचपून पाहिलें तों विशेष लागलें नाहीं असें दिसून आलें. परंतु हा बार कसला झाला? कोणीं काढला? कशाकरितां काढला? टेबल कसें उडालें? हा सर्व चमत्कार आहे काय? हें मला कांहींच कळेना. असें आश्चर्य करीत मी उभा आहें, इतक्यांत देवडीवरले पहारेकरी, आमची मिशनची मंडळी, व आसपासचे लोक, 'हें काय प्रकरण आहे? हें काय प्रकरण आहे' असें म्हणत घाबरून धावत आले. त्या सर्वांच्या मुद्रा, झोपेंतून उठून आल्यामुळें, घाबरलेल्या आणि चकित झालेल्या दिसत होत्या. बाहेर अपरात्रीचा अमंल असून, अंधार काळाकूट पडला होता. जमलेल्या लोकांपैकीं कोणाच्या हातांत कंदील तर कोणाच्या हातांत साधे दिवे, कोणाच्या हातांत मशाल तर कोणाच्या हातांत काकडे, आणि सर्वांच्याही मुद्रा कावऱ्याबावऱ्या. हा सर्व प्रकार भय वाटण्यासारखा होता. मग बार कसा उडाला याचें कारण शोधून पाहतां, असें लक्षांत आलें कीं, टेबलाखालीं दारूचा शिंगाडा पडला होता तो पेटला. दुसरे दिवशीं आमच्या मंडळीचा, जेहोल शहरानजीक शिकारीस जाण्याविषयीं बेत ठरला असल्यावरून मी बंदूकीसहीत हा

शिंगाडा मुद्दाम मागविला होता; त्या दिवशीं संध्याकाळीं, माझें मन काव्यकल्पनेंत इतकें रंगलें होतें कीं मला तो व्यवस्थेनें सुरक्षित जागीं नेऊन ठेवण्याचें भानच राहिलें नाहीं. लिहितां लिहितां टेबलावर हनुवटी टेकून मी झोंपीं गेलों. तेव्हां मेणबत्ती बाजूस जळत होती ती संपली आणि जळत जळत तळाशीं आल्यावर बाजूच्या कागदांनीं पेट घेतला. ह्या कागदांची लागावळ जमिनी-वर शिंगाडा पडला होता तेथपर्यंत लागत गेली होती. कागद पेटतांच शिंगाड्याच्या तोंडाला कागदाचा बुच होता तोही पेटला मग काय सांगावें ? दारूनें एकदम पेट घेतला, आगीचा भडाका झाला आणि बाराचा एकच धडाका उडाला. त्याच्या योगानें माझ्यासकट टेबलही उलथें पडलें. माझें भाग्य थोर म्हणून मी जीवानिशीं बचावलों इतकेंच !

ही हकीगत समजतांच आमच्या मिशनच्या मंड-ळीनें व पाहरेकऱ्यांनीं मला फार दोष दिला. त्यांचें समाधान एवढ्यानें तरी झालें. परंतु आसपासचे जे चिनी लोक धावून आले होते, त्यांस तर ही हकीगत खरीसुद्धां वाटली नाहीं. चिनी लोक म्हटले म्हणजे अगोदर पाहिल्या प्रतीचे संशयी ; त्यांस अपरात्रीं बार झाला एवढी गोष्ट पुरे झाली. त्यांनीं नाना तर्क करून, शहरांत अशी कंडी पिकली कीं या परकी लोकांची कांहीं तरी फितुराची मसलत असावी; ती सिद्धीस न गेल्यामुळें प्रस्तुत हा बहाणा यांनीं काढला आहे. आमच्या मिशनच्या मंडळीच्या तर तोंडचें पाणी पळालें; आणि माझ्या हयगई स्वभावाचा

मला पस्तावा होऊं लागला. बुद्धाच्या व साधु पुरुषांच्या तसबिरी जळून नाश पावल्या तथापि एवढ्या घालमेलींत त्यांविषयीं शोक करण्यालाही मला सवड मिळाली नाहीं. चीनच्या बादशहाला भेट घेण्याची तर सर्व आशा बुडालीच; परंतु चिरकालिक तुरुंगाची भेट घेण्याचा प्रसंग आला नाहीं म्हणजे मोठें भाग्य असें मला वाटलें.

हें सर्व दुःख मीं मुकाट्यानें गिळलें. कारण तें इतरांशीं सांगण्यास मला तोंड कोठें होतें? सांगितलें असतें तर त्यांत माझीच फजिती होती. ही हकीगत मग माझ्या त्या ख्रिस्ती मांडेरीन मित्रास सांगून त्याची मसलत घेण्याचा मीं विचार केला. माझा मित्र ही बातमी ऐकतांच धावऱ्या धावऱ्या मला भेटावयास आला. तो म्हणाला— "पहा बाबा ! वेळतर मोठी बिकट आली आहे. चिनी लोकांत तुमच्याविषयीं अगोदरच फार संशय व तिरस्कार आहे. तशांत गेल्या रात्रींच्या हकीगतीनें तर त्यांस फारच चीड आलेली दिसत आहे. त्यांनीं अनेक कंड्या पिकविल्या आहेत. यांत बरी गत दिसत नाहीं."

त्यावर मीं त्यास ह्मटलें—"हें सर्व खरें, पण यास आतां उपाय ?"

माझा मित्र म्हणाला—"उपाय कसला ? ही हकीगत बहुधा बादशहाच्या कानीं जाईलच आणि मग त्याच्या मर्जीस काय येईल तें खरें."

बादशहाच्या मर्जीचा कल कोणीकडे आहे याविषयीं, त्यानें बादशहाच्या तोंडांतून नुक्तेच निघालेले उद्गार मला सांगितले; त्यावरून बरीच अटकळ मला

करितां आली. तो म्हणाला,--" थोड्याच दिवसांवर, नवीन कारागिरीचीं कांहीं युद्धोपयोगी शस्त्रें इंग्लंडाहून येथील सेनापतीनें आणविलीं होतीं; त्यांत एक पितळी गर्नाळ आली होती. तिची परीक्षा बादशहानें स्वतः पाहिली. ही तोफ उचलासाचलायाला अगदीं हलकी असून, गोळा फार दूर जावा, एवढेंच नाहीं तर त्याचा रस होऊन शत्रूवर वर्षाव व्हावा अशा खुबीनें केली होती. हें पाहून बादशहा फार विस्मय पावला आणि त्यानें अशीं शस्त्रें घडणाऱ्या कारागिराच्या चतुराईची वाहवा केली खरी ; तरी शेवटीं तो म्हणाला कीं जे लोक अशीं घातुक शस्त्रें वापरीत असतील त्यांस धिःक्कार असो ! आमच्या धर्मांत दया, परोपकार, भ्रातृभाव आणि परमार्थ साधण्याविषयीं अशीं अशीं उत्तमोत्तम वचनें आहेत म्हणून ज्या लोकांचे पाद्री आपणास एवढ्या डौलानें सांगत असतात, तेच लोक युद्धोपयोगी घातुक शस्त्राऽस्त्रांत एवढी सुधारणा कोणत्या भावानें करीत असतील बरें ? ही घातुक विद्या ते कोणत्या बुद्धीनें एवढ्या पूर्णतेस नेत असतील ? आणि अशा लोकांचा विश्वास तरी कोणीं कसा धरावा ? "

वरील हकीगतीवरून माझ्या मित्राचा भावार्थ मला असा दिसून आला कीं, ही हकीगत बादशहाच्या कानावर गेली असतां, हजार वाक्यांनीं त्याच्या मनांत कांहीं तरी कोळें बेरें यावयाचें, आणि मग त्याचा परिणाम नीट व्हायचा नाहीं. तथापि माझ्या म्यांडरीन मित्रानें मला पुष्कळ धीर दिला; आणि होईल तितकें करून बादशहाचा राग शांत करण्याचा आपण यत्न करूं असेंही मला

वचन दिलें. परंतु पुढें काय झालें, कोण जाणें ! माझ्या या म्यांडेरीन मित्राची आणि माझी हीच शेवटची भेट; यानंतर पुन्हा कांहीं माझ्या दृष्टीस तो पडला नाहीं. यावरून माझी अशी अटकळ झाली कीं, कदाचित माझ्याविषयीं कांहीं रदबदली त्यानें बादशहापाशीं केली असल्यास ती निष्फळ झाली असावी; इतकेंच केवळ नाहीं, तर त्याला ठपका मिळून कांहीं नुकसानीलाही पात्र व्हावें लागलें असावें. माझ्यावर त्याचे बरेच उपकार झाले होते, म्हणून मला वाटलें कीं भ्याल्यामुळें माझी भेट त्याच्यानें घेववत नसल्यास चिंता नाहीं; त्याचें दुसरें कांहीं नुकसान न होवो म्हणजे झालें. परंतु त्या बिचाऱ्याचें पुढें झालें काय याविषयीं कांहीच खबर मला लागली नाहीं.

वरील हकीगत घडल्याला फार दिवस गेले नाहींत, तोंच आमच्या वरिष्ठाला पेकीन शहरीं जाण्याचा हुकूम झाला. आमचा मूळ हेतुतरी पेकीन येथें हिंवाळा काढावयाचा असाच होता; यामुळें या हुकुमाचें आम्हास कांहीं वाटलें नाहीं. आम्ही आमच्या परिवारासकट पेकीन शहरीं येऊन पोंचलों आणि हिंवाळयांत लागणाऱ्या अधिक उण्या चिरगुट पांघुरणाची बेगमी करून ठेवण्याचा आम्ही दूर दृष्टीनें विचार करूं लागलों. विचार करूं लागलों इतकेंच; बाकी तो विचार अमलांत आणण्याची जरूर पडली नाहीं. कारण आम्ही पेकीन शहरीं आलों, त्याच्या दुसऱ्याच दिवशीं चीनच्या राज्यांतून एकदम निघून जाण्याविषयीं बादशहाकडून आम्हांस ताकीद मिळाली.

या दिवशीं आदितवार होता. मला पक्की आठवण आहे. आदितवार असल्यामुळें आमच्या वरिष्ठास त्याच घटकेला निघून जाण्याचें फार गैरसोईचें झालें. याशिवाय आमच्या बांधाबांधी वगैरे व्हावयाच्या होत्या; आणि जीं कामें मनांत धरून ' मिशन ' इकडे आलें होतें तीं जरी बहुतेक पुरीं होत आलीं होतीं, तरी अटकळीप्रमाणें आणखी कांहीं दिवस पेकीन शहरीं राहवयास मिळालें असतें तर बरें झालें असतें, असें आम्हा सर्वांस वाटलें. परंतु करतां काय ? बादशहाच्या ताकिदीपुढें कोणाचाही इलाज चालला नाहीं. मग मोठ्या मिनतवारीनें दोन दिवसांची मुदत मिळाली—सोमवार आणि मंगळवार.—बुधवार उजाडला कीं आम्हांस चीनच्या राज्यांत पाय ठेवण्याची कांहीं सोय नव्हती !

बादशहानें असा हुकूम एकाएकीं कां काढला याला बरींच कारणें होतीं. तथापि त्यांतच, माझ्या हयगईनें जेहोल येथें अपरात्रीं उडालेल्या बाराची हकीगत हें एक कारण असल्याचें सर्वांच्या बोलण्यांत येऊं लागलें. जो तो मजकडे पाहून आपापल्याशीं कुजबुजूं लागला. आणि हें सर्व मला निमूटपणें सोसून घ्यावें लागलें.

आम्ही पेकीन राजधानी सोडून निघालों ते एकाएकींच निघालों. यामुळें आमच्या सामाना सुमानाची धड बांधबांध ही करून आम्हांस घेतां आली नाहीं; मग मला ज्या कांहीं चिनी वस्तु, खेळणीं वगैरे घ्यावयाचीं होतीं तीं नीट निवडून घेण्याला फुरसत कोठली ? तथापि मी घर सोडून निघालों तेव्हां माझ्या कित्येक जवळच्या

नातेवाईकांनीं कांहीं वस्तू मुद्दाम चिनांतून आणण्याविषयीं मला एवढी भीड घातली होती, कीं त्या न घेऊं म्हटलें तर चालण्यासारखें नव्हतें; म्हणून मी आपलीं पाकिटें वगैरे भरून, बंद करून, पुढें जहाजावर रवाना करून दिलीं आणि मिळतील त्या तरी कांहीं वस्तू घेऊन जाऊं अशा इराद्यानें बाजारांत निघालों. चिनामध्यें सगळा हिंवाळा काढावा लागेल असा आमचा पहिला अदमास असल्यामुळें बरोबर घ्यावयाच्या वस्तु पुढें घेतां येतील असें म्हणून अगोदर घेतल्या नाहींत, त्या आतां एकाएकीं घेण्याची पाळी आली. तेव्हां हव्या होत्या त्यांपैकीं कांहीं वस्तु मिळाल्या, कांहीं मिळाल्या नाहींत, आणि ज्या मिळाल्या त्या मनासारख्या मिळाल्या नाहींत; मिळून चोहोंकडून पदरीं अपेश, दुसरें कांहीं नाहीं !

आम्ही पेकीन शहर सोडून निघालों ते थेट कलत्यास आलों. चीनच्या बादशहाची इतराजी झाली असल्यामुळें चीनच्या किनाऱ्यावरील बंदरांत पाय ठेवण्याचाही उपाय नव्हता; इतकेंच नाहीं तर चीनचीं स्नेहांकित अशीं ब्रम्हदेश, सयाम वगैरे जीं पूर्वेकडील द्वीपकल्पांतील राज्यें, त्यांच्या किनाऱ्यावरही उतरण्याची आम्हांस सोय नव्हती. यामुळें मिशनच्या मंडळीस वाईट वाटलें हें खरें; तरी त्यांच्या पेक्षांही मला विशेष वाईट वाटलें. कारण या देशांसंबंधाची बरीच उपयुक्त व चमत्कारिक माहिती मला माझ्या ग्रंथांत घालतां आली असती; तिला मी अंतरलों असें मला वाटलें.

चीन सोडून निघाल्यानंतर, जहाजामध्यें, चिटोऱ्यावर करून घेतलेलीं टिपणें, बांधलेल्या वह्यांमध्यें, साकसुरत उतरून ठेवण्याचा माझा बेत होता. परंतु ' मन चिंती एक, आणि दैव घडवी भलतें, ' म्हणून मी आजारीच कां पडूं नये ? आमचें जहाज किनारा सोडून निघालें मात्र, तों एवढें तुफान सुरू झालें आणि समुद्र एवढा खवळला कीं आमच्यामध्यें ज्या कोणास कधीं जहाज लागावयाचें नाहीं त्यांसही सपशेल पडून राहण्याचाच प्रसंग आला. अशा स्थितींत आमच्या त्या वह्यांकडे आणि टिपणांकडे कोण लक्ष देणार ? तेव्हां सहजच टिपणें उतरून ठेवण्याचें काम मला लांबणीवर टाकावें लागलें. आपल्या मनाशीं मीं म्हटलें--' आपण करावयाचें तितकें केलें; आतां आपला निरुपाय आहे. त्यापेक्षां घरीं गेल्यावर ग्रंथ लिहिते वेळींच, जसजशी गरज लागेल, तसतशीं हीं टिपणें वाचून पाहूं म्हणजे झालें. थोडे दिवसांसाठीं तीं लिहून काढून तरी काय करावयाचें आहे ? ' असें म्हणून टिपणें उतरून ठेवण्याच्या भरीस मी पडलों नाहीं. तथापि एवढें केलें कीं, तीं टिपणांचीं चिटोरीं, कांहीं ह्या कोटाच्या खिशांत, कांहीं त्या कोटाच्या खिशांत, अशीं चार चोहोंकडे जीं पडून राहिलीं होतीं, तीं एकत्र जमा करून काळजीनें एका बंगींत घालून ठेवलीं.

आमची स्वारी हुगळी बंदरांत येऊन दाखल झाली. कांठावर उतरल्यावर पहिल्यानें मीं सुखरूप येऊन पोचल्याची बाबांस तार केली. मग कलकत्यास चार स्नेही गृहस्थांच्या भेटी घ्यावयाच्या होत्या त्या घेतल्या. आणि

कलकत्ता येथें वेळ काढण्याचा माझा मानस नसल्यामुळें मी दुसरेच दिवशीं मेल गाडीनें मुंबईस निघून आलों.

मला भेटण्याकरितां मोठ्या उत्कंठेनें बाबा मुंबईस आले होते. प्रवासाहून मला सुरक्षित आलेला पाहून त्यांस आनंद झाला. भेटतां क्षणीं त्यांनीं पहिलाच प्रश्न हा केला कीं—'तुझ्या त्या प्रवासाच्या ग्रंथाची तुला आठवण आहेना ? टिपणें विपणें नीट करून आणलीं आहेस ना ?' याचा जबाब, ऐकलें न ऐकलेंसें करून, मीं घाईघाईत कांहीं स्पष्टपणें दिलाच नाहीं. तथापि माझ्या या अप्रतिम ग्रंथाविषयीं बाबांच्या मनांत केवढी उत्कंठा उत्पन्न झाली होती, याची वरीच कल्पना त्यांच्या या प्रश्नावरून वाचकांस करतां येईल. पुण्यास गेल्यावरही ग्रंथ लिहिण्याविषयीं बाबांनीं नित्य माझा पाठ पुरावा घेतला. मींही त्यांस रोजच्या रोज 'आज करूं, उद्यां करूं' असें म्हणून बरेच दिवस चाळवीत नेलें. शेवटीं, एक दिवस, ते अगदीं एकेरीवर आलेले पाहून मी लिहावयास बसलों. आमचीं तीं पाकिटांत भरून ठेवलेलीं टिपणांचीं चिटोरीं बाहेर काढलीं, आणि एकेक चिटोरें घेऊन वाचूं लागलों. मला मोठी उमेद होती कीं हीं चिटोरीं वाचून प्रवासांत पाहिलेल्या बहुतेक गोष्टींचें मला स्मरण होईल; परंतु काय सांगावें ! माझी समूळ निराशा झाली. अगोदर, पहिलें चिटोरें कोणतें आणि मागूनचें कोणतें, हेंच मुळीं कळेना. तेव्हां ह्या चिटोऱ्यांवरील हकीगतींची सारखी सांखळी जुळावी कशी ? बरें एकेक चिटोरें वेगळें वेगळें घेऊन वाचून पाहूं लागलों तों त्यांतला थोडक्यांत लिहिलेला मजकूर मुळींच

लागेना. मिळून एकाला शेंपूट आहे तर दुसऱ्याला पाय नाहीं, व एकाला कान आहे तर दुसऱ्याला शेपूट नाहीं— मिळून इथून तिथून सगळा गोंधळ !

याप्रमाणें आमचें लिहिण्याचें बस्तान न बसल्यामुळें सारी तारांबळ उडाली असतां, बाबांची एकसारखी हाकाटी चाललीच होती आणि मीही रोजच्या रोज नवे नवे वाहणे काढून त्यांस चाळवीत होतों. हे वहाणे शोधून काढावयाला मला मोठीशी अडचण पडली असें नाहीं. चीनची सफर मारून मी नुकताच आलों असल्यामुळें, आमचे सोयरे धायरे, इष्ट मित्र, स्नेही सोबती, रोज मला पुष्कळ भेटावयास येत आणि भिडेखातर त्यांच्याशीं बोलण्या चालण्यांत व प्रवासांत पाहिलेले चमत्कार सांगण्यांत बराच वेळ मला मोडावा लागे. झालें, लिहावयास न बसण्याला इतकें निमित्त मला पुरे होतें.

असें करितां करितां, एके दिवशीं पुढील जाहीरात वर्तमानपत्रांत प्रगट झालेली आमच्या बाबांच्या पाहण्यांत आली:—

## "छापत आहे.

"इंग्रज सरकारानें मुद्दाम पाठविलेल्या चीनच्या मिशनची समग्र हकीगत. कर्ता—खंडोबा बिन गणोबा नेमके, बी. ए. यांत मिशननें मिळविलेला अनुभव, चीन देशाचें वर्णन, तेथील रीतीभातीची माहिती, आणि त्याची धार्मिक व सामाजिक स्थिति इ. इ. अत्यंत महत्वाचे, मनोरंजक, आणि विश्वसनीय विविध विषय आले आहेत. तात्पर्य चीन देशासंबंधी जाणण्यासारखी एकही गोष्ट यांत सो-

डलेली नाहीं, व यामुळें हा एक प्रमाणभूत ग्रंथ होणार आहे. सर्वांनीं अवश्य संग्रह करावा."

ही जाहिरात पाहतांच बाबा फार हिरमुसले झाले. त्यांचें तोंड अगदीं उतरून गेलें. त्यांनीं मला हाक मारली आणि वर्तमानपत्रांतील ही जाहिरात दाखवून मला म्हटलें,—"झालें बाबा! शेवटीं दुसऱ्यांनीं तुमच्या आधीं ही हकीगत प्रसिद्ध केली! आतां बसा तुम्ही खुशाल माशा मारीत! मागाहून सावकाश, तुमचा ग्रंथ निघणार, त्याला मग कोण विचारील? अघाडी मारली त्या खंडोबानें!—ज्याची तूं लहानपणापासून हेव्यानें निंदा करीत होतास!"

मीं पाहिलें तों खरेंच, माझा जुना प्रतिस्पर्धीच या जाहिरातींतील पुस्तकाचा कर्ता! नुसती जाहिरात वाचूनच मला इतकें वाईट वाटलें नसतें. परंतु त्यावर माझ्या बाळपणच्या प्रतिस्पर्ध्याचें नांव वाचलें तेव्हांतर माझ्या मनाला एकदम चटकाच बसला. तथापि तसें कांहीं न दाखवितां मी बाबांस म्हणालों—"या चोपड्याला काय करतां? स्वतः अनुभवाच्या माहितीनें भरलेल्या माझ्या ग्रंथापुढें या तोंडोतोंडच्या माहितीच्या भिकार पुस्तकाचा काय टिकाव लागणार आहे? तशांत प्रत्येक बाबतींत माझे खोल विचार व चटकदार भाषासरणी यांनीं माझ्या ग्रंथाला जी शोभा येईल तिच्या पुढें हें पुस्तक पासंगालाही पुरणार नाहीं. माझी लिहिण्याची हातोटी तुम्हाला माहितच आहे. या पुस्तकानें जर अघाडी मारली तर माझा ग्रंथ अखेरी मारील!" असें

म्हणून थोडकासा उपोद्‍घातरूप भाग मीं लिहिला होता तो बाबांच्या पुढें टाकला.

हा भाग वाचून पाहतांच बाबा फार खुष झालेसे दिसले. त्यांचें मन जरा शांत झालें. आणि हसूं आलेलें बळानेंच दाबून ते म्हणाले-" हें सर्व खरें, पण ग्रंथ लिहून तयार होईल तेव्हांना ! आजपर्यंत तर तूं मला पुष्कळ चाळविलेंस आणि यापुढें आणखी किती चाळवीत नेणार, परमेश्वराला ठाऊक ! बरें तर, सारख्या नेटानें हा ग्रंथ एकदा पुरा करून दे, म्हणजे झालें ! "

तोंडावर मी हो म्हणून म्हटलें, परंतु खरी अडचण काय होती ती कुठें त्यांस मीं सांगितली ? ग्रंथ लिहावयास घ्यावा कसा ? जीं टिपणें मी थोडक्यांत आटपशीर लिहून घेतलीं होतीं तीं मला आतां अगदीं लागतना, हें मीं वर सांगितलेंच आहे. आणि जीं लागत त्यांच्यावर चार चार तास घुमावें लागे तेव्हां वाक्यें बसवतां आलीं तर बसवतां येत, उदाहारणार्थ, एका चिटोऱ्यावर पुढील प्रमाणें टिपण होतें-" प. भिंत $\frac{३०}{१०}$ स. १२०० मै. घे. १ म्यांड. दंत सांगितली स. २००० = १८०० + २०० " यावर विचार करतां करतां लक्षांत आलें तें वाक्य असें-" चीनच्या पश्चिमेस भिंत आहे, ती १० फूट रुंदीच्या पायावर ३० फूट उंच बांधली असून सगळा १२०० मैल घेर आहे. एका म्यांडरीनानें दंतकथा सांगितली कीं १८००+२०० म्हणजे इ. स. पूर्वीं २०० वर्षांवर म्हणजे आजपासून २००० वर्षांपूर्वीं ही बांधली आहे ! " हें एवढें वाक्य बसविण्याला माझा संबंध एक दिवस मोडला ! अशा प्रकारें

प्रत्येक टिपणाशीं झुजत बसण्याची पाळी येऊं लागल्यामुळें मला माझा ग्रंथ हातीं घेण्याचा कंटाळा येऊं लागला. तथापि बाबांची टुमणी रोज माझ्या मागें होतीच. त्यामुळें जसजसे दिवसामागून दिवस निघून जाऊं लागले तसतसा बाबांचा मला अधिकाधिक धाक वाटूं लागला. मग मी त्यांची गांठ घेण्याचें टाळवेल तेवढें टाळूं लागलों. शेवटीं या धाकांतून सुटण्याचा एक उपाय मला सुचला आणि त्याचाच मीं अंगीकार केला.

चीनच्या प्रवासाहून आल्यावर थोडेच दिवसांनीं माझ्या मावशीकडून पत्र आलें होतें कीं मला एकदा भेटून जा म्हणून. तेव्हां मीं विचार केला कीं ही बरी आहे संधी. मावशीला भेटल्यासारखेंही होईल आणि आपल्या पाठीमागचा चार दिवस बाबांचा तगादाही चुकेल. म्हणून मी बाबांस एक दिवस म्हटलें कीं रोज उठून मला येथें भेटण्याला मंडळी येते, त्यामुळें माझें लक्ष लिहिण्याकडे नीट लागत नाहीं; तर थोडे दिवस मावशीकडे जाऊन रहावें असा माझा बेत आहे.

यावर बाबांनीं निराशेनें एक मोठा सुस्कारा टाकला, परंतु कांहीं वेळपर्यंत एक शब्दही तोंडावाटे काढला नाहीं. मावशीकडे निघून जाण्याची ही माझी लटपट त्यांच्या पूर्णपणें लक्षांत आली असें दिसलें. शेवटीं मोठ्या कष्टांनीं त्यांनीं मला मावशीकडे जाण्यास परवानगी दिली.

# प्रकरण ५ वें.

## बीज तशीं फळें.

मना ! त्वांचि रे ! पूर्व संचीत केलें
तयासारिखें भोगणें प्राप्त झालें. ।

**रामदास.**

बाबांची पडत्या फळाची आज्ञा मिळतांच मी माव-शीच्या गांवीं निघून गेलों. बाबांनीं ही आज्ञा, आढेवेढे न घेतां, दिली कशी, याचें प्रथम मला आश्चर्यच वाटलें. परंतु खरें पाहिलें असतां, यांत आश्चर्य नव्हतें. कारण मावशीच्या गांवीं बाबांनीं कांहीं स्थावर मिळकत विकत घेतली होती आणि तिची व्यवस्था पाहण्याकरितां दर वर्षास त्यांस तिकडे जावें लागत असे. या वर्षी स्वतां न जातां, त्यांनीं हें व्यवस्थेचें काम मजवर सोंपविलें.

मी येणार म्हणून मावशीला अगोदर पत्र बित्र लिहावें तें कांहीं एक लिहिलें नाहीं. आरंभीं तसा माझा बेत होता, परंतु मग ' आज लिहूं, उद्यां लिहूं ' असें म्हणतां म्हणतां एकदम निघण्याचाच बेत झाला. " मग पाहिलें तों असें लक्षांत आलें कीं आतां पत्र लिहून कांहीं उपयोग नाहीं; पत्र आणि मी संगतीच जाऊन पोंचणार. हें पत्र न गेल्यामुळें मावशीच्या घरीं माझें जाणें केवळ अपरिचित झालें. माझ्या हातून ही जी हयगय

झाली ती खरोखर मोठी चूक झाली असें मला लागलेंच प्रत्यंतराला आलें. कारण माझ्या येण्यानें मावशीच्या घरांत सर्वांस जो आनंद व्हावयाचा; तो न होतां, त्यांची तारांबळ मात्र उडाली आणि सगळ्यांची आपसांत कुजबुज चालली. पागोटें काढून मी अंगरखा खुंटीला अडकवीत असतांच मावशीच्या तोंडून पुढील उद्गार निघालेले माझ्या कानीं आले–" कोण आलें? कवीश्वर! याला आतांच कोठून यावयाला फावलें? बरें, मी येणार म्हणून अगोदर कळवायचें तरी होतें? पाहुणी मंडळी अगोदरच घरांत येऊन बसली आहे. त्यांच्या गर्दींत ह्याच्या साठीं भांडीं कुंडीं, आथरुणें पांघरुणें हीं सर्व आयते वेळीं मी आतां आणूं कुठून?"

मावशीकडे मी पाहुणा गेलों, तो एकटाच गेलों नाहीं. मी, माझी बायको, आणि लहान मूल, अशीं आम्ही तिघें गेलों! आपल्या लोकांच्या रिवाजाप्रमाणें माझें लग्न मागेंच झालें होतें. ही गोष्ट यापूर्वीं मी सांगितली नाहीं, याचें कारण इतकेंच कीं ज्या उद्देशानें मी आपली ही हकीगत सांगत आहें त्याला अनुलक्षून सांगण्यासारखी एखादी गोष्ट या संबंधाची घडली नाहीं. परंतु आतां येथें येवढें सांगणें अवश्य आहे कीं माझें कुटुंब माझ्या मावशीच्या जवळच्या नाते वाइकांपैकीं असून माझें लग्न मावशीनेंच मध्यस्थी करून जुळविलें होतें. तेव्हां आम्ही गेलों ते कोणी परकी म्हणून गेलों होतों असें नाहीं. तरी आमच्या अवचित जाण्यानें मावशीची सहजच तारांबळ उडाली. तशांत मी एकटा असतों तर गोष्ट निराळी; पण आम्ही पडलों तिघें–उभयतां दोघें आणि तिसरें तान्हें मुलगें.

या एवढ्या खटल्यानें तिचा जीव चिवचिवला आणि तिच्या तोंडून वरील उद्गार निघाले तर त्यांत नवल काय? तथापि तें ऐकून माझ्या बायकोला फार खेद झाला आणि मला तर हा अपमानच वाटला.

दोन दिवसांनीं आम्ही आमच्या स्वतःच्या घरीं रहावयास गेलों. हें घर, तेथून दोन मैलांवर आमची शेतवाडी होती, तेथें होतें. मावशीकडे आलेली पाहुणी मंडळी दहा पंधरा दिवस राहिली, तों पर्यंत विशेष कांहीं घडलें नाहीं. मावशीनें आणि नानांनीं ( मावशीच्या नवऱ्याला मी या नांवानें हांक मारीत असें ) आमची बेतापुरती विचारपूस केली व रीतीप्रमाणें समाचार घेतला. तथापि भेटण्याविषयीं त्यांची जी उत्कंठा पत्रोत्तरीं दिसली तिचा एक दशांशही आतां त्यांच्या वागणुकीवरून नजरेस आला नाहीं, हें माझ्या तावडतोब लक्षांत आलें.

पाहुणी मंडळी जाऊन सर्व जिकडच्या तिकडे झाल्यावर, एके दिवशीं, आम्हांस मावशीनें मुद्दाम जेवावयास बोलाविलें. जेवणाचा बेत लौकरच म्हणजे १० वाजतांचा होता. कारण नानांची प्रकृति अंमळ बिघडली होती, म्हणून तिनें सांगितलें—“ जेवण लवकरच करण्याचें ठरलें आहे. आमची गाडी तुम्हा तिघांस, आणावयासाठीं नऊ वाजतां तुमच्याकडे येईल, तेव्हां तयारीनें राहून चटकन निघून या म्हणजे झालें. ” मी हें आमंत्रण मान्य केलें. दुसरे दिवशीं सकाळीं बरोबर नऊ वाजतां मावशीची गाडी येऊन दाराशीं उभी. माझ्या बायकोनें एवढें एक शाहाणपण केलें होतें कीं मजकडून

सकाळींच स्नान करवून, घरकामाची आटपाआटप करून ठेविली होती. मी स्वस्थपणें आंतल्या खोलींत वाचीत बसलों होतों. इतक्यांत हिनें गाडी आल्याची वर्दी दिली. तेव्हां वाचण्यांत माझें मन एवढें रंगलें होतें कीं हातांतलें पुस्तक माझ्यानें सोडवेना. आणखी एक दोन वेळां हिनें निघण्याची तयारी झाल्याविषयीं मला सूचना दिली. तथापि मीं म्हटलें—' जेवणें दाह वाजतां व्हावयाचीं आहेत. वाचणें सोडून एवढ्या लौकर तिथें जाऊन काय करावयाचें आहे ? जावयाला फार तर वीस मिनिटें लागतील. आपण येथून साडे नऊ वाजतां निघूं म्हणजे झालें. " त्याप्रमाणें पुस्तक मिटून साडे नऊ वाजतां मी तर डोक्यांत पागोटें घातलें. परंतु काय योग म्हणावा ? आमच्या बाळ्यानें रडण्यास जी सुरवात केली ती कांहीं केल्या बंदच होईना. त्याला उगी करण्यासाठीं हिनें झाला तेवढा प्रयत्न केला, आणि मीं ही दटावून पाहिलें; परंतु तो कांहीं केल्या ऐकेना. शेवटीं घड्याळांत दहाचा ठोका पडला; तरी घरांतून आमचा पाय निघाला नाहीं. तेव्हां मी भांबावलों आणि मुलास उगी करतां येत नाहीं हा हिचाच दोष असें धरून तिलाच रागें भरूं लागलों. परंतु सहनशीलपणानें हें सर्व ऐकून घेऊन, ती एवढेंच म्हणाली— ' दोन तीन वेळां मी वर्दी दिली ती इथें लक्षांतच नाहीं वाटतें ? '

मग आम्ही तसेच गाडीत बसलों. पोराची पिरपीर वाटेनें चाललीच होती, तरी आजुबाजूची मौज पहातांना ती बरीच कमी झाली. आम्ही मावशीच्या घरीं

आलों तों साडे दहा होऊन गेले. नाना पथ्य घेऊन तंबाखू चोळीत बैठकीवर बसले होते. मुला माणसांचीं जेवणेंखाणें आटपलेलीं दिसत होतीं. मावशी मात्र सोंवळ्यानें आमची वाट पहात सैंपाकघरांत बसली होती. जेवणाची सर्व सिद्धताच होती. आम्ही आलों ते निमूटपणें पाय धुऊन, सोंवळीं नेसून, पानांवर बसलों. कामाशिवाय कोणाच्या तोंडांतून एक अक्षरही अधिक निघालें नाहीं. मावशीनें पाहुणचारासाठीं अगत्यानें पुष्कळ पदार्थ केले होते. परंतु भातापासून कढीपर्यंत सर्व थंडगार! जेवतांना मात्र एकदा मावशीनें एवढें म्हटलें–'पदार्थ अगदीं निवालेना? एवढे श्रम करून पदार्थ केले, त्यांचा पुरता स्वाद तुह्मांस मिळाला नाहीं!'

जेवणानंतर मी पानसुपारीकरितां नानांपाशीं बैठकीवर येऊन बसलों. पान खाल्ल्यावर नानांनीं कडसरीची तपकिरीची डबी काढून एक चिमूट ओढली, आणि मला बोल लावण्याच्या हेतूनें, प्रस्ताव केला. ते म्हणाले—'कवीश्वर, चिनास गेल्यावर आम्हांस खुशालीचें पत्र पाठव म्हणून हिनें तुला पुष्कळ सांगितलें होतें, कदाचित त्याला तुला वेळ मिळाला नसेल; परंतु चिनाहून परत आल्यावर तरी आम्हांस कळवावें, तेंही गडबडीत झालें नाहींना? बरें, भेटावयाला येण्याविषयीं मीं लिहून पाठविलें त्याचें तरी उत्तर पाठवावयाचें होतेंस? आणि अमुक दिवशीं येतों म्हणून कळवावयाचें होतेंस? परंतु तुम्ही थोर लोक, चीनची सफर करून आलेले, तुम्ही आम्हाला कसपटासमान लेखतां तें ठीकच. आतां एकाएकीं येणें

झाल्यास, तुमचा आदरसत्कार आम्हा गरीबांकडून बरोबर व्हावा कसा? तथापि आतां आहे हेंच गोड मानून घ्या म्हणजे झालें!"

यावर मीं म्हटलें—" आम्ही थोर लोक कसले आणि तुम्ही आमचा एवढा आदरसत्कार तो कसला करावयाचा? आतां भेटायाला येण्यापूर्वी तुम्हांस पत्र धाडावयास पाहिजे होतें आणि पाठवावें असें मी कित्येक दिवस म्हणतही होतों. परंतु निघण्याचा बेत झाला एकाएकीं आणि टपालांतून पत्र पोचणार त्याच्या अगोदरच आम्ही येऊन पोचण्याचा संभव दिसल्यावरून पत्र लिहिण्याच्या भरीस मग मी पडलों नाहीं इतकेंच."

यावर नाना म्हणाले—" पण एकाएकीं निघण्याचा बेत कां झाला? आणि चिनांतून परत आल्यावर खुशालीचीं पत्रें कां नाहीं आलीं, याचें कारण तर कळेल? बरें तें असो "—पुन्हां एकदा डबी काढून त्यांनीं तपकिरीची एक चिमूट ओढली आणि म्हटलें—" परंतु माझ्यासाठीं चिनांतून तपकिरीची एक स्प्रिंगची डबी आणण्याविषयीं मुद्दाम लिहिलें होतें, ती आणली असशीलच, ती तर आम्हास मिळूं दे!"

हे शब्द ऐकतांच मावशीही काम आटपून बाहेर आली आणि म्हणाली—" आणि चिमणीनें चिनी बाहुली आणावयास सांगितलें होतें ती तूं आल्यापासून एकसारखी मागत आहे, ती तिला दे कशी? आणि गोविंदा तुला तुझा भोंवरा व कलमदान पाहिजे कारे?"

एखादी सूचना, आमचें भाषण ऐकत आजूबाजूला उभी असलेल्या त्या मर्यादशीळ व सजमदार मुलांना पुरे झाली. 'भाऊ साहेब ! आमचा भोंवरा आणला का ?'– 'मजकरितां चाकू, पेनशिली, लेखण्या वगैरे ठेवण्याचें नळकांडें चिनांतून आणलें आहे काय ?'–'आणि माझी मङ्डुम' 'आणि माझा चिनी पंखा' याप्रमाणें त्या मुलांनीं माझ्या भोंवतीं मागण्याचा एकच गिल्ला केला. हे जिन्नस जर त्या मुलांस द्यावयास मला सांपडले असते तर त्यांस व मलाही किती संतोष झाला असता ! परंतु व्यर्थ ! निमूट मान खालीं घालून मला बसावें लागलें. तशांत हे सर्व जिन्नस मीं मुद्दाम खरेदी केले नसते तर गोष्ट निराळी; परंतु खरेदी केले असतांही ते आणतां आले नाहींत हें पाहून तर मला ज्यास्तच वाईट वाटूं लागलें.

मला गप्प बसलेला पाहून—"हे जिन्नस खरेदी करण्याला, अगत्याच्या कामांपुढें, त्याला बहुधा वेळ मिळाला नसेल ! तेव्हां वाईट वाटून घेण्याला तुम्ही त्याच्यापाशीं ते कशाला मागतां ? नव्याण्णव वाट्यांनीं त्यानें हे जिन्नस आणले नाहींत, मी सांगतों, ध्या." असें नानांनींच परभारें उत्तर दिलें.

यावर घडलेली सर्व हकीगत मी त्यांस सांगितली. ती ऐकून घेऊन ते म्हणाले–" तूं हे जिन्नस अगोदर कां घेऊन ठेवले नाहींस ? आयते वेळीं कां घेतलेस ? बरें, आयते वेळीं तर आयते वेळीं; पण तेही पेटीमध्यें घालून नीट कां ठेवले नाहींस ? समुद्रामध्यें पडणार नाहींत अशी सावधगिरी कां ठेवली नाहींस ? ह्या सगळयाचें कारण

एकच आहे, आणि तें हेंच कीं तुला आमची पर्वा नाहीं; दुसरें काय ?" मावशीचें ह्मणणेंही तसेंच पडलें. त्यामुळें नानांच्या बोलण्यास दुजोरा आला आणि माझें बोलणें लटकें पडलें. मी पुष्कळ सांगितलें कीं,-" तुमची मला पर्वा नाहीं असें कसें होईल ? तसें असतें तर मीं हे जिन्नस, पैसे खर्चून, मुद्दाम कशाला घेतले असते ?"

नानांच्या मनांतला उद्देश निराळा होता. तो प्रगट करण्याला ही संधी बरी आहे असें पाहून त्यांनीं आपलें बोलणें फिरवलें. ते म्हणाले-" तुझ्या मनांत आमच्याविषयीं प्रेम नाहीं असें आम्ही म्हणूं शकत नाहीं; परंतु ज्या त्या कामांत तुझी अशी हयगय कां ? मीं हिला ( मावशीकडे पाहून ) मागेंच सांगून ठेवलें होतें कीं, कवीश्वर हा अगदीं बेताल पोर आहे, आणि तेंच माझें म्हणणें आतां खरें पडत चाललें, पहा. त्याच्या बापानें त्याला एवढें शिकविलें व विद्वान केलें; परंतु टापटीप कशी शिकविली नाहीं, याचें मला राहून राहून आश्चर्य वाटतें. याची वर्तणूक आज सुधारेल, उद्यां सुधारेल, म्हणून आशा वाटत होती, परंतु व्यर्थ. याच्या हातून कोणतेंही काम धड होण्याचें लक्षण दिसत नाहीं. लग्नाच्या वेळेस तरी मी हेंच म्हणत होतों कीं,-अशा या अल्लड मुलाला आमची ही सगुणा देऊं नका. पण माझें हिनें ऐकलें नाहीं, आपलाच हेका चालविला, आणि त्या बिचाऱ्या सगुणेला संकटांत घातलें. आतां तिनें अशा नवऱ्याशीं काय करावें ? त्या पोरीची मला भारी कींव येते, बुवा !"

माझ्या वागणुकीवर नानांची अशी टीका चालली असतां, माझी बायको माजघरांत दाराआड उभी राहून हा सर्व प्रकार ऐकत होती. मीं आपली मान खालीं घातली होती, तरी, ही माझी निंदा ऐकून ती मुळुमुळू रडूं लागली, हें माझ्या लक्षांत आलें. माझ्या सर्व चुका आणि माझे सर्व अपराध मूर्तिमंत माझ्या डोळ्यांपुढें उभे राहिले आणि मला मरणप्राय दुःख वाटलें. नानांनीं माझी याही पलीकडे आणखी फजिती केली असती, तरी तिचें मला कांहीं इतकें वाईट वाटलें नसतें; परंतु माझ्या गैरवागणुकीमुळें माझ्या प्रियकरणीला खालीं पाहण्याची पाळी आली हें पाहून मला अधिक दुःख झालें.

याप्रमाणें नानांनीं मला आणखीही फजीत केलें असतें, परंतु मावशीनें मध्यें पडून नानाचें बोलणें बंद केलें. ती म्हणाली—" झालें तें पुरे झालें, आतां कांहीं त्याला बोलूं नका. तो आतां मोठा झाला आहे व त्याला आपलें हिताऽहित कळत आहे. कवीश्वर! हें जें बोलणें झालें तें केवळ तुझ्या कळवळ्यामुळेंच झालें. तुझा बेताल स्वभाव सुटून टापटिपीनें काम करण्याचें तुझ्या मनांत यावें आणि त्वां आपलें कल्याण करून घ्यावें एवढीच आमची इच्छा आहे. ही आमची इच्छा पूर्ण झाली आणि तूं सुखानें संसार करूं लागलास हें आम्हीं पाहिलें म्हणजे आम्हांस संतोष झाला."

येथें हें बोलणें आटपलें. मग पुण्याकडील कांहीं वरगुती गोष्टी निघाल्या. त्या झाल्यावर चीनच्या सफरी संबंधी बोलणें निघालें. ही हकीगत मात्र मी अशी

खुलवून सांगितली कीं ती ऐकून नानांनीं व मावशीनें माझी वाहवाच केली. आणि माझ्या चातुर्याविषयीं त्यांची खात्री होऊन, मजविषयीं त्यांचा जो वाईट ग्रह झाला होता तो बरेच अंशीं दूर झाला. हा शेवटला भाग बरा वठला, एव्यानेंच समाधान मानून आम्ही त्रिवर्ग संध्याकाळीं घरीं परत आलों.

**या**नंतर या गांवीं माझें राहणें सुमारें दोन वर्षें झालें. शेतवाडीची कांहीं दुरुस्ती करावयाची होती आणि माझेंही मन बाबांच्या समोर जाण्यास धजत नव्हतें; यामुळें मी दोन वर्षें येथेंच बसून काढलीं. एवढ्या अवधींत माझ्या बारीक सारीक हयगयीशिवाय सांगण्यासारखी विशेष गोष्ट घडून आली नाहीं. बाबांकडून आठ पंधरा दिवसांनीं पत्रें येत असत. आणि ते त्यांत ‘तुझा ग्रंथ कोठवर आला?’ तें वारंवार लिहून विचारीत असत. आरंभीं आपल्या पत्रांत त्यांनीं ग्रंथाविषयीं बरीच निकड लाविली, परंतु पुढें पुढें निराशेचे उद्गार काढून ते लिहूं लागले— “तुझा ग्रंथ कसला तयार होतो! आणि तो मला कसला पहावयाला मिळतो! मी मेल्या गेल्यावर मागाहून कदाचित तुझा ग्रंथ निघाला तर निघेल. माझ्या दृष्टीस पडेलसें मला वाटत नाहीं.” अशींच वाक्यें मग कांहीं दिवस त्यांच्या पत्रांत येऊं लागलीं आणि शेवटीं तर याविषयीं लिहिण्याचेंही त्यांनीं अगदीं सोडून दिलें.

**या**प्रमाणें माझीं येथें दोन एक वर्षें गेलीं, तशींच आणखी सुद्धां कांहीं गेलीं असतीं. परंतु एके दिवशीं, बाबांची प्रकृति एकाएकीं बिघडल्याचें पत्र आलें;

त्यांत मला तावडतोब निघून येण्याविषयीं लिहिलें होतें. त्याप्रमाणें मग आम्ही नानांचा व मावशीचा निरोप घेऊन पुण्यास निघून आलों. बाबांची प्रकृति फारच बिघडलेली दिसत होती. त्यांस बोलण्याचेंही सामर्थ्य नव्हतें. तरी मला पाहतांच त्यांस मोठा संतोष झाला आणि प्रेमपूर्ण दृष्टीनें मजकडे पाहून ते म्हणाले—"कवीश्वर, तुझा ग्रंथ तूं पुरा करून आणलास काय ? " हेच त्यांचे शेवटले शब्द ! 'संपत आला आहे,' असें मीं गुटमूळत अर्धवट उत्तर दिलें. तें त्यांनीं पुरे ऐकलेंही नसेल. तथापि त्यांच्या मुद्रेवरून ते निराश झालेसे दिसले. यानंतर त्यांचें वास्तव्य या जगांत फार दिवस झालें नाहीं. बाबांचा म्हणजे फार वृद्धापकाळ झाला होता असें नाहीं. तरी अलीकडे दोन वर्षें त्यांची प्रकृति फार क्षीण होत चालली होती. याविषयीं कशाही इतरांच्या वेगळया अटकळी असोत; परंतु माझा समज तर असाच झाला कीं त्यांच्या दुखण्याला मूळ कारण मजविषयींची चिंता ! दुसरें कांहीं नाहीं.

बाबांच्या मागें घरचा आणि छापखान्याचा सर्व कारभार मी मुखत्यारीनें पाहूं लागलों. पेटीच्या किल्लया माझ्या हातीं आल्या, तींत रोख रुपये व इतर नक्त ऐवज मिळून बरीच रकम हातीं लागली. याशिवाय छापखान्यामध्यें जी रक्कम अडली होती ती वेगळी. बाबांपाशीं जेवढी संपत्ति असेल असा लोकांस आभास होता, तीपेक्षां, मीं एकंदर मोजदाद केली ती फारच जास्त भरली. हें आमच्या बाबांच्या चोख आणि व्यवस्थेशीर कारभाराचें फळ यांत संशय नाहीं ! याच संपत्तीची मीं आपल्या हयगईनें आणि गैदीपणानें

अल्प काळांतच कशी वाताहत करून टाकली पहा ! हें मनांत आणलें असतां माझा मलाच वीट येतो, मग इतरांस येईल यांत नवल काय ?

नानांच्या उपदेशामुळें आणि बाबांच्या मरणामुळें माझ्या मनावर पश्चात्तापाचा ठसा उमटलासा दिसला. एकंदर कामकाज जशा नेटानें आणि जशा झोंकानें बाबांनीं चालविलें होतें, तशाच नेटानें व झोंकानें आपणही चालवावयाचें असा मीं मनांत संकल्प केला, आणि तसें तें वेळच्या वेळीं काळजीनें पाहूं लागलों. त्यामुळें ज्याशीं ज्याशीं बाबांचा संबंध होता त्यांच्या सर्वांच्या मनांत माझ्याविषयीं सुद्धां आदरबुद्धि उत्पन्न झाली आणि सर्व व्यवहार सुरळीत चालूं लागला. याप्रमाणें जेमतेम वर्ष दीड वर्ष लोटलें. परंतु पूर्वीची आठवण जसजशी बुजत चालली तसतशी आमची स्वारी पुन्हा आपल्या वळणावर जाऊं लागली. बाहेरगांवच्या गिराहिकांचीं जीं पत्रें मला येत त्यांस उत्तरें लिहिण्याचें काम पहिल्यानें मीं मागें टाकलें. त्यामुळें अशा पत्रांचा माझ्या टेबलाच्या खणांत मोठा ढीग जमला. उत्तरें लिहिण्याच्या इराद्यानें जेव्हां जेव्हां मीं त्याच्याकडे पाहीं, तेव्हां तेव्हां माझा ऊर अगदीं दडपून जाई व तत्क्षणीं मी तें काम दृष्टी आड करीं. माझ्या गिराहिकांस जेव्हां त्यांच्या पत्रांचीं उत्तरें मिळतनाशीं झालीं तेव्हां ते कुरकुरूं लागले आणि नवीन कामकाजही लिहून पाठवीतनासे झाले. यामुळें माझा व्यवहार संकुचित झाला आणि त्याप्रमाणानें प्राप्तिही हटली. प्राप्ति हटली तरी चालत आलेल्या लौकिकाप्रमाणें मला खर्चवेंच करावा लागे आणि छापखान्याचेंही

वैभव पूर्वीप्रमाणें कायम ठेवावें लागे. याप्रमाणें मागें हटतां हटतां पांच सहा वर्षे गेलीं. मग एके दिवशीं, पैशाची ओढाताण झाल्यामुळें, वही काढून पाहूं लागलों तों छापखान्याच्या कारखान्यांत प्रतिवर्षी बूड येत आहे असें आढळलें. ही बूड कोठवर आहे याचा मला नीट अंदाजही करतां येईना. कारण सगळाच व्यवहार अळमळीत असल्यामुळें वहींतही सर्वत्र घोटाळा माजला होता !

एके दिवशीं मी उत्कंठेनें वही तपासण्यांत गुंतलों असतां टपालांतून एक पत्र आलें. तें असें–" वि. वि. मीं सुमारें दोन महिन्यापूर्वीं कांहीं पुस्तकें पाठविण्याविषयीं लिहिलें होतें. त्यानंतर पुन्हा एकदा महिन्यावर आठवण देण्याकरितां पत्र लिहिलें. या दोहोंचाही जबाब नाहीं व पुस्तकेंही नाहींत ! असें कां ? आपला काय विचार आहे तो कृपाकरून एकवार कळवावा, म्हणजे बरें पडेल. कळावें. हे वि. "

हा गृहस्थ अब्रूदार व श्रीमंत असून, बावांचें हें फार जुनें गिराहिक होतें. त्यानें अदमासें १५० रुपयांचीं पुस्तकें या वेळेला मागविलीं होतीं. असल्या गिराहिकास नाखुष करणें चांगलें नाहीं असें मलाही वाटलें. मग पत्रांच्या ढिगांत त्याचें पहिलें पत्र पाहूं लागलों. परंतु तें त्यांत चटकन सांपडावें कसें ? तें शोधून काढण्याखालीं दहा बारा दिवस निघून गेले. शेवटीं तें सांपडल्यावर ज्या दिवशीं मी त्यांतील यादीप्रमाणें पुस्तकें काढून त्यांचे गठ्ठे बांधूं लागलों, त्याच दिवशीं सदर्हू गृहस्थाचें आणखी एक पत्र माझ्या हातीं येऊन पडलें. त्यांत पुढील मजकूर होता–

" वि. वि. मी पुस्तकांची यादी पाठविली तिला आज तीन महिने होत आले. आपलेकडून पुस्तकेंही नाहींत आणि उत्तरही नाहीं. आठवण देण्याकरितां पत्रें लिहून दमलों. अखेरीस सदहू पुस्तकें पाठविण्याविषयीं दुसऱ्या गृहस्थास लिहावें लागलें. यास्तव आतां आपण पाठवूं नयेत.

" आपल्या वडीलांशीं माझा फार स्नेह होता आणि तोच त्यांच्या चिरंजीवाशींही असावा अशी इच्छा होती. परंतु ह्या कामांत आपल्याकडून ढिलाईची फार शिकस्त झाली म्हणून निरुपाय. याचें मला फार वाईट वाटतें.

" गेल्या दोन वर्षांत नवीन निघालेल्या पुस्तकांपैकीं आपल्याकडून एकही पुस्तक आलें नाहीं. तुमच्या वडीलांपासून माझी सांगी आहे कीं एखादें चांगलेंसें पुस्तक नवीनच निघालें तर तें आमच्याकडे पाठवून देत जावें म्हणून. बरें, असो; गिराहिकांची आपणाला पर्वा नसेल असें वाटत नाहीं. तेव्हां माझ्या प्रमाणेंच आपण इतरांशीं तरी मौनव्रत धरणार नाहीं व आपलें नुकसान आणि गिराहिकांची गैरसोय करणार नाहीं, असें इच्छून हें शेवटचें पत्र पुरें करतों. हे विनंति. "

या पत्रांत मिळालेल्या धमकीवरून मीं मनांत समजावें खरें, तरी माझें मन या वेळीं एका महत्वाच्या कामांत गुंतलें-असल्यामुळें मला कांहीं विशेष वाटलें नाहीं. या वेळीं सरकाराच्या मनांतून, महाराष्ट्रांतील जुन्या डोंगरी व भुइकोट किल्यांची पाहणी करून, त्यांची ऐतिहासिक माहिती मिळवून प्रसिद्ध करावी असें आलें होतें. सर-

कारानें हें काम पांच गृहस्थांच्या कमेटीकडे सोंपविलें होतें. आणि त्यांपैकीं एकजण माझ्या ओळखीचे असून माझे हितचिंतकच होते. त्यांच्या मार्फत, या कामीं कमेटीस मदत करण्याचें मीं बोलणें लाविलें, आणि ही माहिती कसकशी मिळवतां येईल, काय काय खटपट केली पाहिजे वगैरे गोष्टींचें विवेचन मी स्वतां हजर होऊन कमेटीस समजाविलें. माझ्या श्रमांबद्दल सरकारांतून मला चांगलें बक्षीस मिळेल आणि ही माहिती छापून काढण्याचें कामही माझ्या छापखान्यास मिळेल, अशी मला मोठी आशा होती. कमेटीच्या सदस्यांकडे खेटे घालून, मीं खासगी रीतीनें त्यांच्या बेगवेगळया भेटी घेतल्या आणि त्यांची अनुकूलता संपादन केली. कित्येक हुशार व खटपटी मनुष्यांप्रमाणें मलाही असें वाटत असे कीं संपत्ति मिळणें ती कांहीं विलक्षण युक्तींनीं मिळत असते, रोजच्या रोज खपून भिक्षा मागण्यानें मिळत नसते. 'अजब युक्ति कढवावी आणि बळेंच लक्ष्मी मिळवावी ' ही म्हण मला खरी वाटत असे. पुष्कळ दिवसांपासून लक्ष्मी आणि कीर्ति या दोनही देवतांस प्रसन्न करून घेण्याचा सोपा, सरळ, आणि स्वल्प मार्ग मिळाल्यास मी पहात होतों, तो अखेरीस सांपडला असें वाटून मला आनंद झाला.

या कामांत मला बरेच श्रम पडले आणि कित्येक अधिकाऱ्यांस भेटावें लागलें ; यामुळें सहजच स्वतःच्या धंद्याकडे माझें दुर्लक्ष झालें. तेव्हां छापखान्याचा कारभार मीं एका हुशार दिसणाऱ्या कारकुनाकडे सोंपविला. खरें म्हटलें असतां, हे आमचे कारभारी कारखान्यातील नोक-

रांस दरडावण्यांत आणि कामाच्या निमित्तें गार्डीत बसवून च्योहोंकडे मिरवण्यांत मात्र हुशार होते. आमच्या सारखे धनी आणि असे त्यांचे कारभारी असल्यावर, कारखान्याची दशा कशी झाली असेल याचें अनुमान वाचकांस सहज करतां येईल.

धंद्याकडे दुर्लक्ष आणि भलत्याच कामाचा नाद ह्या दोनही गोष्टी बऱ्या नव्हत, याचा परिणाम कांहीं तरी भयंकर होणार अशी शंका माझ्या बायकोच्या मनांत उत्पन्न झाली. माझ्या बुद्धिसामर्थ्याविषयीं जरी तिच्या चित्ताला पूर्ण विश्वास होता, तरी तिनें एक दोन वेळां मला खोंचून विचारलें कीं सरकाराच्या कमेटीला जी मदत आपण देऊं पहात आहां ती तिनें न घेतली आणि आपण ज्या लाभाची आशा धरीत आहां तो न झाला तर पुढें काय करावयाचें? आपल्या घरच्या धंद्याकडे दुर्लक्ष करून कसें चालेल? हे प्रश्न तिनें अशा विनयानें केले कीं मला त्यांतलें खोचदार धोरण तेव्हां बिलकुल लागलें नाहीं. मीं ह्मटलें–"तसें कधीं होणार नाहीं. आणि धंद्यांतल्या दगदगी पेक्षां यांत प्राप्ति आणि लौकिक अधिक होईल." तथापि व्यवस्था करण्याच्या पत्रांच्या राशीकडे लक्ष गेलें आणि हिशेबाची वही हातांत घेतली म्हणजे माझी छाती फाटून जाऊं लागली. पत्रांचीं उत्तरें न मिळाल्यानें आणि हिशोबाचा उलगडा त्वरित न लागल्यानें, रोजच्या रोज अनेक जणांच्या अनेक तक्रारी आणि कुरकुरी मजकडे येऊं लागल्या. मग मीं सहजच आजचें काम उद्यांवर लोटणाऱ्यांचा मार्ग स्वीकारला. मला कोणी भेटावयास आले तर त्यांला

भेट न देण्याचा मीं प्रथम परिपाठ ठेवला. तशांत भेट झालीच तर कोणास कांहीं तरी सबबी सांगून उडवाउडवी करूं लागलों आणि सर्वांचीं मनें संतोषित ठेवण्याकरितां त्यांस हवीं तशीं वचनें देऊं लागलों. अशा परिपाठानें माझें मन हळुहळू इतकें घटावलें कीं हीं माझीं वचनें मला खरीं करतां येतील किंवा नाहीं याचीही चाड मला राहिली नाहीं !

पुस्तकें छापावीं आणि विकावीं अशीं दोन्ही कामें माझ्या वडीलांपासून आम्ही करीत असूं. त्यामुळें कित्येक ग्रंथकारांचे ग्रंथ आमच्याकडे छापण्यासाठीं येत असत. त्यांपैकीं जे बरेसे वाटत ते आम्ही हक्कासहित कर्त्यापासून विकत घेऊन आमच्या अंगावर छापीत असूं. आणि कित्येक त्यांच्या कर्त्यांच्या खर्चानें छापवीत असूं. बहुधा जे ग्रंथकार गरीब असत त्यांस साहाय्य करण्याच्या हेतूनें, कमी जास्ती द्रव्य देऊन, त्यांचे ग्रंथ विकत घेण्याचा मी परिपाठ ठेविला होता. त्यामुळें आरंभीं अशा ग्रंथकारांमध्यें माझी अवळपवळ स्तुति झाली. परंतु पुढें त्यांचे ग्रंथ छापून काढण्याचें काम वेळच्यावेळीं न निघाल्याकारणानें ही फाजील स्तुति माझ्या निंदेला मात्र कारण झाली. कांहीं वेळ माझ्या वचनभंगाबद्दल कोणीं मला शद्ब लाविला नाहीं. तथापि हळूहळू माझ्या या दयार्द्र परंतु अव्यवस्थित स्वभावाबद्दल मला ते दोष देऊं लागले. तेव्हां त्यांचा संतोष राखावा म्हणून मी प्रत्येकास त्याच्या खात्यावर अगाऊ पैसे देऊं लागलों. त्यांत जे विशेष करारी होते त्यांनीं मजपासून फाजील पैसे उपटले आणि जे गरीब स्वभावाचे होते त्यांस कुचंबत रहावें लागलें.

तथापि असे गरीव मनुष्य फार थोडे, बहुतेकांस जेवढे पैसे पोंचावे त्यापेक्षां ज्यास्त पोंचले असतांही ते माझा राग करूं लागले आणि कोणी तर मला फटकन टाकूनसुद्धां बोलूं लागले. आतां जे ग्रंथकार श्रीमंत होते आणि विद्येच्या व्यसनानेंच जे लिहीत असत त्यांच्या पासून मला वास्तविक चांगली किफायत होत होती. परंतु त्यांचीं कामें वेळच्या वेळीं व व्यवस्थित न निघाल्याकारणानें तेही मजवर रागावून मला सोडून गेले; सोडून गेले एवढेंच नाहीं तर त्यांचाही बोल मजवर राहिला. मिळून दोहींकडून माझ्या वाट्याला अपेश!

प्रत्येक ग्रंथकारास आपला ग्रंथ लौकर छापून प्रसिद्ध व्हावा म्हणून किती उत्कंठा असते ती सांगतां सोय नाहीं. प्रत्येकास बहुधा असें वाटत असतें कीं आपला ग्रंथ केवळ अमोलिक आहे, त्यावर हिंदुस्थानाचें किंबहुना सर्व जगाचें कल्याण अवलंबून आहे, आणि तो छापून न निघाल्यास त्या मानानें जगाचें मोठें नुकसान होणार आहे. त्या बिचाऱ्यांची अशी खरोखरच समजूत असल्यामुळें त्यांनीं आपले ग्रंथ लवकर छापून निघावे असें इच्छिल्यास नवल कसलें? परंतु त्यांच्या या समजुतीप्रमाणेंच माझी ही एक समजूत होऊन बसली होती कीं वर सांगितलेल्या सरकारी कमिटीला मदत करण्याची जी योजना मीं सुचविली होती तीच मोठी महत्वाची आहे; तिच्या पुढें या भारंभर पुस्तकांची काय किंमत? तथापि दुःखानें कळवावें लागत आहे कीं कमेटीनें मीं सुचविलेल्या मदतीच्या योजनेची किंमत केली! कारण माझा प्रतिपक्षी खंडोबा याचीच मदत घेण्याचें कमीटीनें ठरविलें. खरें म्हटलें

तर हा मोठा अन्याय झाला. कमिटीला मदत देण्याच्या योजनेची मूळ कल्पना माझीच; मला तिच्यासाठीं किती श्रम पडले होते ते माझे मला माहीत. बहुतेक सभासदांस माझी योजना एवढी मान्य झाली असतांही कमिटीनें तिचा स्वीकार कां केला नाहीं, आणि माझ्या प्रतिपक्षास मीं सुचविलेली योजना सिद्धीस नेण्याचें काम कां सोपविलें याचें मला मोठें आश्चर्य वाटलें. सरकारास या माहितीची फार निकड असल्यामुळें आणि माझ्या हातून ही मदत वेळच्या वेळीं मिळून व्यवस्थेनें काम सिद्धीस जाण्याचा रंग न दिसल्यामुळें कमेटीला दुसऱ्याच एका चलाख मनुष्याची मदत घ्यावी लागली असें चौकशी अंतीं मला समजलें. यास कारण इतकेंच झालें कीं मला आपली योजना स्पष्ट करून सांगण्याकरितां कमेटीनें ज्या दिवशीं बोलाविलें त्या दिवशीं मला कांहीं कामामुळें बनलें नाहीं म्हणून कमेटीच्या प्रमुखांची मर्जी गेली आणि त्यांनीं माझी योजना टाकून दिली. तथापि हें कारण कांहीं खरें नव्हतें. माझी तर अशी समजूत झाली कीं हें काम माझ्या शत्रूंचें असावें व त्यांनींच मजविषयीं प्रमुखांचे कान भरले असावे; दुसरें कांहीं नाहीं. आतां याचें कारण कांहीं असो, तरी माझा हेतु सिद्धीस गेला नाहीं व मुकाट्यानें हात चोळीत बसण्याची मला पाळी आली एवढें बरीक खरें.

वरील गोष्टीचें मला फार वाईट वाटलें. माझी सर्व आशा लयास गेली. आणि खिन्नवदन होऊन शोक करीत मी एकांतांत जाऊन बसलों. परंतु एकांतवास तरी मला कोण सुखानें भोगूं देतो? माझ्या कारभाऱ्याचा

निरोप आला. कोणी कीं मनुष्य भेटावयास आला आहे म्हणून. 'भेटण्याला मला वेळ नाहीं' म्हणून मी कळविलें असतांही फिरून निरोप आला कीं "या मनुष्यानें आपला कांहीं ग्रंथ पाहून छापण्यासाठीं आपल्यापाशीं दिला असून त्यास फार दिवस झाले. प्रस्तुत तो आपला ग्रंथ परत मागत आहे. त्यानें ओरडा करून छापखाना दणाणून टाकला आहे. तो म्हणतो—हस्तलेख घेतल्यावांचून मी येथून हालणार नाहीं. यास्तव समक्ष येऊन काय तो निकाल लावावा."

हा गृहस्थ कोण? हें नांवावाचून मला कळेना. कारण पुष्कळांचे ग्रंथ पाहण्यासाठीं मजकडे येऊन पडलेले होते. शेवटीं प्रत्यक्ष भेटल्यावर समजलें कीं 'भारतामृतसंजीवन' ग्रंथाचे कर्ते ते हे. हें पुस्तक प्रथमच माझ्या हातीं आलें तेव्हां त्याचा कांहीं भाग मीं सहज वाचला होता. त्यावरून भाषा, विचार, आणि रचना ह्या तिहींच्या दृष्टीनें हें पुस्तक केवळ निरुपयोगी आहे असें माझें मत झालें होतें. तथापि त्याचा कर्ता स्वभावानें अंमळ तापट होता आणि त्याला आपल्या ग्रंथाच्या उत्कृष्टत्वाची फाजील घमेंड होती. आंगीं मोठी विद्वत्ता होती असें नाहीं तरी विद्वानांचे दोष काढण्याची त्याला फार हौस होती. त्याची स्थिति गरिबीची होती तरी श्रीमंत लोकांत वागण्याची त्याला भारी आवड होती. अशा मनुष्याला आपल्या भिकार लेखाची अधिक योग्यता वाटावी यांत कांहीं नवल नाहीं. मीं त्याचें हें पुस्तक तावडतोब त्याच्या आंगावर फेंकून दिलें असतें, परंतु करतां

कसें ! तें मी कोठें ठेविलें हें कांहीं आठवेना, त्यामुळें परत करण्याची तर सोय राहिली नाहीं.

मला पाहतांच, क्रोधाचा आवेश आणून, तो हवें तसें अद्वातद्वा बोलूं लागला. मीं म्हटलें—"थांबा, महाराज, अंमळ शांत व्हा. तुमचें पुस्तक माझ्या पसंतीस आलें असून, येत्या मे महिन्याच्या आंत छापून काढतों, मग तर झालें ?"

हे शब्द ऐकून तो कांहींसा नरमला. तरी तसाच आवेश कायम ठेवून म्हणाला—"तुमचे असे किती मे महिने जातील ! मागील खेपेस तुम्हीं मुक्रर सांगितलें कीं जानेवारीला पुस्तक तयार होईल म्हणून. तें कांहीं नाहीं. आमचें पुस्तक आम्हास परत द्या. तुम्हाला अगत्य दिसत नाहीं. "

मी म्हटलें–"अगत्य नाहीं कसें ? अगत्य नसतें तर तुमचें पुस्तक केव्हांच परत केलें असतें. माझ्या पाठीशीं किती काम असतें हें तुम्हास ठाउकच आहे. त्यामुळें तुमच्या पुस्तकाकडे लक्ष देण्यास सवड झाली नाहीं."

तो म्हणाला–"नसेल झाली. पण त्याचें मला काय ? माझा लेख मला परत मिळाला पाहिजे."

सदर्हू लेख सापडण्यासारखा नव्हता हें मला माहीत होतें. तो हातीं आला तसाच कोटाच्या खिशांत घातला, एवढें मला चांगलें आठवत होतें. परंतु त्याचें पुढें काय झालें तें कांहीं एक आठवेना. दोन चार वेळां तो कोट घालून मी पुस्तकालयांत गेलों होतो तेव्हां तिकडेच कोठें तो लेख पडला किंवा घरीं आल्यावर कुठें

सुरक्षित पुडक्यांत बांधून ठेवला, हें कांहीं कळेना. मग, " तुमचा लेख मी उद्यां खचित काढून ठेवतों. एवढें कशाला? उद्यां तो तुम्हाला घरपोचता होईल असेंच करितों, म्हणजे तर हरकत नाहीं?' असें सांगून त्याची समजूत घालण्याची मी पुष्कळ खटपट केली. पण तो आपलें एकच बोलणें धरून बसला कीं, 'माझा लेख मला आतां पाहिजे. माझ्या देखत तो तुम्ही शोधून पहा.' निरुपाय जाणून मी शोधण्याचा आव घातला, आणि जे रुमाल, जीं पुडकीं, आणि ज्या फायली आज कैक वर्षे कपाटांत, फळ्यांवर, कोनाड्यांत, कोनाकोपऱ्यांत वगैरे ठिकठिकाणीं धुळींत लोळत पडल्या होत्या, त्या सर्वांस धडाधड जमिनीवर पाडलें! त्यांत, ज्यांच्याविषयीं मला लेशमात्र स्मृतिही नव्हती असे बरेच कागदपत्र मला सांपडले. परंतु बिचारें 'भारतामृतसंजीवन' कांहीं कुठें मिळालें नाहीं. तेव्हां त्याच्या कर्त्यास मोठा राग आला आणि शिरा ताणून तो म्हणाला—"काय चिंता आहे? तुम्ही ग्रंथकारांचा परामर्श असा घेतां काय? याच लेखाबद्दल दुसरा एकजण मला ५०० रुपये देत होता. परंतु मला त्याची किंमत निदान दुप्पट तरी आली पाहिजे. कशी येत नाहीं पाहतों? कोर्टांत फिर्याद लावून छणछणावून रुपये घेईन; कधीं सोडणार नाहीं. मला ठाऊक आहे, माझे कित्येक शत्रु आहेत. ते माझ्या लेखाचा हेवा करितात. ते माझ्या वाइटावर आहेत. तुम्हास वश करून घेऊन ते माझें नुकसान करूं पाहतात काय? बरें आहे." असें म्हणून दाणदाण पाय आपटीत तो निघून गेला!

' भारतामृतसंजीवना 'च्या कर्त्यानें मजवर एक हजारांची फिर्याद लावली. परंतु न्यायधीशानें सारासार विचार पाहून फक्त सहाशें रुपये नुकसानी भरून देवविली. खटला पाहण्याकरितां माझ्या ओळखीचे आणि कर्त्याच्या ओळखीचे अशा शेकडों लोकांची कोर्टांत खूप गर्दी जमली. न्यायाधीशानें निकाल सांगितला तेव्हां सर्वांस फार वाईट वाटलें. सर्वांनीं मजविषयीं कळवळा दाखवून म्हटलें—" कायहो ! हस्तलेख जेव्हांचा तेव्हांच सुरक्षित न ठेवल्याच्या अपराधास्तव सहाशें रुपायांची नुकसानी भरून देणें भाग पडावें काय? फार वाईट!" परंतु या शुष्क कळवळयाचा उपयोग काय? अब्रू आणि पैसा या दोहोंचेंही माझें नुकसान झालें तें झालेंच !

**या**प्रमाणें माझें जें नुकसान झालें आणि तेणेंकरून जें दुःख मला सोसावें लागलें, तें भरून येण्याला आतां कांहीं मार्ग नव्हता. यास्तव त्याच्या विषयीं शोक करीत बसण्यांत अर्थ काय? असें म्हणून मीं आपल्या मनाचें समाधान केलें. परंतु दुसरीच एक गोष्ट माझ्या मनाला विशेषेंकरून खाऊं लागली. ती विशेष नाजूक तशीच विशेष दुःखदायक होती. मी खिन्नवदन होऊन बसलों असतां मला संतोषित करण्याकरितां व सुख देण्याकरितां माझ्या स्त्रीनें इतकी तत्परता दाखविली कीं ती पाहून माझ्या मनाचें पाणी पाणी झालें. आलें यापेक्षांही आणखी थोर दुःख येऊन पडलें असतें तरी मी काडीमात्र डगमगलों नसतों. परंतु हिची मायाळूपणाची आणि शांतपणाची वागणुक पाहून माझ्या मनाला जो उद्वेग प्राप्त झाला

तो सांगतां येत नाहीं. माझी संकटावस्था पाहून हिला खरोखर वाईट वाटत असावें, परंतु ही विवेकानें दाखवीत नाहीं अशी माझ्या मनाची खात्री झाली. काय सांगू? हिला सुखी करण्याकरितां मला कांहीं करतां येण्यासारखें असतें, तर मी तें एकदम केलें असतें. हिचें माझ्यावर फार प्रेम होतें तें मला माहीत होतें; तसेंच माझेंही हिच्यावर कमी नव्हतें. ही माझ्याशीं मायाळूपणानेंच वागत होती. आमचें उभयतांचेंही मन परस्परांविषयीं शुद्ध आणि एकनिष्ठ होतें. परंतु काय करूं?–'आजची गोष्ट उद्यांवर' लोटण्याच्या या मला जडलेल्या द्वाड खोडीपुढें, हें एवढें प्रेम, हा एवढा मायाळूपणा, आणि हें शुद्ध व एकनिष्ठ वर्तन, हे अमूल्य गुण मला निर्माल्यवत् झाले! इतकें झालें तरी अझूनही माझे डोळे उघडले नाहींत. आणि किरकोळ कामांत वेळ काढून, आपलें देणें घेणें किती? कारखान्याची स्थिति काय आहे? नुकसानीचे पैसे कुठून भरावयाचे? इत्यादि अत्यंत महत्वाच्या गोष्टींचा विचार न करतां मी स्वस्थ बसलों. शहरामध्यें माझी पत नाहींशी झाली हेंही माझ्या लक्षांत आलें नाहीं. शेवटीं नुकसानीची रक्कम कोर्टांत भरण्याचा अवधि टळून गेला आणि माझ्या शत्रूंनीं माझा पुरा नाश करण्याचा घाट घालून माझ्या घरावर जप्ती आणली.

माझी सुस्ती आणि मजवरील नामोशीचा प्रसंग पाहून ज्यांची माझ्याशीं देवघेव होती ते लोक सहजच जागे झाले आणि आपापले हिशोब मुक्रर करून घेऊन पैसे मागूं लागले. सर्वांनींच एकदम तगादे लाविल्यावर माझा निभाव कसा लागावा? तशांत 'भारतामृत-

संजीवना ' चा कर्ता मला एक शनिच भेटला असें म्हणायास चिंता नाहीं. त्यानें लोकांमध्यें माझा बभ्रा मांडून त्यांस अधिकच चेतविलें. एवढें करूनच तो स्वस्थ बसला नाहीं. माझ्या कर्जदारांस त्यानें भर दिली आणि मला दिवाणी तुरुंगांत लोटण्यास त्यांला प्रवृत्त केलें. झालें, माझा छापखान्याचा कारभार आटोपला आणि मी जो एक वेळ नांवजलेला विद्वान होतों आणि अब्रूदार कारखानदार होतों, तोच मी आज एक निर्धन दिवाळखोर होऊन बसलों !

येथून पुढें माझ्या हकीगतीच्या अतिशय हृदयद्रावक भागास प्रारंभ झाला. लहानपणींच जी द्वाड खोड बीजरूपानें माझ्या हृदयांत प्रेरली गेली तिचे अंकुर मात्र आतांपर्यंत दिसत होते. परंतु ते हळूहळू पोसले जाऊन, त्यांची कडू फळें आतां पक्क दशेस येऊं लागलीं. बाबांची पत व सुव्यवस्था दृढ असल्यामुळें तिच्या छायेखालीं मी आतां पर्यंत कसेबसे दिवस कंठले, माझी विशेष उघडीक झाली नाहीं; यापुढें मात्र आपत्तीचीं आभाळांवर आभाळें येऊं लागलीं त्याविषयीं हकिगत पुढील प्रकरणांत सांगतों.

# प्रकरण ६ वें.

## दैवावर हवाला.

नीच व्यसनीं पडतां
निंदिति दैवास, न स्वकर्मास ।

मोरोपंत-कृत कर्णपर्व.

आजपर्यंत मजवर जीं संकटें आलीं तीं लहान लहान होतीं. त्यांच्या मानानें प्रस्तुतचा प्रसंग अतिशय नामोशीचा, नाशकारक आणि भयंकर होता ह्यांत संशय नाहीं. खरें पाहिलें असतां हा सर्व प्रताप माझ्याच चुकांचा आणि विशेषें करून ' आजची गोष्ट उद्यांवर ढकलण्या 'च्या मला जडलेल्या द्वाड खोडीचाच होता, हें एखादें लहान पोरही सांगेल. तथापि या सगळयाचा बोल आपल्या दैवास लावून मी स्वस्थ बसलों.

विपत्ति आली असतां आळशी व बेताल मनुष्यांस दैव ही एक उपयोगी वस्तु आहे. गाईला शिंगें आणि सशाला चपळ पाय, याप्रमाणें अतिदुर्बल प्राण्यासही परमेश्वरानें आपल्या रक्षणाचा एकेक उपाय नेमून दिला आहे, त्याचप्रमाणें आळशी व बेताल मनुष्यासाठीं त्यानें दैव निर्माण केलें असावें, असें म्हणावयास चिंता नाहीं. तसें नसतें तर त्यांस आपलें दुःखमय आयुष्य भारवत् वाटलें असतें. आपल्या

आपत्तींचें खरें कारण जेव्हां मनुष्यांस कळत नाहीं किंवा कळलें असतां मनास दुःख वाटण्याचा संभव असतो, तेव्हां देवाची सबब त्यांस पुढें करण्यास किती उपयोगी पडते याचें प्रत्यंतर मला या वेळीं स्पष्टपणें आलें. मी म्हणूं लागलों—“ माझें दैव फिरलें म्हणूच माझी अशी स्थिति झाली. हयगईनें माझ्या हातून आजपर्यंत बऱ्याच चुका झाल्या व त्यांचेच वाईट परिणाम मला भोगावे लागले हें जर खरें मानलें तर अशा चुका होत असतांही माझ्या हिताच्या कित्येक गोष्टी घडून आल्या त्या कशा घडून आल्या असल्या ? माझी कुशाग्र बुद्धि, माझें शिक्षण, महाराजांची भेट, चीन देशाची सफर इत्यादि अनेक योग जे जुळून आले ते कां आले ? अर्थात माझ्या हातून चुका होत असतांही दैव अनुकूल असल्यामुळें त्यांचें बळ फारसें चाललें नाहीं. यास्तव प्रस्तुत आपल्यास जी स्थिति प्राप्त झाली आहे ती केवळ दैवाचाच खेळ होय, यांत संशय नाहीं ! ”

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें तुरुंगामध्यें मला सुमार सहा महिने काढावे लागले. कारण ‘ भारतसंजीवना ’ च्या कर्त्यानें भर दिल्यावरून माझ्या बऱ्याच धनकोंनीं आपसांत वर्गणी करून मला कित्येक वर्षें तुरुंगांत अडकविण्याचा बेत केला होता. अशा समयीं वर सांगितलेल्या दैववादानें मी माझ्या मनाचें समाधान करून घेण्याचा यत्न केला. तथापि या समाधानापेक्षांही माझ्या प्रियेच्या भल्या वागणुकीनें आणि माझ्या अज्ञान, गोजिरवाण्या मुलाच्या अल्लड सहवासानें माझ्या मनाला जें समाधान

वाटलें तें श्रेष्ठ होतें-केवळ लोकोत्तर होतें-त्याचें वर्णन करतां येणें कठीण होतें.

माझ्या या अप्रतिष्ठेचा लौकरच सर्वत्र बोभाटा झाला. माझा हयगईचा स्वभाव सर्वांसही पुरा माहित असल्यामुळें, आज नाहीं उद्यां, एखाद भयंकर प्रसंग मजवर ओढवणार असें भाकीत माझ्या आप्तमित्रांनीं व सोयऱ्याधायऱ्यांनीं अगोदरच करून ठेवलें होतें; म्हणून त्यांपैकीं कोणासही हा बोभाटा कानीं पडल्यानें वाईट वाटलें नाहीं किंवा यत्किंचितही माझी कींव आली नाहीं. मजवर प्रसंग आला हा केवळ एकट्या मजवर आला. परंतु माझ्यामुळें माझ्या स्त्रीवर प्रसंग आला तो तीन प्रकारें आला. कारण, माझी काळजी, स्वतःची काळजी, आणि मुलाची काळजी, अशा तीन काळज्या तिला उत्पन्न होऊन, एक भय तीन ठिकाणीं झालें. धनको मंडळीचें घराला कुलूप, पदरीं पैसा नाहीं, आणि कोणाकडे जाऊं म्हटलें तर लाज ! प्रत्यक्ष ज्या मावशीचा व तिच्या नवऱ्याचा आम्हांस मोठा आधार व भरंवसा होता, त्यांनींही या वेळीं तिला मदत करण्याचें साफ नाकारिलें. मी तुरुंगांत गेल्यावर तिला रहावयास सुरक्षित जागाही नाहींशी झाली. काय तिचे हाल आणि कोण तिची अपेक्षा ! प्रत्यक्ष मावशीकडूनच तिला निरोप आला कीं, "जर तुला तुझ्या अब्रूची आणि तुझ्या मुलाच्या रक्षणाची पर्वा असली तर तूं त्याला म्ह० मला सोडून ताबडतोब निघून आमच्याकडे ये. फिरून त्या अधमाचें नांवही घेऊं नको. हे तुला कबूल असलें तर तुला घरांत घेऊं. त्या नीचाच्या संगतींत तुझें कधीं कल्याण होणार नाहीं."

परंतु धन्य तिची ! मावशीच्या ह्या दोनही अटी तिरस्कारानें तिनें अमान्य केल्या. मग तुरुंगानजीक चाळींत एक ल्हानशी खोली तिनें भाड्यानें घेतली आणि जवळ जें कांहीं खिडुकमिडुक होतें तें मोडून आपला गुजारा करण्याचा निश्चय केला. अहाहा ! काय सांगावें ! संकटाची प्रखरता जसजशी वाढत गेली, तसतशी तिची वागणूक अधिकाधिक मनमिळावू आणि ममतेची होत गेली. स्त्री जातीच्या आंगचे नम्रता, कोमलता, धैर्य इत्यादि गुण तिच्याठायीं प्रगट झाले. तिनें माझ्या अंतःकरणाला समाधान वाटेल असे, झाले तेवढे उपाय केले. माझी धनको मंडळी फारच खवळली होती, त्यामुळें मला किती दिवस तुरुंगांत पडून रहावें लागेल—एक वर्ष कीं दहा वर्षं—याची अटकळ करतां येणें कठीण होतें आणि तेणें करून आमच्या सर्वांच्या मनावर निराशेचें दाट काहूर जमलें होतें. तरी, या सर्व विपत्तींचें मूळ मी, अशी आठवण जेणें करून होईल अशी एकही गोष्ट तिनें केली नाहीं किंवा याविषयीं एकही अक्षर ती बोलली नाहीं. उलट, हा सर्व देवाचा खेळ आहे, आणि जे तुमचे वैरी आजवर तुमच्याशीं गोड बोलत होते व जे तुमचे मित्र म्हणवीत होते, त्यांच्याच दुष्ट बुद्धीचें हें फळ आपल्यास भोगावें लागत आहे, अशी माझ्या मनाची समजूत करून माझी खिन्नता तिनें दूर केली. अहाहा ! केवढें धैर्य ! केवढी पतिभक्ति ! केवढी सुशीलता ! तिचे एकक गुण आठवले असतां अझूनही माझा उर भरून येतो आणि आश्चर्यमिश्र खेदानें डोळ्यांतून टिपें गळतात !

मजवरील संकटांत माझें अंतःकरण समाधानयुक्त होण्याला जसा माझ्या स्त्रीचा सुशील स्वभाव कारण झाला तसा माझ्या पुत्राचा लडिवाळपणाही कारण झाला. आम्हा दोघांचा सर्व जीव त्यावरच होता. त्याच्याकडे पाहून माझ्या व हिच्या डोळयांस दुःखांतही सुखाचे किरण आनंदवीत होते. काय त्याच्या बाळचेष्टा ! आमच्या वरील संकटाची त्यास पुरी कल्पनाही नव्हती. तरी आपल्या आईबापांवर संकट आलें आहे व तें त्यांच्या वैऱ्यांनीं आणलें आहे हें त्याच्या लक्षांत येण्यापुरतें त्याला या वेळीं ज्ञान आलें होतें. यामुळें स्वाभाविक जिज्ञासेनें तो असे एकेक प्रश्न करी कीं, ते ऐकून मला तर कौतुक वाटेच; परंतु, त्याच्या प्रश्नांचीं उत्तरें मिळाल्यावर जेव्हां तो म्हणे--"बाबा, असें आहे काय? मी मोठा झालों म्हणजे पहा त्यांचा कसा सूड घेतों तो ! " तेव्हां माझ्या प्रियेला प्रेमाचा उमाळा येऊन, त्याच्या भरांत तिनें, आपल्या कानशिलांवर टचाटच बोटें मोडून, किती वेळां त्याची दृष्ट काढली असेल, कोण जाणे ! हा सर्व देखावा दुःखजनक खरा, तरीआम्हा उभयतांस त्यापासून हें संकट सोसण्यास किती उमेद आली असेल याची इतरांस कल्पनाही होणें नाहीं.

असो, हें विषयांतर पुरें झालें. आतां मी आपलीच कर्मकथा पुढें सांगतों. कांहीं दुःख, कांहीं शोक, कांहीं संतोष, अशा त्रिविध स्थितींत मी आपले दिवस तुरुंगांत कंठीत असतां, एके दिवशीं तिसरे प्रहरीं माझी प्रिया, हसत हसत आणि घाईघाईनेंच, मजकडे आली. नित्य कांहीं तरी

दुःखाची नवीन बातमी कानीं यावयाची, असें असतां आज हा फेरफार कां झाला? याचें सहजच मला आश्चर्य वाटलें. आणि ऐकलें तों खरेंच ज्या मनुष्याकडून अशा संकटांत मदत होण्याची आशा कमी, तोच माझी बंध-मुक्तता करण्याला तयार व्हावा हें आश्चर्य नव्हे काय? परंतु असें घडलें खरें. माझ्या प्रियेनें मला अशी खबर सांगितली कीं शेठ **आदमजी** बोहरी यानें तुमच्या सर्व धनको मंडळीची तोड पाडून तुम्हाला मोकळे करण्याचें बोलणें केलें आहे. हा **आदमजी** शेट बोहरी कागद शाई इत्यादि लिहिण्याच्या व छापण्याच्या उपयोगी मालाचा व्यापारी होता. तो चार पैसे बाळगून असतांही स्वभावानें फार भला होता हें मला माहित होतें. यास्तव त्यास भेटावयास घेऊन ये असें सांगून तिला मीं परत लाविलें.

**आदमजी** शेट आल्यावर मीं त्याचे उपकार मानले आणि छापखान्याचें सर्व सामान विकून टाकून, देण्या-घेण्याची कसकशी व्यवस्था लावावयाची तें मुक्रर केलें. त्यानें जो बेत केला होता तो मलाही पंसत आला, त्या-मुळें विशेष भानगड पडली नाहीं. मग दुसरे दिवशीं, म्हटल्याप्रमाणें माझ्या धनको मंडळीची तोड पाडल्याचा सहीसुद कागद आणि कोर्टाचा हुकूम घेऊनच तो आला. हुकूम दाखवतांच तुरुंगाच्या अधिकाऱ्यानें मला सोडून दिलें. शेठ **आदमजी** इतकें करूनच थांबला नाहीं. त्यानें आमच्याकरितां तुरुंगाबाहेर एक गाडी आणून उभी केली होती—तींत आम्हांस घालून आमच्या जाती-च्या आपल्या एका मित्राच्या घरीं नेलें आणि आम्हांस

एक टुमदार मेजवानी दिली. सैंपाकाची सिद्धता तेथें त्यानें अगोदरच करून ठेवविली होती. केवढी त्याची तरतूद आणि केवढा त्याचा भलेपणा !

आम्ही जेवून उठत आहों इतक्यांत आदमजी शेठ एक फेरा देऊन गाडींतून परत आला. मीं पानसुपारि घेतली आणि आदमजी शेठजींकडे वळून, त्याचे उपकार फिरून मानले. तेव्हां तो म्हणाला–" मी केलें यांत कांहीं विशेष केलें नाहीं, स्नेहाला उचित तेंच केलें. तुमचें सरसामान याप्रमाणें ( एक यादी मजपुढें टाकून ) विकून टाकलें आणि त्यांतून तुमच्या धनको मंडळीची समजूत केली; बाकी एवढी रकम राहिली आहे; ती ही संभाळा. " असें म्हणून शंभरा शंभराच्या दहा नोटी त्यानें माझ्या हातावर ठेवल्या. कृतज्ञतेच्या उमाळ्यानें माझें हृदय भरून आलें. आणि या गृहस्थाच्या निरपेक्ष उपकाराचें कसें उतराई व्हावें, हें मला कळेना. त्याचे आभार मानावे तर तो विनयानें तसें करूं देईना. मग मी ईश्वराचेच आभार मानून, आणि माझें दैव थोर म्हणून मला तारणारा हा प्रगट झाला असें समजून स्वस्थ बसलों.

जाते वेळीं आदमजी शेठजीनें, ' उद्यां आमच्या घराकडे येऊन जाल काय ? आमचा कागदाचा कारखाना सहज पाहून तर जा ? ' असें म्हणून आमंत्रण दिलें होतें. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं मी त्याच्या कारखान्यांत गेलों. कारखाना बाहेरून दिसत होता त्यापेक्षां आंत बराच मोठा होता. सरासरी दोनशें अडीचशें जिनगर तर देशी वह्याकरितां लागणारे खर्ची कागद तयार कर-

ण्यांत गुंतले होते. याशिवाय विलायती मालही वखारींत पुष्कळ भरला होता. कांहीं कारकून, आलेला माल यादीप्रमाणें रुजू पाहण्यांत व कांहीं पाठविण्याकरितां गठ्ठे बांधविण्यांत गुंतले होते. पलीकडल्या आंगाला कांहीं गठ्ठे बांधून व नांवगांवाच्या चिठ्ठ्या मारून तयार झालेले पडले होते. त्यांपैकीं एकावर,

" रा. रा. दत्तो नारायण सरनाईक,

सर्व प्रकारच्या मालाचे व्यापारी.

नागपुर ( शहर ) "

असा पत्ता मीं वाचला. सरनाईकाचें नांव पाहतांच मला हिच्या आतेभावाची आठवण झाली, आणि आदमजी शेटजीपाशीं चौकशी करितां, असें समजलें कीं " दत्तोपंत हा नागपुरामधील एक मोठा अब्रूदार आणि बेतशीर व्यापारी आहे. सुमार दहा वर्षांवर केवळ उताराचे पैसे खिशांत घालून तो तिकडे गेला होता; तथापि दक्षतेनें, प्रामाणिकपणानें आणि ठाकीठिकीनें वागून, त्यानें एवढा पैसा व लौकिक मिळविला कीं तो आज साऱ्या नागपुरांत चार प्रतिष्ठित व्यापाऱ्यांत मोडत आहे. सांप्रत तिकडे घरदार वगैरे करून तो स्थाईक झाला आहे."

मी म्हटलें—" काय म्हणतां ? दहाच वर्षांत त्यानें एवढा पैसा मिळविला ? "

आदमजी शेटजीनें उत्तर दिलें—" होय, अगदीं दहाच वर्षांत, मला पुरें आठवतें; दहाच वर्षे झालीं, तो मजकडे

आला होता आणि मींच त्याच्या उताराची तजवीज क-रून दिली. फार नेकीचा मनुष्य; प्रथम त्यानें फक्त दोनशांचा माल मागविला, तेव्हांपासून वाढतां वाढतां वीस हजारांची त्याची उलाढाल सालीना माझ्या मार्फ-तीनें हल्लीं होत असते. हें केवळ त्याच्या टापटिपीचें फळ, दुसरें कांहीं नाहीं. "

'टापटिपीचें फळ' हे आदमजी शेटजीच्या तोंडचे शब्द माझ्या कौतुकोत्कंठ अंतःकरणावर फारच दृढ ठसले. मीं आपल्याशीं म्हटलें—" काय ? सरनाईकाप्रमाणें मलाही नागपुराकडे उद्योगधंदा करून चार पैसे नाहीं कमावितां येणार ? माझ्या मध्यें टापटीप जरा कमी आहे तरी चिंता नाहीं. ती निश्चयानें राखतां येईल. आपल्याला तरी आतां पोटाची सोय कोठें पाहिलीच पाहिजे. "

मी बिऱ्हाडी आलों, आणि घडलेली हकीगत प्रियेला सांगितली. ती म्हणाली—" मला आतां एथें राहणें बरें वाटत नाहीं; आपण सुद्धां नागपुराकडे गेलों तर ? " मीं म्हटलें—" माझ्या मनांतही असेंच येतें. परंतु माझें एक म्हणणें आहे. तें एवढेंच कीं तुला आतांच कांहीं बरोबर नेऊं नये. मी एकाटाच जाईन असें म्हणतों आणि उद्योगधंद्याची सोय करून कांहीं स्थिरपणा झाला म्हणजे तुम्हा दोघांना घेऊन जाईन; तोंपर्यंत वर्ष साहा महिने, मन घट्ट करून, येथेंच कोणा सोयऱ्याधायऱ्याकडे तुला ठेवावें असा माझा मानस आहे. परकी देशांत, परकी ठिकाणीं, परिवारानिशीं जाणें योग्य नाहीं. "

हा माझा विचार ऐकून माझ्या प्रियेनें अगदीं गोरें मोरें तोंड केलें, आणि आवेशानें ती म्हणाली-" होय तर ? इथें सोडून मी मागें राहूं ? तुरुंगांतही आपणास विसंबलें नाहीं, ती आतां आपणास परदेशीं लावून देऊन मी एथें एकटी राहूं ? ज्या वेळीं सोयऱ्याधायऱ्यांच्या आश्रयाची वास्तविक गरज होती त्या वेळीं आपणापासून दूर राहण्याच्या धास्तीनें जिनें त्यांच्या आश्रयाची पर्वा केली नाहीं तीच मी आतां त्यांच्याकडे जाऊन ओशाळगतीनें राहूं ? छीः छीः ! यापेक्षां मरण बरें ! मी तर येथें कधीं राहणार नाहीं; बरोबर येणार. मग जें व्हावयाचें असेल तें खुशाल होवो ! "

तिचा असा दृढ निश्चय आणि एकनिष्ठपणा पाहून मी अचंब्यांत पडलों. न्यावी तर पंचाईत; न न्यावी तर दृढनिश्चयी आणि एकनिष्ठ अबलेला झिडकारावें तरी कसें ? अशा प्रकारें विवंचनेंत माझें मन दुभागलें असतां मी तिच्याकडे स्थिर दृष्टीनें पहात राहिलों. माझें मन बुचकळ्यांत पडलेंसें जाणून, ती पुढें म्हणाली-" मी बरोबर आल्यानें तोटा तर नाहींच पण उपयोगच होईल-मला वाटतें. दत्तू अण्णाला अगाऊ पत्र पाठवून उत्तर आणवावें. कदाचित एखादा सोईचा उद्योग त्याच्या मार्फतीनेंही मिळूं शकेल. मीं आलें तर त्याला विशेष अगत्य वाटेल. एथील आटपाआटप करण्याला आपल्यास आठ दिवस सहज पाहिजेत. तेवढ्या अवधींत त्याच्याकडून जबाब येण्याला नड नाहीं."

ही युक्ति मला अगदीं पसंत आली. मीं आपल्याशीं विचार केला-" आम्हीं तर आपले दुर्दैवाचे पुतळे बनलोंच आहों. हिची पुण्याई थोर, म्हणूनच एवढ्या लवकर तुरुंगांतून माझी सुटका झाली. त्याचप्रमाणें हिच्याच पुण्याईनें पुढेंही दैव मला अनुकूळ होणार नाहीं कशावरून ? त्यापक्षीं हिचें मन मोडूं नये हें बरें. " असें जाणून तिला म्हटलें-" तुझी मर्जी; चल बापडी. "

लगेच तिच्या अनुमतानें मीं दत्तोपंताला पत्र भरलें. त्याचा जबाब उलट टपालीं चवथ्याच दिवशीं आला. त्यांत लिहिलें होतें-" आपली हकीगत कळली. उद्योगनिमित्तानें इकडे येण्याचा आपला मानस आहे. ठीक आहे. आमचें वर आपलेंच आहे. होण्यासारखें साहाय्य करण्यास अनुमान होणार नाहीं. भेटीअंतीं विशेष मजकूर कळेल. तरी एवढें सांगणें जरूर आहे कीं, इतर ठिकाणच्याप्रमाणें इकडेही धंद्यांत यश येण्याला फार मेहनत करावी लागते, फार जपावें लागतें व फार टापटिपीनें रहावें लागतें. याशिवाय तुमच्या तिकडल्यासारख्या इकडे उद्योगाच्या सोई नाहींत; लोकही अज्ञान आहेत. या अडचणी मोठ्या आहेत. या सर्वांचा विचार मनांत आणून इकडे येण्याचें करावें. पुष्कळांस प्रथम मोठी आशा वाटते कीं इकडे सर्व चैन आहे, सुलभतेनें पावड्यावारी पैसे ओढावे; पण सदहू गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यामुळें त्यांची इकडे येऊन फसगत झाली आहे आणि त्यांच्यावर निराशेचा प्रसंग आला आहे. इकडे चैनीनें व बेफामपणानें वागून निभण्यासारखें नाहीं. हें आपणास कळवळयास्तव लिहिलें

आहे. राग मानूं नये. हेंच पत्रीं चिरंजीवासहित सौ० सगुणा ताईस आशीर्वाद प्रविष्ट करून फार फार पुसलें आहे म्हणून सांगावें. कळावें हे विनंति."

आमचा नागपुरास जाण्याचा निश्चय ठरला, आणि ज्या सोयऱ्याधायऱ्यांनीं आणि इष्टमित्रांनीं आम्हांस संकटसमयीं सोडलें त्यांस सोडून आम्ही निघालों. ही गोष्ट मीं आदमजी शेठजीला अगोदर कळविली नाहीं. जाते वेळीं त्याच्या नांवानें एक पत्र मात्र लिहून ठेवलें. कारण त्याचा विचार, आम्हीं तेथेंच रहावें, असा होता, माझ्यासाठीं तो कांहीं कामकाजही मिळवून देणार होता, आमच्या जाण्याला तो खचित मोडती घालता. परंतु आमच्या मनानें या ठिकाणचा अगदीं वीट घेतला. म्हणून आम्हीं गाडींत जाऊन बसलों आणि या पुण्य नगरीला शेवटचा नमस्कार केला !

आमच्या प्रवासांत एक मोठी आठवण राहण्यासारखी गोष्ट घडून आली, तिचा उल्लेख येथें अवश्य केला पाहिजे. आम्हीं ज्या डब्यांत बसलों त्यांतच एक पाटील बुवा येऊन बसला. त्याच्याबरोबर त्याची बायको व दोन नेणतीं मुलें होतीं. हें कुटुंब फार गरीब दिसत होतें. तरी त्या सर्वांचा स्वभाव नम्र आणि ममताळू होता. स्वतां पाटील बुवांची मुद्रा कांहींशी भाविक आणि आनंदित होती. गाडी चालू झाल्यावर मीं चौकशी केली तीवरून समजलें कीं पाटील बुवांस नागपुराच्याही पलीकडे दोन स्टेशनें जावयाचें होतें. तो म्हणाला—"मी —गांवचा राहणारा. आमची पोटापुरती जमीन होती. परंतु

तिच्यावर बापाच्या वेळेपासून कर्ज होतें. तें वाढी दिढीनें फुगल्यामुळें फिटेना, म्हणून ती मग सावकाराच्या घरांत गेली. पुढें पोट भरण्याला साधन नाहींसें झालें. पाठिशीं दोन पोरें, वाढता संसार; मजुरी करावी, तिच्यांत पोट भरेना; म्हणून कुठें देशांतरीं जावें असा विचार करूं लागलों. इतक्यांत, आमच्या गांवचा एक गृहस्थ नागपुराकडे गेला होता व तिकडेस स्थाइक झाला होता, तो कांहीं कामाकरितां परत गांवीं आला असतां मला भेटला. त्याला मी आपली सर्व हकीगत सांगितली. ती ऐकून त्यानें नागपुराकडे जाण्याविषयीं मला भर दिली. तिकडे जमीन सुपीक आहे, पुष्कळ आहे, आणि कुळारग थोडी आहे; यामुळें सरकारांतून जमीन सवलतीनें मिळण्यास हरकत पडणार नाहीं, म्हणून सांगितलें. शिवाय करूं म्हटलें तरी तिकडे मोलमजुरीही बरी मिळते. याच गृहस्थानें मला तिकडे बोलाविलें आहे व त्याच्याच भरंवशावर आम्ही जात आहों. मेहनत करून व नेकीनें वागून मला सुखानें आपलें पोट भरतां येईल अशी माझी अटकळ आहे. मग यांत परमेश्वर काय यश देईल तें खरें."

पाटील बुवाची हकीगत ऐकून समान अवस्थेमुळें माझ्या हृदयास त्याची दया आली. आणि मीं म्हटलें—"आम्हींही नागपुराकडे उद्योगधंद्याच्या निमित्तानेंच जात आहों. त्यापक्षीं तुमची आमची सोबत बरी जमली आहे."

वाटेनें विशेष कांहीं घडलें नाहीं. प्रत्येक स्टेशनावर उतारूंची जी तारांबळ उडे आणि पदार्थ विकणारांची जी गडबड सुरू होई ती पाहण्याकरितां मुलें वारंवार जाग्यावरून

उठून डब्याबाहेर डोकाऊन पहात आणि 'हें घे' 'तें घे' असें करीत, तेव्हां प्रत्येक वेळीं त्यांस दाबावें लागे, याशिवाय आम्हांस बसल्या बसल्या दुसरें कसलेंही काम नव्हतें. इकडल्या तिकडल्या गप्पा सांगण्यांत आरंभीं उत्साहानें बराच वेळ गेला. त्यांचा कंटाळा येत आहे इतक्यांत आमच्या होशी पाटील बुवांनीं कांहीं चुटकेदार पोवाडे, कटाव, फटके वगैरे काढले. त्यावरून पाटील बुवांचा मार्मिकपणा बराच दिसून आला. पुष्कळ वेळ एकाच ठिकाणीं बसून राहिल्यानें जो मनाचा उत्साह मंदावला होता तो या योगें पुन्हा उत्तेजित झाला, आणि गाण्याला रंग चढून सर्वांस हुषारी आली. पाटील बुवांची दोन्ही लहान मुलें त्यांच्या तोडीचींच होतीं, तीं त्यांस गातांना साथ करीत होतीं. त्यांनीं मोठी वहार केली ! गरिबींतही आनंदानें दिवस काढणारें कुटुंब, पाटील बुवाच्या सारखें, माझ्या पाहण्यांत यापूर्वीं आलें नव्हतें आणि त्या नंतरही आलें नाहीं खचीत !

याप्रमाणें जो लांबचा प्रवास कंटाळवाणा व्हावयाचा, तो मोठ्या मौजेंत संपवून आम्ही नागपुराच्या स्टेशनावर आलों. आम्ही त्रिवर्ग डब्यांतून उतरलों. पाटील बुवास दोन स्टेशनें पुढें जावयाचें असल्यामुळें तो आंतच राहिला. परंतु आम्ही स्टेशनाबाहेर जाण्याच्या गडबडींत होतों, इतक्यांत एका डब्यामध्यें ओरड व हिसकाहिसक सुरू झाली तिकडे आमचें लक्ष गेलें. पाहतों तों आमच्या पाटील बुवांस, त्याच्या दोघा मुलांस आणि बायकोस, तिकिटें तपासणारा, गार्ड, दोन पोलीसचे

शिपाई वगैरे मंडळी डब्याबाहेर ओढीत आहे व त्यांचे बोजे अस्ताव्यस्त फेंकून देत आहे असें दृष्टीस पडलें. हातांतलें पाकीट तसेंच खालीं ठेवलें आणि हा काय वखेडा आहे म्हणून चौकशी करतों इतक्यांत वेळ झाल्यामुळें शीळ होऊन गाडी निघून गेली. मी चौकशी केली तीवरून समजलें कीं पाटील बुवांचीं तिकिटें वाटेंत कोठें हरवलीं तीं तपासणारास दाखवितां आलीं नाहींत, म्हणून त्यानें पाटील बुवास गाडींतून काढलें व पोलीसच्या स्वाधीन केलें. पाटील बुवानें सांगितलें—" मीं तिकिटें काढलीं, मी खंडोबाच्या पायाला स्मरून सांगतों. विचारा, ( मजकडे बोट दाखवून ) यांना देखील ठाऊक आहे. वाटोवाट मी तीं दाखवीत आलों. एक दोन स्टेशनामागें कोठें गडबड झाली, कोण जाणे. माझा गळ्यांतला बटवा कोणीं चोरला किंवा कोठें पडला हें कळत नाहीं. त्यांतच आमचीं तिकिटें व उरलेले दोन तीन रुपये होते. आतां मजजवळ विष खाण्याला एक शिवराईसुद्धां राहिली नाहीं. हीं फाटकीं तुटकीं चिरगुटें आणि हीं दोन सैंपाकाचीं भांडीं. मागतां ते उताराचे पैसे मी कुठून देऊं ? तशांत मी परकी परदेशांत; येथें कोणी ओळखीचें नाहीं, देळखीचें नाहीं. आम्हीं तिकिटें काढलीं. आम्ही शपथ वाहून सांगतों. आम्हावर दया करा आणि आम्हाला वाचवानों, सोडा एवढेंच मी मागतों."

त्यावर शिपाई आणि रेल्वेचे नोकर त्या गरीब बिचाऱ्या प्राण्यांस हवेतसे दरडावूं लागले आणि नाना प्रकाच्या भीति घालूं लागले. ते म्हणाले—" थांबा, रेल्वे कंपनीला

तुम्हीं फसवूं पाहतां काय ? आतां सरकार तुम्हांला चांगली शिक्षा करील," हे उद्गार ऐकून पाटील बुवा गांगरून गेला. त्याचीं मुलें आणि बायको हीं तर ओकसा बोकशा रडूं लागलीं. पाटील बुवाच्या सुस्वभावाविषयीं माझी खात्री झाली होती, आणि त्यानें तिकिटें काढलीं होतीं व तो निरपराध आहे हेंही मला माहीत होतें. अशा मनुष्यावर केवळ दैवानें पेंच आलेला पाहून मला त्याची फार दया आली. तत्काळ त्याच्या उताराचे पैसे मीं देऊन टाकले आणि त्या माणसांची सुटका केली. एवढेंच नाहीं तर परदेशांत पैशावांचून हा काय करील असें मनांत आणून आणखी पांच रुपये त्याला खर्चाला दिले. माझी उपकारबुद्धि पाहून त्याला मोठा गहिंवर आला. त्याच्या तोंडांतून शब्दही फुटेना, तेव्हां कृतज्ञतेनें तो माझे पाय धरूं लागला. परंतु हें बरें न दिसल्यामुळें मी तेथून चटकन पाय काढला आणि मनुष्यांसहित शहरांत निघून आलों.

आम्ही आलों ते दत्तोपंताच्याच घरीं गेलों. तोही आमची वाट पहातच होता. त्यानें आमचा यथास्थित आदरसत्कार केला. पुष्कळ दिवसांनीं अकल्पित भेट झाली म्हणून त्याला आनंद झालासें दिसलें. दत्तोपंताचा स्वभाव मनमिळाऊ आणि आनंदी होता. इतकेंही असून त्याची टापटीप आणि दक्षता कमी नव्हती. त्याच्या तोंडांतून कोणालाही टाकून शब्द कधीं निघाला नाहीं–निदान मीं तरी कधीं ऐकला नाहीं–एवढेंच केवळ नव्हे तर होईल तेवढें करून इतरांच्या उपयोगी पडून त्यांस

आश्वासन देण्याची त्याची चाल होती. यामुळें त्याच्या सहवासांत सर्वांस सुख आणि आनंदच होत असे.

रात्रीं जेवणखाण आटपल्यावर, मी कोणता उद्योगधंदा करावा याविषयीं गोष्ट निघाली. बोलतां बोलतां त्यानें आपली स्वतःची हकीगत सांगितली. ती ऐकून मी अगदीं चकित झालों. दत्तोपंताला कसकशी मेहनत करावी लागली, कसकशा अडचणी आल्या, अगदीं आणीबाणीच्या प्रसंगीं प्रामाणिकपणानें, हुषारीनें, आणि दक्षतेनें तो अनेक दिव्यांतून कसा उतरला, आणि मन आवरून गरीबीचे आणि संकटाचे दिवस त्यानें कसे काढले इत्यादि हकीगत ऐकून, मला त्याच्या वैभवाचा जो हेवा आरंभीं वाटत होता तो वाटेनासा झाला. मी मनांत म्हणालों–" एकून मलाही धनिक होण्याला एवढ्या अडचणी, एवढीं दुःखें, व एवढे कष्ट काढले पाहिजे तर? आणि एवढी दक्षता आणि एवढें धैर्य दाखविलें पाहिजे तर! मग तिकडल्यापेक्षां इकडे विशेष तो काय? कांहींच नाहीं.!" असें मनांत येऊन मी कांहींसा निराश झालों. परंतु समाधान मानण्याला मला एक जागा होती. ती हीच कीं इतरांपेक्षां आणि विशेषें करून दत्तोपंतापेक्षां माझ्या ठिकाणीं विद्वत्ता अधिक; त्यापेक्षां तिकडे माझ्या विद्वत्तेचें चीज न झालें तरी या आडाणी मुलखांत तें खचीत होऊन माझें दैव उघडेल!

मी कांहीं विचारांत आहें असें जाणून, दत्तोपंतानें विचारलें—" मग तुमच्या मनांतून कोणता धंदा करावा असें आहे? तुम्ही कोणता बेत करून आलां आहां?"

मीं म्हटलें–" नाहीं. मी बेत बीत कांहीं करून आलों नाहीं. आतां वेळेवर काय होईल तो बेत."

तो आश्चर्यानें म्हणाला—" वेळेवर बेत ! म्हणजे ? याचा अर्थ काय ? तुम्ही निघालां तेव्हांच अमुक करावयाचें तुमच्या मनांत आलें असलें पाहिजे."

यावर काय उत्तर द्यावें तें मला सुचेना. मग मीं म्हटलें—" मला या प्रदेशाची नाहीं माहिती. तेव्हां तुम्ही मसलत सांगाल तसें वागण्याचा माझा मानस आहे."

तोही विचारांतच पडला; मग कांहीं वेळानें म्हणाला–" हें पहा, मसलत सांगणें हें कांहीं सोपें नाहीं. परंतु तुम्ही आमचे संबंधी म्हणून एवढेंच म्हणतों कीं, होईल ती मदत मी आनंदानें करीन."

मी म्हटलें–" हे तुमचे मोठे उपकार आहेत, याहून अधिक काय पाहिजे !"

तो म्हणाला—" उपकार कसले ? हें मला उचितच आहे. तथापि माझ्या मसलतीचा उपयोग होणें हें सर्वस्वी तुमच्या वागणुकेवर अवलंबून आहे."

हें भाषण ऐवढेंच सोडून मग त्यानें माझ्या स्थितीची गोष्ट काढली. मी त्याला सांगितलें–" प्रस्तुत माझी अगदीं गरीबी आहे. कारखाना काढून टाकल्यावर सारे हजार रुपये हातीं आले. त्यांपैकीं दोनशें अडीचशें तर प्रवासाचें सामान सुमान घेण्यांत उडाले, बाकी सुमार सहाशें रुपये आहेत."

तो म्हणाला–" ओहो ! एवढ्यानें काय होईल ? तुम्हा तिघांचा निर्वाह होऊन संभावितपणें कसें

राहतां येईल ? तुम्ही एकटेच आलां असतां तर बरें होतें. असो; आतां आहे यांतच पाहिलें पाहिजे. भाऊ साहेब, तुम्ही म्हणतां—इकडली तुम्हास माहिती नाहीं. खरें आहे. तुम्हाला सांगूं, इकडे पैसे कसे मिळतात ते ? इकडे मेहनती मजूर असला तर तो पैसे बरे मिळवितो. तसेच मुंबईकडून आलेले लोहार, सोनार, तांबट, वगैरे यांचीही कमाई बरी असते. कारण हा प्रदेश इंग्रज सरकाराच्या ताब्यांत गेल्यापासून मुंबईकडील लोकांची एथें जाये सुरू झाली, त्यामुळें नवीन तऱ्हेचीं घरें, नवीन तऱ्हेच्या वस्तु, नवीन तऱ्हेची कारागिरी इत्यादि गोष्टींचा इकडे खप पडूं लागला. आणि त्या बरोबरच तशीं कामें करणाऱ्या कारागिरांस उत्तेजन आलें. आपल्याला तर हे धंदे करतां येत नाहींत. इकडे शेतीचा धंदा, किंवा कापूस, धान्यें वगैरे जिनसांचा व्यापार चांगला चालण्यासारखा आहे आणि मी तोच करतों. परंतु त्याला घरची पुंजी हवी, ती तुम्हापाशीं कुठें आहे ? बरें, लहानसहान दुकान काढूं म्हटलें, तर तें तुम्हास शोभणार नाही. आंगीं शेती करूं म्हणाल तर गैरमाहितीमुळें तुम्हास साधणार नाहीं, आणि शेतावर खोपटामध्यें थंडीवाऱ्यांत राहणें मानवणार नाहीं. रेल्वेकडील किंवा गिरण्यांच्या कामांचीं कंत्राटें घेऊं म्हणाल तर त्याची दगदग तुमच्यानें होणार नाहीं. सरकारी नोकरी पहाल तर ती वशीवांचून योग्यतेप्रमाणें एकदम मिळणें कठीण आहे. तेव्हां सद्यःफलदायक उद्योग म्हटला म्हणजे हा कीं कोठें तरी मोठ्या व्यापाऱ्याकडे

मुनिमाची वगैरे नोकरी पहावी, म्हणजे घरचें भांडवल नको आणि अंगावर जबाबदारीही नको."

दत्तोपंत बोलला त्यांतली एकही गोष्ट माझ्या मनास आली नाहीं. आणि मुनिमासारख्या दगदगीच्या आणि हलक्या परस्वाधीन नोकरीचें नांव ऐकून माझें मनच विटलें. नंतर आम्हास जी खोली नेमून दिली होती तींत मी निजावयास गेलों; तेथें वायकोची गांठ पडली. तिनें दत्तोपंताची, त्याच्या स्त्रीची आणि कुटुंबाच्या इतर माणसांची फार वाखाणणी केली. ती मला बिलकूल आवडली नाहीं. ती म्हणाली—" त्यांनीं आपला पुष्कळच आदरसत्कार ठेवला." परंतु " वाटलें होतें तेवढा कांहीं केला नाहीं खचीत" असें माझें म्हणणें पडलें. माझ्या अनुमानाप्रमाणें आदरसत्कार कां झाला नाहीं याचीं कांहीं कारणें ती सांगूं लागली, परंतु मला तीं पटलीं नाहींत. मीं म्हटलें—" मीं एवढी विद्वत्ता संपादन केली, चार मुलूख फिरलों, राजकीय प्रकरणांचा आणि सामाजिक सुधारणांचा विचार करण्याला माझी बुद्धि समर्थ झाली—त्या माझी योग्यता यःकश्चित अक्षरशून्य व्यापाऱ्याचा मुनीम होण्याचीच काय ?" मला आलेला आवेश शांत करण्याच्या हेतूनें ती म्हणाली—" परके ठिकाणीं येतां क्षणींच आपल्यास नोकरी मिळत आहे हेंच आपलें मोठें भाग्य, ती मनाजोगती जरी नसली तरी प्रथम कामतर चालू झालें. कांहीं दिवसांनीं आपल्यास आपला वेगळा उद्योगधंदा काढतां येईल किंवा एखाद्या व्यापाऱ्याच्या भागीदारींतही शिरतां येईल. दत्तोपंतांनें जे-

वहें केलें त्याहून आणखी त्यानें काय करावें ?" एवढें तिचें शेवटचें म्हणणें मात्र मला नाकबूल करतां येईना.

याप्रमाणें दहा बारा दिवस काय करावयाचें या विचारांतच मीं घालविले; दत्तोपंताला निश्चयाचें उत्तर दिलें नाहीं. तो भला मनुष्य; त्यानें या गोष्टीविषयीं चकार शब्दही पुनः काढला नाहीं. रोज जेवल्यावर दुपारीं नागपुराच्या वाचनालयांत जावें, आणि मर्जीस आल्यास शहरामध्यें फिरून व्यापाराचीं आणि इतर प्रसिद्ध ठिकाणें पहावीं असा क्रम मीं चालविला. एके दिवशीं वाचनालयांत बसलों असतां तेथें एक ऐटबाज तरुण गृहस्थ गाडींत बसून आला. त्याच्याबरोबर दुसरे दोघे गृहस्थ होते. ते आल्याबरोबर त्यांनीं वाचनालयांत मोठी गडबड उडवून दिली आणि तेथें जे लोक बसले होते, त्यांचें सारें लक्ष आपलेकडे ओढून घेतलें. या गडबडींत माझा एवढाच फायदा झाला ( अथवा तोटा झाला असेंच आतां म्हटलें पाहिजे ) कीं, माझी या गृहस्थाशीं ओळख झाली. आणि एक दोन वेळांच गांठी पडल्यावर जो स्नेह जमला तो जीवश्च कंठश्च असा झाला.

हा गृहस्थ तेथील एका जुन्या जहागिरदाराचा मुलगा होता. त्याचें वय सरासरी पंचविशीचें असेल. बोलण्यांत गोड, दिसण्यांत छानछुक आणि वागणुकींत दिमाखदार असा तो होता. त्याला पुण्याकडील शहरी रीतरिवाजाची फार आवड होती आणि मी पुण्याकडील असें कळतांच त्याची माझ्यावर एकदम भक्ति बसली. मी आपली बेतापुरती हकीगत त्याला सांगितली आणि

त्यानेंही यत्किंचित विचार न करितां होईल तेवढी मदत देण्याचें मला अघळपघळ वचन दिलें. होतां होतां मी त्याच्या संगतीस लागलों. तुम्हीं व्यापार केला तर पैसा पुरवून, आणि नोकरी पाहूं म्हटलें तर वग खर्चून, तुमचें कार्य करून देऊं अशी आशा त्यानें मला लाविली आणि त्याच्यावर विश्वसून मी त्याच्या नादीं लागलों. लौकर त्याची आणि माझी जोडी खाशी जमली. कोठेंही जाणें झालें तरी त्यानें मला बरोबर घ्यावें आणि कांहीं करण झालें तरी मला विचारून करावें. माझ्यावांचून त्याला क्षणभरही चैन पडूं नये. यावरून मलाही असेंच वाटलें कीं या श्रीमंत गृहस्थाचा मला फार उपयोग होईल, आणि ज्यापक्षीं थोड्या दिवसांतच एवढा घट्टमूठ स्नेह जमला त्यापक्षीं पुढें तो याहीपेक्षां दृढ होऊन माझ्या निरंतरच्या सुखास कारण होईल.

जसजशी रंगरावाची गट्टी दृढ होत चालली तसतसा दत्तोपंताचा संबंध शिथिल होत गेला. माझ्या वर्तनावरून त्यानें ताडलें असावें कीं याच्या हातून श्रमाचें कोणतेंही काम व्यवस्थेशीर होणें नाहीं. तथापि तो सज्जन गृहस्थ याविषयीं एक अक्षरही तोंडावाट बोलला नाहीं. दहा पंधरा दिवस त्याच्याकडे आम्ही बसून काढले; आणखी किती काढावयाचे म्हणून आमची आम्हालाच ओशाळगत वाटूं लागली. मग मी एक साधेंच तरी छानदारसें घर भाड्यानें घेतलें आणि त्यांत आपलें बिन्हाड नेलें. निराळें बिन्हाड करण्याचें आणखी एक कारण असें कीं मी लवकरच एक मोठा जमीनदार होणार अशी रंगरा-

वाच्या भरंवशावर मला पूर्ण आशा वाटूं लागली. कारण रंगराव जहागीरदारानें मला असा नाद लाविला कीं इकडे सरकारांतून सवडीनें हलक्या शर्तीवर जमीन पिकविण्यास मिळूं शकते; तशी सुमार दोन हजार एकर तरी जमीन आपण तुम्हास, आपली वग खर्चून, मिळवून देऊं. या नादावर मी पुष्कळ दिवस राहिलों. कोणी कलेक्टर आला किंवा कमिशनर आला म्हणजे रंगरावाबरोबर मीं त्यांस भेटावयास जावें; रंगरावाच्या वाड्यांत कोणा अधिकाऱ्यास पानसुपाऱ्या व मेजवान्या झाल्या म्हणजे मी पुढें पुढें करावें, चैनीनें मिरवावें; आणि भोंवतालच्या मंडळीनें आपल्यास चांगलें म्हणावें म्हणून लांबलांब वाता मारून त्यांस खुष करावें; हा माझा क्रम होता. याशिवाय रंगरावाची मजवर मर्जी असल्यामुळें रोज चहाकाफी कधीं मधीं पंक्तीला जेवण आणि इतर चैनी यांची कांहीं वाण नव्हती.

असें करतां करतां नागपुरांत माझीं तीन वर्षें गेलीं, तरी रंगरावाच्या म्हणण्यापैकीं एकाही शब्दाचा प्रत्यय मला येईना; मग दोन हजार एकरांची जमीनदारी कोठून मिळणार ? हळूहळू माझी सर्व आशा लयास जात चालली. आणि मध्यंतरी जी एक गोष्ट घडली तिनें तर, रंगरावाच्या नादानें मला ज्या भ्रमांत पाडलें होतें, तो भ्रम पार उडाला. याच सुमाराला एक नाटक मंडळी नागपुरास आली. तींत दोन स्त्रिया होत्या. त्या प्रयोगांत स्त्रियांच्या भूमिका घेत आणि कांहीं कसरतही करून दाखवीत. ही मंडळी पुण्याकडून वाहवा मिळवून आली होती.

अशा बाता तिचे व्यवस्थापक प्रौढीनें हव्या तशा मारीत. तरी तिच्यांत विशेष राम दिसला नाहीं. नागपुरास या मंडळीची छाप आल्यावरोवरच बसली आणि लोकांत तिची चहा झाली. जो तो मंडळीबरोबरच्या स्त्रियांच्या सौंदर्याची आणि त्यांच्या कामाची वाखाणणी करूं लागला. आमच्या रंगरावाच्या चैनीला हें फार नामी खाद्य मिळालें. त्यानें तात्रडतोब मंडळीला आपला उदार आश्रय दिला. इतकेंच नाहीं तर त्या स्त्रियांपैकीं एक विठाबाई ह्मणून होती तिच्यावर स्वारी आषक होऊन फारच नादीं लागली. त्याची माझी ओळख काय ती तीन वर्षांची, तथापि सलगीमुळें त्यास, हें चांगलें नाहीं, असें मीं पुष्कळ सांगितलें. परंतु त्याचा तो नाद सुटण्याचा रंग दिसला नाहीं. मीं त्याची एवढी पर्वा केली नसती, परंतु जसजसा त्या बाईविषयीं त्याचा नाद वाढत चालला तसतसा माझा संबंध दुरावत चालला असें माझ्या स्पष्ट लक्षांत आलें. जमीन मिळवून देण्याची गोष्टही तो आतां काढीना, एवढेंच नाहीं तर मी विचारलें असतांही, अपमानाचीं भळभळतीं उत्तरें देऊं लागला. हळूहळू माझ्यावरील त्याची मर्जी उतरली—आणि ती इतकी कीं त्याची भेट होणेंही दुर्लभ झालें. पुढें लौकरच रंगराव त्या विठाबाईस नाटक मंडळींतून कोठें घेऊन गेला, असा एके दिवशीं सगळ्या शहरभर बोभाटा झाला. अर्थात त्याच्या मदतीवर अवलंबून राहिलेले माझे सर्व बेत जागच्या जागीं थिजले आणि जमीनदार होण्याची सर्व आशा लयास गेली !

आतां आपण पुढें कोणता उद्योग करावा हा प्रश्न पुनः मजपुढें उभा राहिला. या पूर्वी एक दोन वेळां दत्तोपंताच्या साहाय्यानें मला कारकुनीच्या नोकऱ्या मिळाल्या होत्या. परंतु तेथें माझें जमलें नव्हतें आणि कारकुनीची खर्डेघाशी माझ्यानें होण्यासारखी नव्हती. एखादें अकलेचें काम असतें आणि त्यांत उणी अधिक मेहनत पडती तरी मी एवढा डगमगलों नसतों. परंतु व्यापाराच्या कामांतली जिगजीग आणि कडकडीत नियमितपणा यांचा मला फार कंटाळा होता. यामुळें तीन वर्षं नागपुर प्रांतीं काढूनही 'पुढें काय करावयाचें' हा नवाक्षरी मंत्र जपण्याची पाळी पहिल्या दिवसाप्रमाणें आली. जी जी हकीगत घडे ती ती मी दत्तोपंताच्या कानावर वेळोवेळीं घालीत असें व त्याची सल्ला विचारीत असें. त्यानें माझा स्वभाव पुरा जाणला असल्यामुळें, माझ्या कामांत हात घालण्यांत अर्थ नाहीं असें मानून, होस हो करण्याचा परिपाठ ठेवला होता. यामुळें माझ्या 'नवाक्षरी' मंत्राचा त्याच्याकडून उलगडा होण्याची मला आशा दिसली नाहीं. विचार करतां करतां, या मागासलेल्या प्रदेशांत आपल्या बुद्धीचा दिसावा तसा प्रभाव दिसणार नाहीं असा माझा ग्रह झाला. आणि परत मुंबईस निघून जावें असा मी निश्चय केला. काय चमत्कार पहा कीं ज्या प्रदेशीं येऊन शेकडो लोक उद्योगधंद्यास लागले आणि सुखवस्तु झाले, त्याच प्रदेशीं मी बुद्धिवान असतांही माझी बुद्धि केवळ पंगू झाली, एवढेंच नाहीं तर मला येथून परत जाण्याचीच पाळी आली. परंतु 'दैवावर हवाला' देण्याची

मला संशय झाल्यामुळें हा केवळ माझ्या दैवाचा येग असें मीं मानलें आणि 'आलिया भोगाशीं सादर' झालों !

हा माझा बेत मीं माझ्या प्रियेस कळविला. तो प्रथम तिच्या पसंतीस आला नाहीं. परंतु माझा आग्रहच पाहून तिनेंही त्यास रुकार दिला. मग आम्ही नागपुर सोडून जाण्याच्या तयारीस लागलों. जवळ पाहूं लागलों तो पैसे अगदीं नाहींत; चार महिन्यांचें घराचें भाडें द्यावयाचें होतें त्यालाही पैसे नाहींत. गेल्या तीन वर्षांत जवळ असलेले पांच सात शें रुपये आम्हीं पार केले. तरी एवढें बरें होतें कीं माझ्या स्त्रीनें काटकसरीनें खर्च करून दुकानदारांची वगैरे कोणाची ही उचापत ठेवली नव्हती. माझा हात ढिसाळ होता, म्हणून जो माझ्या हातून फाजील खर्च होई तो; याशिवाय एक पैचाही विनाकारण खर्च तिच्या हातून कधीं झाला नाहीं. मग जवळचे सर्व पैसे गोळा करून प्रथम मीं भाडें देऊन टाकलें. आणि पाहिलें तों माझ्यापाशीं मुंबईस जाण्याकरितां आमच्या तिघांच्या उताराचेही पैसे शिल्लक नाहींत असें आढळलें. दत्तोपंतापाशीं मागावे असें हिचें म्हणणें पडलें. परंतु मला लाज झाली. तेव्हां समक्ष न मागतां मीं चिठी पाठविण्याचा विचार केला. दत्तोपंताला भेटून, ही हकीगत सांगून मीं त्याचा निरोप घेतला, तथापि त्याच्यापाशीं पैशाची गोष्ट काढला नाहीं. घरीं आल्यावर चिठ्ठी लिहून ठेवली परंतु ती लगेच न पाठवितां निघण्याच्या आदल्या दिवशीं पाठवूं, असें मीं म्हटलें. इतक्यांत दत्तोपंत कांहीं कामाकरितां बाहेरगांवीं निघून गेला, तो दोन महिने यावयाचा नाहीं असें मला

समजलें. अर्थात आतां चिठी पाठवून उपयोग काय? सगळी तयारी झाल्यावर नागपुरांत राहण्याची तर सोय राहिली नाहीं, गेलें हें पाहिजेच, आणि जवळ तर पैसा नाहीं असें झालें. मग मीं जवळचें जुनें रुप्याचें खिशांतलें घड्याळ होतें तें विकण्याचा विचार केला. तें बाबांचें होतें आणि त्यामुळें मला बाबांचें वारंवार स्मरण होत होतें. म्हणून बाबांच्याच वियोगाप्रमाणें त्याचाही वियोग मला दुःसह वाटला. परंतु काय सांगूं? अडचणीच्या प्रसंगीं तोही सोसण्यास, कठीण हृदय करून, मी तयार झालों.

तिन्हिसांजेच्या सुमारास घड्याळ खिशांत घातलें, व बाजारामध्यें कोपऱ्यांतल्या एका मारवाड्याच्या दुकानीं गेलों. मारवाडी हे मोठे लोभी आणि निर्दय म्हणून गणले आहेत. लोक त्यांचा द्वेष करतात तो करोत, किंबहुना त्यांचें दर्शनही अशुभ मानतात तें मानोत, तथापि गरजू लोकांस आडअडचणीला त्याचा मोठा उपयोग होतो अशी या वेळीं माझी खात्री झाली. मी मारवाड्याच्या दुकानांत शिरलों, त्याच वेळीं, माझ्या पाळतीवर राहून पाठोपाठ कोणी मनुष्य येत आहे असा मला भास झाला. असेल कोणी असें म्हणून तिकडे मीं लक्ष दिलें नाहीं. मारवाड्यास घड्याळ दाखविलें आणि रीतीप्रमाणें पुष्कळ घासाघीस व जिकीर करून पन्नास रुपयांस तें देण्याचें ठरविलें. या वेळीं माझ्या पाळतीवर असलेला मनुष्यही तेथें निमूट उभा होता. मला वाटलें कीं मारवाड्याचें हें नेहमीचें कोणी कूळ असेल. रुपये घेऊन मी दुकानाच्या बाहेर पडलों. सुमार शंभर पावलें गेलों असेन, नसेन; इतक्यांत एक चपळ मुलगा

धावत धावत व मला हाका मारीत मारीत माझ्यापाशीं आला, आणि घड्याळ माझ्या हातांत देऊन म्हणाला—"तात्या साहेब, हें आपलें घड्याळ आपण दुकानावर विसरून आलां तें घ्या, आपलें संभाळा !"

घड्याळ मीं ओळखलें; मारवाड्यास विकलें तेंच हें होतें. म्हणून मीं म्हटलें—"बाळ, हें माझें नव्हे."

तो फिरून म्हणाला—"नव्हे कसें ? तें तुमचेंच आणि तुमच्यापाशीं असणेंच योग्य आहे असें बाबा म्हणतात." असें म्हणून तो पळत जाऊं लागला.

मी आश्चर्यांत पडलों कीं हा मुलगा कोण आणि घड्याळ परत देतो कसा ? मुलास मीं गांठलें व ह्यांतला खुलासा विचारला. तो म्हणाला—"तें मला कांहीं माहीत नाहीं. बाबा म्हणाला—'घड्याळ तुमचें आहे' आणि तुमच्या स्वाधीन करण्यास त्यानें मला सांगितलें आहे. अधिक विचारावयाचें असेल तर तुम्ही त्याला विचारा."

ह्या उत्तरानें तर मी अधिकच बुचकळ्यांत पडलों. आणि हें आहे तरी काय हें समजण्याची अत्यंत जिज्ञासा प्राप्त झाली. मग अधिक न बोलतां मी त्या मुलाबरोबर त्याच्या घरीं गेलों. त्याचें घर गांवाच्या अगदीं बाहेर शेतवाडीवर होतें. तें झोपडेवजाच होतें; तरी नीटनेटकें, टुमदार आणि सोईकर दिसत होतें. मीं जातांच, एक मनुष्य दाराच्या तोंडाशींच ओट्यावर गुडगुडी ओढीत बसला होता, तो उठून पुढें आला, आणि लवून, राम राम करून, मला घरांत घेऊन गेला—जणों माझी त्याची फार दिवसांची घट्टमूट ओळख आहे, असें त्याच्या वागणुकेवरून

दिसलें. या योगें माझें आश्चर्य अधिकच वाढलें. एका मुलानें आंतून एक खुर्ची आणून मला बसावयास दिली. दुसऱ्या एकानें पानसुपारीचा डबा आणून पुढें ठेवला. मी बसलों तसा तो मनुष्यही तिथें चटईवर बसला. इतक्यांत एक प्रौढ बाई, मर्यादशीळपणानें पुढें येऊन, दिव्याची वात सरसावून गेली. जातांना ती म्हणाली–" आज हे तात्या साहेब कोठून इकडे आले बया ! यांच्या पायधुळीनें आमचें हें झोपडें पावन झालें." इतक्यांत, दोन चार जातींची फळ-फळावळ भरून एक लखलखीत ताट आणि पाण्याचा गडवाही पुढें आला. या वेळीं माझ्या आश्चर्यास पारावार उरला नाहीं. एवढा सत्कार, एवढा मायाळूपणा, एवढी टापटीप आणि एवढा विनय मजविषयीं दाखविण्याचें यांस प्रयोजन काय ? हीं मनुष्यें कोण ? मी यांस ओळखीत नसतां जुन्या पुराण्या ओळखीप्रमाणें हीं माझ्याशीं वागतात हें कसें ? अशा विचारांनीं मी भांबावून गेलों आणि क्षणभर 'अरबी भाषेंतील जादूच्या गोष्टीं'तल्या प्रकाराचाच भास मला झाला. एकदा विचारून याचा खुलासा करून घेण्याच्या विचारांत मी होतों. इतक्यांत घरधन्यानें बोलण्यास सुरवात केली.

तो म्हणाला,–'तात्या साहेब, तुम्ही आम्हा गरिबांची अगदींच ओळख विसरलां वाटतें. परंतु आम्हीं तुमची ओळख आणि तुमचे उपकार, विसरूं म्हटलें, तरी कसे विसरावे ?"

हे शब्द ऐकतांच मला पूर्वीच्या एका हकीगतीची आठवण झाली, आणि सर्वांकडे निरखून पाहिल्यावर लक्षांत

आलें कीं जो पाटील बुवा, दोन मुलें आणि स्त्री यांसहित आमच्या बरोबर नागपुरास आला आणि तिकीटें सांडल्यामुळें पोलीसाच्या जाचांतून ज्याला मीं सोडविलें तोच हा! तेव्हां मला एकेपरी मोठा आनंद आणि एकेपरी मोठा संकोच उत्पन्न झाला. माझ्यानें अक्षरही बोलवेना. तेव्हां तो पाटील बुवा, मला आश्वासन देऊन, म्हणाला-" आपण कांहीं संकोच धरूं नका. आपलें घड्याळ आपल्यास मिळालें ना? त्याचे पैसे मीं त्या मारवाड्यास केव्हांच देऊन टाकले आहेत. आपण त्याची काळजी करूं नये. मोठ्या परोपकार बुद्धीनें आमच्या उताराचे पैसे ऐन अडचणींत ज्यानें भरून आह्मास मुक्त केलें, त्याची फेड आमच्या हातून कशानें होणार? तरी आज आपली गांठ पडली व विकण्यास काढलेलें घड्याळ सोडवून घेण्याची मला सवड मिळाली हे माझें सुदैव होय. आपण नागपुरांतच राहत असाल अशी माझी अटकळ होती. परंतु माझा धंदा पडला शेतवाडींतला. मी शहरांत क्वचितच फिरतों. आणि आपला व्यवसाय पडला श्रीमंत लोकांत. तेव्हां आपल्या दर्शनाचा योग इतके दिवस आला नाहीं, त्यास निरुपाय होता. असो; आपल्यास जेवढे पैसे पाहिजे होते तेवढे मारवाड्याकडून मिळालेच आहेत. आतां हें आपलें घड्याळ आपण घेऊन जावें. परंतु त्यापूर्वीं, हातपाय धुऊन, आपण आमच्या वाडींतील स्वश्रमार्जित या फळफळावळीचा उपहार करावा एवढीच माझी आग्रहपूर्वक सविनय प्रार्थना आहे."

पाटील बुवाचा विनय पाहून त्याची इच्छा माझ्यानें अगदीं मोडवेना. तेव्हां मीं म्हटलें–" तुमच्या विनंतीचा मी आदर करितों. परंतु तुमची स्थिति प्रस्तुत बरी दिसत आहे ती तुम्हास कशी प्राप्त झाली हें मला अगोदर सांगा पाहूं ? "

तेव्हां, स्टेशनावर पोलीसाच्या हातून आपली सुटका झाल्यावर, आपण नागपुरांतच राहण्याचा निश्चय केला; प्रथम मोलमजुरी करून आणि भलेपणानें वागून एका सावकाराची मर्जी संपादन केली; पुढें त्याच्याच मदतीनें कांहीं जमीन लागवडीनें घेतली; लागवड करतां करतां थोडीशी जमीन मालकीची संपादन केली; आणि याप्रमाणें बस्तान बसल्यावर बरीच मोठी जमीन सवलतीनें सरकारांतून मिळविली; मग घर वगैरे बांधलें, इत्यादि हकीगत त्यानें सांगितली, आणि शेवटीं म्हटलें–" तुमच्या कृपेनें सांप्रत माझी स्थिति बरी आहे. तुमच्या सारख्याच्या उपकाराच्या ऋणाशिवाय मला कोणाचें एक पैसाहीं देणें नाहीं. एवढेंच नाहीं तर जवळ दोन पैसे झाले असून माझ्या इष्टमित्रांसही साहाय्य करण्याचें सामर्थ्य मला प्राप्त झालें आहे. तरी मी आपल्यास सांगतों कीं मनुष्य नेकीनें, मेहनतीनें, आणि टापटिपीनें वागेल तर संकटांतूनही निभावून चांगले दिवस खचित पाहील, अशी माझ्या स्वतांच्या उदाहरणावरून खात्री झाली आहे. मात्र मनुष्यानें धैर्य धरून मेहनत केली पाहिजे, आणि प्रामाणिकपणानें वागलें पाहिजे आणि आपलें काम वेळचे वेळीं टापटिपीनें करण्याची चाल ठेवली पाहिजे " त्याचें हे श-

वटचे शब्द माझ्या जिवाला चटकन झोंबले, परंतु अधिक न बोलतां, आनंदित मुद्रा करून, त्या सुखी कुटुंबाचा मीं निरोप घेतला.

ही हकीगत मीं कोणासही सांगितली नाहीं; आज ओघास आली म्हणूनच येथें लिहिली आहे. यानंतर दुसऱ्या दिवशीं आम्ही **नागपुर** सोडून ठरल्याप्रमाणें निघालों ते **मुंबईस** आलों. **मुंबईस** तरी माझी नीट व्यवस्था लागेल अशी आशा नव्हतीच, तरी ' देवावर हवाला ' ठेवून जसे आम्ही **नागपुरास** गेलों तसेच आतां **मुंबईस** आलों.

# प्रकरण ७ वें.

## सुखदुःखाची परमावधि.

हा! हा! दुःखें सुखेंही चरित परिसतां आमचा काय कोंदे।

**मोरोपंत.**

जसजशीं मजवर संकटें येत गेलीं तसतसा त्यांना मी एवढा घटावलों कीं, त्याचें भय मला मुळींच वाटेनासें झालें. तथापि हीं संकटें एकाहून एक अधिक दारुण येत चाललीं आणि त्यांचें परिणामही अधिकाधिक भयंकर असे अनुभवास येऊं लागले. या सर्वांचें मूळ माझें दैव असें जरी मी म्हणूं लागलों, तरी आजची गोष्ट उद्यांवर टाकण्याच्या, माझ्या हाडीं खिळून गेलेल्या, द्वाड खोडीचाच हा सर्व प्रभाव असल्यामुळें, माझे व्यवसाय आणि तत्संबंधीं जबाबदारी यांचें महत्व माझ्या वयाबरोबर वाढत जातांच, या द्वाड खोडीचें प्रौढ स्वरूप प्रगट झालें आणि तज्जन्य संकटाच्या प्रखर प्रभावाची परमावधि झाली, यांत काय नवल ? याचें प्रत्यंतर माझ्या चारित्राच्या पुढील अवशिष्ट भागावरून वाचकांस येईल.

आम्ही मुंबई आलों, ते माधव बागेच्या धर्मशाळेंत उतरलों. मुंबईस माझ्या फारशा ओळखी नव्हत्याच, आणखी ज्या होत्या त्या अशा अडचणीच्या वेळीं उकरून

काढण्याची माझी इच्छा नव्हती. म्हणून मला माधव बागेच्या धर्मशाळेंत राहणें बरें वाटलें. फराळ बिराळ करून आमची स्वारी बाहेर पडली. मनांत उद्देश हा कीं कांहीं तरी उद्योगधंदा पहावा. रस्त्याच्या नाक्यापर्यंत गेलों तों तेथें छापखान्याचें सामान लावण्यांत कांहीं लोक एका दुकानांत गुंतले आहेत असें मीं पाहिलें. त्यांच्या धांदलीवरून त्यांस छापखान्याच्या कामाची असावी तशी माहिती नव्हती, असें दिसलें. मीं पांच एक मिनिटें तेथेंच उभा राहिलों. या कामाची मला पुरी माहिती होती, म्हणून यांची चुकी कुठें होत आहे, ती मीं तत्काळ त्यांस दाखविली आणि, असें असें करा, म्हणून सांगितलें. यामुळें या छापखान्याचा मालक खुष झाला. त्यानें लगेच बसावयास मला खुर्ची दिली आणि आदरानें माझी विचारपूस केली. आपली तांत्रिक हकीगत सांगून मीं म्हटलें— "मला कोठें तूर्त नोकरी पाहणें आहे" शेठजी म्हणाला— "मीं एका मित्राच्या आग्रहावरून हा छापखाना घालण्याचा विचार केला, व सामान विकत घेतलें. परंतु हा मित्र कालरा होऊन एकाएकीं मरण पावला. त्यामुळें माझी तूर्त फसगत झाली आहे. मला कांहीं या कामाची माहिती नाहीं. तुमची राहण्याची मर्जी असल्यास माझें मोठें काम होईल. परंतु आरंभींच मला कांहीं मोठा पगार देववणार नाहीं."

मीं पाहिलें कीं, मुंबईची वस्ती, येथें खर्च फार, आपल्यापाशीं तर पैसे नाहींत; म्हणून दरमहा तीस रुपये पगार आणि राहण्यासाठीं फुकट जागा या शर्तींवर मी नोकरी

पतकरली. आम्हीं आपलें बिऱ्हाड त्याच दिवशीं सायंकाळीं छापखान्याचे इमारतींत नेलें. छापखान्याच्या सामानसुमानाची व्यवस्था मीं अशी सुरेख लाविली कीं शेठजींची मर्जी ताबडतोब मजवर बसली. त्यांत माझें संभावित आचरण पाहून तर त्याचा मजवर एवढा विश्वास बसला कीं छापखान्याची एकंदर देवघेव आणि तिजोरीची किल्ली त्यानें माझ्या हातीं दिली. नेहमींच्या संवट्टगानें शेठजींचा स्नेहभाव फारच वाढला; तथापि पगार फार थोडा म्हणून माझ्या मनांतून येथें फार दिवस राहावयाचें नव्हतें. इतक्यांत एक अकल्पित गोष्ट घडून आली ती येथें सांगण्यासारखी आहे.

एके रविवारीं सकाळींच बाजारांतून भाजी घेऊन, ती उपरण्याच्या पदरीं बांधून, मी आमच्या शेठजींच्या दारावरून येत होतों. शेठजी ओटीवरच तोंडांत दांतणाची काडी चावीत बसला होता. त्यानें मला हाक मारली. मीं बिछाइतीवर जाऊन बसलों. इतक्यांत त्याचा सैंपाक्या जो मोठा गमती मनुष्य होता, त्यानें माझा शब्द ऐकतांच बाहेर येऊन म्हटलें—" रावसाहेबांनीं भाजी आज स्वतां आणलेली दिसते. काय, आज भाजी तरी काय आणली आहे? बरें झालें; आपल्याला तरी आज भाजीची सोय पहावयास नको. आहे हीच आज आपण ठवून घेऊं. " असें म्हणून, भाजी गुंडाळलेलें तें माझें उपरणें जमिनीवर ठेवलें होतें, तें थांब थांब म्हणत असतां तो घरांत घेऊन गेला. तेव्हां शेठजीही हंसून म्हणाले— " चिंता नाहीं. नेऊं द्या त्याला, तुम्हीच आज आमच्या

इथची रांधलेली भाजी खाऊन पहा. आमच्या भटाच्या हातचें रांधलेलें तुम्हांस खपतें हें मला माहीत आहे. ” शेठजीचा आग्रह जाणून भाजीची गोष्ट मीं सोडून दिली. नंतर छापखान्याच्या कामकाजासंबंधें चार गोष्टी झाल्यावर मीं तेथून निघालों आणि मार्किटांतून दुसरी भाजी घेऊन बिऱ्हाडीं गेलों.

रविवार असल्यामुळें त्या दिवशीं छापखाना बंद होता. भोजनोत्तर दोन प्रहरीं मी कोचावर पडलों होतों आणि माझा डोळा अंमळ लागला होता. इतक्यांत एक पोलीसचा शिपाई आणि कोणी एक मनुष्य असे दोघे मला भेटावयास म्हणून आले. त्यांनीं मला कांहीं प्रश्न केले ते ऐकून मीं घाबरलों आणि माझ्या हातून झालेली चूक तावडतोब माझ्या लक्षांत आली.

पहिल्या खेपेला भाजी आणली तींत डोरलीं कारलीं मीं आणलीं होतीं आणि त्यांतच एक धोतऱ्याचें फळही आणलें होतें. माझ्या एका नोकराच्या पायाला नारू झाला होता त्यावर चेंचून लावण्याकरितां तें हवें होतें. परंतु त्याची आठवणही कशी ती आतांपर्यंत मला झाली नाहीं. शेठजीच्या सैंपाक्यानें त्या कारल्याच्या आणि त्याबरोबरच त्या धोतऱ्याच्या फळाच्या काचऱ्या करून, तळून, मुद्दाम आवडीनें शेठजीसाठीं केल्या आणि त्यांसच एकट्याला वाढल्या. मोलकरणीनें कारलीं चिरलीं आणि सैंपाक्यानें तळली; कोणाच्याही लक्षांत डोरलीं कारलीं आणि धोतऱ्याचें फळ यांच्या मधला तफावत आला नाहीं. शेठजीनींही काच-

त्यांची वाखाणणी करून विनदिक्कत त्यांवर ताव मारला. परंतु म्हणतातना,

न कळतां पद अग्निवरी पडे
न करि दाह असें न कधीं घडे ।

याप्रमाणें न कळतां खाण्यांत आलेल्या त्या विषफळाचा अंमल एक तासाच्या आंतच शेठजीवर बसला. त्यांस घेरी करूं लागली, डोळ्यांपुढें काजवे दिसूं लागले, वांत्या होऊं लागल्या, पावलें आणि हाताचे पंजे गार पडले आणि स्वतः ते बेशुद्ध पडले. विषप्रयोगाचीं सर्व लक्षणें झालीं. शेठजीच्या घरची मंडळी आणि नातलग जमा झाले. चौकशी करितां मोलकरणीच्या बोलण्यावरून सर्वांसही भाजीचाच संशय आला; आणि मींही पहिल्याच फटकाऱ्याला भाजीमध्यें धोतऱ्याचें फळ आणल्याची गोष्ट कबूल केली. शेठजींची नातलग मंडळी मजवर एवढी रागावली कीं तिनें मला, त्या सैंपाक्याला आणि त्या मोलकरणीला संशयावर पोलिसाच्या हवालीं केलें. पोलिसानें आम्हास न्यायाधीशापुढें उभें केलें. रीतीप्रमाणें वकील वगैरे केला, काम चाललें, आमच्या जबान्या झाल्या. सर्व म्हणूं लागले कीं खटल्याचें स्वरूप भयंकर आहे. तीन दिवस काम चाललें. परंतु तिसरे दिवशीं शेठजीस आराम पडून ते शुद्धीवर आले. सभोंवतालच्या मंडळींनं माझ्या नांवाचा हवा तसा गवगवा केला, तथापि शेठजीनें न्यायाधीशापुढें साफ सांगितलें कीं हा मनुष्य असें काम करणारा नाहीं; झाली ही गोष्ट केवळ चुकीनें झाली आहे. शेठजींची जबानी अशी पडतांच आमच्या निरपराधत्वाविषयीं

न्यायाधीशाची खात्री झाली आणि त्यानें आम्हा सर्वांस आरोपमुक्त करून सोडून दिलें.

झाला प्रकार हा फार वाईट झाला. शेठजींनें आपल्या सभोंवतालच्या मंडळीस त्यांच्या उतावळेपणाबद्दल फार दोष दिला, आणि माझा सन्मान करून माझ्या मनाचें समाधान केलें. मीं म्हटलें यांत कोणाचाच दोष नाहीं; सारा दोष माझा एकट्याचा आहे. मीं तें फळ निराळें ठेवण्यास कां चुकावें ? नंतर सैंपाक्यास सांगण्यास कां विसरावें ? आणि शेवटीं घरीं मला आठवण झाली असतांही त्याच वेळीं निरोप पाठवून तुम्हास कळविण्याची हयगय कां करावी ? असो, झालें तें ठीकच झालें; त्याबद्दल आपण खेद मानूं नये व मीही मानीत नाहीं."

यानंतर धांवतच मी बिन्हार्डी गेलों. दुःखानें माझी स्त्री शोक करीत पडली होती. मी येतांच ती चपापून उठली आणि प्रेमानें आणि हर्षानें मला तिनें घट्ट आलिंगन दिलें. तिचा कंठ दाटून आला; एक शब्दही बोलवेना. या चिन्हांवरून माझ्या वियोगानें तिची काय भयंकर स्थिति झाली असावी याची बरीच कल्पना मला झाली.

यापुढें शेटजीच्या नोकरींत मी फार दिवस राहिलों नाहीं. मला त्या नोकरीचा कंटाळाच आला होता. आणखी इतक्यातच दुसरी एक सुंदर नोकरी मला चटकन मिळाली. मुंबईंतील एका प्रसिद्ध पुस्तकालयाच्या चिटणिशीची जागा रिकामी पडली होती, तिला एक लायक मनुष्य हवा होता.

या संबंधानें एक जाहिरात वर्तमान पत्रांत नुकतीच प्रसिद्ध झालेली माझ्या पाहण्यांत आली. लगेच मी आपला अर्ज सदहू पुस्तकालयाच्या व्यवस्थापकाच्या नांवें रवाना केला. कर्मधर्मसंयोगानें या पुस्तकालयाच्या व्यवस्थापकाच्या जागीं माझा जुना दोस्तदार मि. सोरावशा हा होता. त्यानें माझें नांव वाचतांच एकदम मला बोलावूं पाठविलें. मग काय ? ही सोईची जागा मिळण्यास मला बिलकुल प्रयास पडले नाहींत. छानदार दरमहा शंभर रुपये पगार, तीन कारकून आणि दहा बारा शिपाई हाताखालीं आणि सर्वांत मोठी आनंदाची आणि मला मनापासून हवी होती अशी गोष्ट ही कीं एक मोठें धनत्तर पुस्तकालय स्वाधीन; याहून आणखी काय पाहिजे ?

**या** वेळीं माझ्या सुखाची परमावधि झाली. ही नोकरी म्हणजे, माझ्या पूर्वीच्या स्थितीचा विचार करतां, फार मोठी होती असा अर्थ नाहीं, तथापि थंडीच्या दिवसांत सूर्याचे बालकिरणही जसे सुखकर वाटतात, तसें दुःखामध्यें थोडेंही सुख झालें असतां, तें अधिक प्रिय वाटतें. या न्यायानें, माझ्या निराधार स्थितींत, मला या नोकरीनें विलक्षण समाधान प्राप्त झालें.

**या** पुस्तकालयापासून नजीकच एक छानदारशी जागा राहण्याकरितां मीं भाड्यानें घेतली. या ठिकाणीं ज्या ज्या सोई पाहिजे होत्या त्या मला मिळाल्या, ज्या गोष्टींची मला आवड होती त्या प्राप्त झाल्या, आणि ज्या चिरकांक्षित सुखांकडे मनाची ओढ होती तींही मला अनुभवितां येऊं लागलीं. राहण्याला प्रशस्त आणि सोईचें घर, मना-

प्रमाणें वागणारी तत्पर प्रिय भार्या, पाणीदार आणि गोजिरवाणा मुलगा, मनाप्रमाणें नोकरी, पुस्तकालयांत हवा तो ग्रंथ वाचण्याची सोय, शांततेचा आणि एकांतवासाचा अलभ्य लाभ असूनही, विद्वानांचा, कवींचा आणि सन्मित्रांचा समागम—सारांश सुशिक्षित मनुष्याच्या मनाला हव्याशा वाटणाऱ्या बहुतेक गोष्टी येथें मला प्राप्त झाल्या. मुंबईसारखें शहर, येथें एक पैसा असल्यावर कोणत्या गोष्टीची उणीव असणार ? आणि पैशाच्या बाबतींत माझी सोय तूर्त झाली होती तीहून ज्यास्त व्हावी अशी मला अपेक्षा नव्हती. घरांत शांति, मनांत संतोष, आणि लोकांत आवडीचा व्यवसाय, याप्रमाणें मनासारखी व्यवस्था झाल्यामुळें माझा काळ अत्यंत सुखांत जाऊं लागला.

ही जी स्थिति मला प्राप्त झाली, ती अशा प्रकारची होती कीं माझ्या आंगचे गुण प्रगट व्हावे आणि दोषांवर झांकण पडावें, किंबहुना त्या दोषांसही गुणाचें स्वरूप मिळावें. व्यापारधंद्यांतल्याप्रमाणें आतां मला नियमितपणानें, टापटिपीनें आणि बेतशीर वागण्याची विशेष जरूर उरली नाहीं. पुस्तकालयाची व्यवस्था पहावी हें काय तें माझें मुख्य काम; तें आजचें उद्यांवर गेलें तरी नुकसान नव्हतें. आणि ही व्यवस्था ते दोघे कारकूनही जेथर्चा तेथें फार उत्तम ठेवीत असल्यामुळें माझी नुसती वर देखरेखच पुरे होती. याशिवाय माझें इतर व्यवसाय म्हटले म्हणजे सभादिकांस जाणें, मित्रमंडळीच्या घरीं घरगुती समारंभास जाणें, क्लबांत

जाणें वगैरे होत. त्यांत थोडी फार घालघसर झाली तरी ती मनावर घेण्यासारखी नव्हती. उलट, हे मोठे जबरे वाचनाभिलाषी आहेत, विचारशील आहेत, शांत आहेत, धीमे आहेत, अशी माझी स्तुतिच व्हावयाला ती कारण होऊं लागली. कोणास पत्राचीं उत्तरें वेळचे वेळीं न लिहिलीं किंवा कोणाचा हस्तलिखित ग्रंथ गहाळ झाला, तरी नाशास पात्र होण्याचा संभव यापुढें उरला नाहीं. माझ्या अंगीं भाषणचातुर्य बरेंच होतें; चार मंडळींत त्याची छाप ताबडतोब पडूं लागली. असें झालें तरी माझी मूळ खोड गेली असें मात्र नाहीं. तथापि माझ्या हयगईनें माझ्यावर यापुढें संकट येऊन पडेल अशी आतां धास्ती राहिली नाहीं, असें मला वाटलें. आणि म्हणूनच ही खोड सोडण्याची खटपट करण्याची गरज नाहीं, असें पाहून मीं आनंद मानला.

सुमार चार वर्षे मुंबईमध्यें माझें गाडें बरें चाललें. मला वाटलें कीं माझें नष्टचर्य संपलें. मला फुरसद पुष्कळ होती व ती मीं निरुद्योगांत आणि आळसांत घालवीत नाहीं अशी निदान माझी समजूत होती. या वेळीं माझें सारें लक्ष पाश्चात्य देशांतील शिक्षणपद्धतीवरील ग्रंथ वाचण्यांत गुंतलें होतें. सर्व शिक्षणपद्धतींतील उपयुक्त आणि सयुक्तिक तेवढा अंश टाचून घेऊन, माझ्या मुलाकरितां एक खुबीदार पद्धत तयार करण्याचा माझा यत्न चालला होता. मुलाचा मराठी अभ्यास पुरा होऊन, इंग्रजीही टफ करण्यापर्यंत त्याची मजल आली होती. वयाच्या मानानें, पद्धतशीर शिक्षण देतां येण्यास त्याच्या ठिकाणीं बरीच

समज आली होती. यापुढें त्याच्या अभ्यासाची आणि विशेषें करून शिक्षणाच्या पद्धतीप्रमाणें व्यवस्थित अभ्यास करविण्याची हयगय होऊं देणें वाजवी नव्हतें. या मुलावर आम्हा उभयतांचा फार जीव होता. आमच्या सुखदुःखाच्या दिवसांत संतोष देणारा प्राणी काय तो हा ! माझा हा, पहिलाच मुलगा. ह्याच्या पाठीवर दोन तीन मुलें झालीं. पण तीं जगलीं नाहींत, आणि या पुढें मुलें होतील ती गोष्ट दूर होती. मुलगा तरी मोठा हुषार होता, पाणीदार होता, बुद्धिवान होता. आणि जसा बुद्धिवान होता तसा देखणाही होता—स्वरूपानें आणि बुद्धीनें थेट माझीच प्रतिमा ! कोणींही पाहिलें तरी मन वेधावें असा तो होता. अशा मुलावर कोणाचेंही प्रेम जडेल; मग आम्हा उभयतांचें त्याच्यावर अत्यंत प्रेम होतें हें वेगळें काय सांगावें ? या वयांतच त्याचा एवढा उद्योगीपणा आणि एवढें बुद्धिचातुर्य पाहून हा जगांत मोठ्या वैभवास चढेल अशी मला फार आशा होती. त्याला सद्गुण लागावे, आणि मला जडलेल्या चालढकल करण्याच्या खोडीचा गंधही लागूं नये, म्हणून विशेष दक्षता ठेवण्याचा माझा मानस होता. परंतु माझी ही सर्व दक्षता फुकट होती.

एके दिवशीं मी एकटाच खोलीमध्यें कोचावर आडवा पडून वाचण्यांत गुंतलों होतों, आणि तयार केलेल्या शिक्षणपद्धतीच्या नमुन्याप्रमाणें आपल्या मुलास शिक्षण देण्याची सुरवात उद्यांपासून करावयाची किंवा कसें या विचारांत होतों. इतक्यांत माझी प्रिया आंत येऊन मला म्हणाली—" हें पहा, हल्लीं शहरांत देवीची साथ उठून तिनें

काय कहर मांडला आहे ! आपल्या आजूबाजूसही एक दोन मुलें लागल्याचा बोभाटा आहे. तर कसें करावें ? आपल्या बाळाला आजच पुन्हा टोचवून घ्यावा, असें मला वाटतें. "

**मीं** म्हटलें–" कां बरें ? त्याला एकदा टोचलें आहे, पुन्हा टोंचण्याची कांहीं गरज नाहीं. "

**ती** म्हणाली–"होय, तें खरें; परंतु बाळ्याला टोंचलें तो डाक्टर हुषार नव्हता. इथेंही आठवत असेल कीं देवी टोंचल्यावर त्या भराव्या तशा भरल्या नव्हत्या म्हणून पुन्हा टोंचल्या पाहिजेत, असें मामंजी सुद्धां वारंवार म्हणत असत. आजवर हयगईनें ही गोष्ट राहिली तर राहिली; परंतु आतां तशी राहूं देऊं नये. हल्लीं शहरांत कोण कहर उसळला आहे ! त्यामुळें माझ्या मनाला हुरहुर लागली आहे. असें म्हणतात, टोंचकेल्या मुलांना सुद्धां हल्लीं देवी येत आहेत. मग आपल्या बाळयाचें कसें होईल ? त्याला पुन्हा टोंचला तर ? "

**मीं** म्हटलें—" बरें आहे. पुन्हा टोंचू. परंतु मला वाटतें, या बाबतींत माझे मित्र डा०........चें मत घ्यावें आणि ते सांगतील तसें करावें हें बरें. ते उद्यां सकाळीं आपल्याच येथें येणार आहेत."

दुसरे दिवशीं डा० कांहीं आले नाहींत. तेव्हां फिरून माझ्या स्त्रीनें मुलाला टोंचण्याविषयीं माझ्या मागें टोंचणी लावली. तिला मीं म्हटलें—" ही गोष्ट माझ्या ध्यानांत आहे. पुन्हा देवी टोंचविण्याविषयीं डाक्टरांचा मत भेद

आहे आणि एकदा टोंचलेल्यांस देवी येतात कीं काय याविषयीं मला संशय आहे. "

ती म्हणाली—" संशय नको; खरेंच आहे. कांदेवाडींतील आपल्या त्या सरस्वती बाईचा वामन इथें ठाऊक असेल, तो एकवेळ टोंचलेला असतांही देवी येऊन परवांचे दिवशीं आटपला असें आजच सकाळीं कोणीं सांगितलें. हल्लींची साथ फारच प्रखर आहे, म्हणतात. विशेषें करून वाढवल्या सवरलेल्या मुलांनाच ती वळी घेते. तेव्हां आतां उशीर लावून उपयोग नाहीं."

मीं म्हटलें-" एवढी वावरी होऊं नको. आपण उद्यांच बाळाला टोंचून टाकूं."

ती म्हणाली-" छि छि ! ही गोष्ट उद्यांवर लोटूं नका. केव्हां कोणाला हा रोग लागू पडेल याचा कांहीं नेम नाहीं. बाहेर जातांना माझ्या मागोमाग बाळ येतो खरा परंतु मला पोटांत नेहमीं धास्ती असते. कालच एक भिकारिण हातांत मूल घेऊन भिक्षा मागण्याला आली होती. मला वाटलें, तें मूल देवीनें आजारी होतें. त्याला पाहून मला एवढें भय वाटलें कीं, आपला बाळ तिला दिडकी देण्याकरितां पायरीपर्यंत गेला, त्याला मागें ओढण्या इतकेंही धैर्य किंवा बळ माझ्या आंगीं राहिलें नाहीं. म्हणून म्हणतें, आजच टोंचून घ्यावा; मागून मनाला खायाला नको. "

" सवड झाली तर आजच टोचवूं वरें. " असें म्हणून मीं तिला धीर दिला. टोंचण्याच्या इस्पितळांत जाण्याकरितां गाडी बोलवावी, म्हणून तिनें चाकराला हाक मारली. परंतु तिला वारून मीं म्हटलें—" दोघेही

चाकर बाहेर गेले आहेत. 'स्पेन्सर-कृत शिक्षणावरील निबंधा ' चें पुस्तक घेऊन येण्यासाठीं मीं एकाला पुस्तकालयांत पाठविलें आहे. आणि मेशर्स केन कंपनीच्या दुकानांत विलायतेहून कांहीं विद्योत्तेजक खेळणीं आलीं आहेत तीं आणण्यासाठीं दुसऱ्यास, चिठी देऊन, दुकानांत पाठविलें आहे. खेळतां खेळतां विचार करण्यास शिकविणारीं हीं खेळणीं असून, तीं आपल्या बाळास उपयोगी पडतील असें मला वाटतें. थांब अंमळ, दोघांपैकीं कोणी आला म्हणजे तो गाडी घेऊन येईल."

ती म्हणाली—"चाकर कशाला पाहिजे? मीच जाऊन बोलावतें गाडीवाल्याला."

मीं जरा तापून म्हटलें—"एवढी उतावळ कां? मला प्रथम केशवरावांस त्यांच्या मुलांसह येथें बोलावून आणावयाचें आहे. त्यांचीं मुलें नीरोगी आणि गुबगुबीत आहेत; त्यांस बरोबर देवीखान्यांत नेऊन, त्यांच्या दंशीनें आपल्या बाळयाला टोंचवावयाचा माझा विचार आहे, समजलीस? बाळयाची तुला काळजी आहे आणि मला नाहीं असें कांहीं नाहीं!" हे शब्द ऐकून ती बापडी निमूट बसली.

आम्हा उभयतांसही अत्यंत प्रिय अशा या आपल्या मुलाच्या प्राणसंरक्षणार्थ माझ्या प्रियेनें किती किती काळजी दाखविली, किती किती घाई केली, मृदु शब्दांनीं माझें मन वळविण्याचा कसकसा यत्न केला, याविषयींची ही हकीगत मीं वर जाणून बुजून इत्थंभूतच लिहिली आहे. कारण तसें केल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. ही हकीगत सांगतांना, माझी छाती जरी धडधडत आहे, कंठ

जरी भरून आला आहे, आणि कानशिलें जरी तापून गेलीं आहेत, तरी माझ्या प्रियेची वागणूक किती सावधगिरीची होती आणि तिचा शब्दन शब्द किती खरा होता, हें या हकीगतीवरून ढळढळीत दिसून येणार असल्यामुळें, माझ्या मनाला एक प्रकारचा संतोषच होत आहे. मी येथें स्पष्टपणें म्हणतों कीं मी जरी तिच्यावर तापलों होतों, तरी त्यांत तिची कांहीं एक चूक नव्हती, सर्व चूक माझी होती–सर्व अपराध माझ्या एकट्याचा होता. त्याचें प्रायश्चित्त मला भोगावें लागणें योग्य होतें. माझ्या मागें तिनें एवढी टोंचणी लाविली असतां आणि एवढी उतावीळ मांडली असतांही, म्यां चांडाळानें आणखी दोन तास शुष्क वाचण्यांत खुशाल वायां दवडले आणि या दोन तासांकरितां आपला सर्वस्वी घात करून घेतला !

खरोखर, आरोग्य आणि रोगित्व, सुख आणि दुःख, नफा आणि तोटा, जीवित आणि मरण, यांपैकीं कोणतीही निकराची एक गोष्ट घडून येणें, हें केवळ थोड्या वेळाचें काम आहे. अंमळ पांच मिनिटें अलीकडे पलीकडे झाल्यानें, कोणतेंही काम कसें बिघडतें याचें हें ढळढळीत उदाहरण माझ्या पुढील हकीगतीवरून वाचकांस मिळेल, तें पहा !

पुस्तकालयांत पाठविलेला चाकर पुस्तक घेऊन आला, त्याला दोन तास लागले. लगेच मीं त्याला केशवरावाकडे पाठविलें. परंतु तो जाऊन पोंचण्यापूर्वीं पांचच मिनिटें अगोदर केशवराव आपल्या दोघा मुलांसह हवा खाण्याकरितां बाहेर निघून गेले होते. माझा मनुष्य सांगीप्रमाणें बोलावूं येईल म्हणून त्यानें पुष्कळ वाट पा-

हिली, अखेरीस ते निघून गेले. असा चाकरानें निरोप आणला. अर्थात देवीखान्यांत जाण्याचा माझा बेत त्या दिवशीं मला रहित करावा लागला. मी म्हटलें–" आज नाहीं, बाळयाला देवीखान्यांत उद्यां नेऊं."

इतक्यांत एक मनुष्य मजकडे आला, आणि आमच्या पुस्तकालयांत एक शिपायाची जागा रिकामी झाली होती, ती आपल्यास मिळावी म्हणून विनंती करूं लागला. त्या वेळीं माझा मुलगा तेथेंच खेळत होता. मला आतां पुरें आठवतें कीं तो त्याला फारच लगटून कांहीं खोड्या करीत होता व त्याच्या अंगांतल्या कोटाचीं भुतावें व त्यावरील कुत्र्याचीं डोकीं मोजीत होता. मीं त्या मनुष्याशीं सुमार अर्धा तास कांहीं विचारपूस केल्यावर, त्याला म्हटलें "ठीक आहे; उद्यां पासून नोकरीवर येतर." तो म्हणाला–" माफ करा. मी पुढील आठवड्यांत रुजू होईन. कारण माझा एक मुलगा देवींनीं हैराण आहे !"

माझ्या पोटांत धस्स झालें. पुढें काय होणार, त्याचें, जाणों, भयप्रद चित्र चटकन माझ्या डोळयांपुढें उभें राहिलें. खाडकन मी बसल्या जागीं उभा राहिलों, आणि त्या मनुष्यावर चवताळून, त्यास हाकलून देण्याकरितां म्हणून धावलों. गरीब बिचाऱ्या माझ्या मुलाला वाटलें कीं, मी आतां या मनुष्याला ठोकणार. म्हणून 'बाबा मारूं नका, मारूं नका' असें ओरडत तो मध्यें घुसला. त्या मनुष्याशीं मुलाची फारच लगट झाली. तेणेंकरून मला अधिकच संताप आला. तो मनुष्य तर बापडा घाबरूनच पळून

गेला. आणि अधिक स्पर्श होऊं नये म्हणून मीं बळानें बाळाला मागें ओढलें. मीं बाळाचा गाल धरला, परंतु त्या वें चुंबन घेण्याच्या इच्छेनें नव्हे बरें ! कारण मला या वेळीं इतका त्वेष आला होता कीं मी जाणों त्याचा प्राण घेणारा आहें असेंच मला भासलें ! गरीब बापडा बाळ माझ्या हातून सुटला, तो रडत रडत आईकडे गेला !

त्याच रात्रीं माझ्या मुलाला सपाटून ताप भरला. मला वाटलें कीं मी रागें भरलों त्या भीतीमुळें आला असेल. परंतु सकाळीं पाहतों तों त्याच्या शरीरावर देवीच्या उगवणाचीं सर्व चिन्हें दिसूं लागलीं. यापुढील सविस्तर प्रकार माझ्यानें लिहवत नाहीं. उगवण जोराचेंच झालें, देवी सडकून आल्या, वेदना फार झाल्या, आणि आठ दिवसपर्यंत मुलागा आईच्या मांडीवर पडून राहिला ! शेवटीं आठवे दिवशीं तिसरे प्रहरीं मांडीवरचे मांडीवर त्यानें प्राण सोडला ! हा एक ग्रंथ संपला !

या आठ दिवसांत माझ्या प्रियेला किती त्रास पडला, आणि किती काळजी वहावी लागली, त्याची कल्पना करतां येणें कठीण आहे. आमचे वात्रा वारून, संसाराचें ओझें आमच्या शिरीं आल्या वेळेपासून जीं जीं संकटें आणि ज्या ज्या विपत्ति आम्हांवर आल्या, त्यांच्या योगानें तिची प्रकृति अगोदर फारच नाजुक झाली होती; तशांत हा शेवटचा धक्का बसल्यानें तर तिची पुरती दुर्दशा उडाली. माझ्या संगतींत तिनें दुर्लौकिक, दारिद्र्य, हालअपेष्टा, इष्टमित्रांचा वियोग हीं सर्व निमूटपणें धैर्यानें सोसलीं. परंतु या शेवटच्या घाल्यापुढें तिचा टिकाव निघणें कठीण झालें.

धन्य तिची आणि तिच्या लोकोत्तर धैर्याची ! दुःखाचा एवढा डोंगर कोसळला असतां, आकाश कडकडून पडलें असतां, आणि दशदिशा गिळावयास निघाल्या असतां नाहीं, या वेळीं तिनें आपलें सगळें दुःख सोसकपणानें गिळिलें; शोकाचा चकार शब्दही तोंडा वाटे काढला नाहीं. तथापि तिचें बोलणें या वेळेपासून केवळ परिमित झालें, कशावरही तिची प्रीति राहिली नाहीं, असें स्पष्ट दिसून आलें. आणि यांरोबरच तिची प्रकृति दिवसें दिवस अधिक क्षीण होत गेली. तिला बरें वाटेना म्हणून मीं पुष्कळ उपाय केले. राहण्याचें ठिकाण बदललें. तिच्या मनाप्रमाणें वागूं लागलों. काय काय पाहिजे तें तें पुरवूं लागलों. आणि समाधानाच्या गोष्टी सांगून तिच्या मनाला आश्वासन देऊं लागलों. औषधपाण्याची उणीव नव्हती. चाकर माणसांचीही कमताई नव्हती. परंतु व्यर्थ, तिची क्षीणता वाढतच गेली आणि अखेरीस या क्षीणतेनें दुखण्याचें भयप्रद स्वरूप घेतलें !

माझें मन कामकाजावरून अगदीं उडालें. पुढें काय करावें हें मला कांहीं सुचेना. इतर सर्व काळज्या दूर झाल्या, परंतु माझ्या स्त्रीच्या प्रकृतीची नवी काळजी उभी राहिली. तीपुढें रात्रंदिवस स्वस्थ झोंपही मिळेनाशी झाली. मग एके रात्रीं, चाकरमाणसांची निजानिज झाल्यावर तळमजल्यावरील स्वैंपाकघरांतली कांहीं वस्तु मला हवी लागली. म्हटलें, माणसांना कशाला उठवा, आपणच घेऊन येऊं ! म्हणून मेणवत्तीचा तुकडा हातीं घेऊन स्वैंपाकघरांत गेलों. तेथें दोन्ही हात गुंतल्यामुळें एका लाकडाच्या

तुकड्यावर मेणबात जळत टेकून ठेवून, नुसता वर आलों; तो तसाच तिला मात्रेचीं दोन बोटें चाटवून अंथरुणावर डोळे मिटून पडलों. पडलों मात्र, तों आमच्या घराच्या तळमजल्या-वरच चाकरांस राहण्याची जागा होती, तेथून आग लाग-ल्याची आरोळी माझ्या कानीं आली. मी दचकून जागा झालों. तत्क्षणीं बाहेर जमा झालेल्या लोकांचा मोठा गलबला ऐकूं आला. आणि खिडकी उघडून पाहतों तों घराच्या मागच्या अंगाला आगीच्या ज्वाळा दृष्टीस पडल्या. चटकन मला संशय आला कीं माझ्या हयगईचा तर हा परिणाम नसेलना ?

“ हाय हाय ! घात झाला ! ” असें म्हणत म्हणत व खडाखड दरवाजे उघडीत मी खालीं गेलों आणि एका मनुष्यास बरोबर घेऊन वर आलों. माझी स्त्री ग-लबल्यानें जागी होऊन बिछान्यावर उठून बसली. परंतु घराला आग लागल्याची वार्ता कानीं पडतांच तिनें धाडकन आंग टाकलें, ती पुनः उठली नाहीं. मग त्या मनुष्याकडून मी तिला तशीच एका स्नेह्याकडे सुरक्षित जागीं नेऊन ठेवलें. या वेळीं ती बापडी शुद्धीवर सुद्धां नव्हती; थोड्याच वेळांत ती निचेष्ट पडल्याची खबर मला समजली !

मध्यंतरीं मी परत आपल्या घरीं आलों. कपा-टामध्यें दोन हजारांच्या नोटी ठेवल्या होत्या, त्यांची मला मोठी काळजी होती. ही रक्कम कोणीं संस्थानिकानें आमच्या पुस्तकालयाला देणगी म्हणून दिली होती, ती, चार पांच दिवस झाले, माझ्या हातीं आली. नियमा-प्रमाणें ही रक्कम दुसरेच दिवशीं पुस्तकालयाच्या खातीं

च्यां क्षेमध्यें भरणा करावयाची; परंतु माझ्या स्त्रीच्या दुख-ण्यामुळें–अथवा कोणतीही गोष्ट उद्यांवर ढकलण्याच्या माझ्या द्वाड खोडीच्या प्रभावामुळें असेंच म्हटलें पाहिजे— मीं तें लांवणीवर टाकलें. मी परत आलों आणि पाहतों तों माझें राहतें घर जळून खाक झालें. अर्थात सर्व चिज वस्त जळून गेली; कवडी सुद्धां हातीं लागली नाहीं. मग पुस्तकालयाच्या रकमेची गोष्ट कशाला ? '

मुलगा गमावला, स्त्री मरण पावली, घरदार जळालें, लोककार्याच्या नुकसानीचें अपेश पदरीं आलें, हा सर्व प्रकार ध्यानांत येऊन, या वेळीं माझ्या मनाची काय स्थिति झाली असेल, तिची, करतां आली तर, आतां वाचकांनींच कल्पना करावी; मला तर ती सांगतां येत नाहीं. एवढी मात्र गोष्ट खरी कीं, मी या वेळीं ज्या स्थितींत होतों, तिच्याहून अधिक दुर्धर, अधिक भयंकर, किंबहुना एवढी प्रळयकर स्थिति जगांत कधीं कोणास प्राप्त झाली असेल आणि होईल असें वाटत नाहीं !

सर्वस्वाचा नाश झाल्यावर, आतां जगांत राहून कर्तव्य काय, असा प्रश्न हजार वेळां माझ्या मनांत आला असेल. तथापि प्राप्त झालेल्या स्थितीस पाठ देऊन मी आयुष्याचे दिवस कसे तरी ढकलूं लागलों. मग एके दिवशीं विचार केला कीं चालढकल करून **आजची गोष्ट उद्यांवर** लोटण्याच्या द्वाड खोडीनें ज्यापक्षीं माझा एवढा नाश केला, त्यापक्षीं ही माझी '**उद्यांवरची गोष्ट**' एकदा लिहून काढावी. आणि स्वोदाहरणावरून तिचीं कडू फळें कशीं असतात हें स्पष्टपणें लोकांस दाखवावें.

असें म्हणून आरंभीं म्हटल्याप्रमाणें तीं मी लिहावयास बसलों. आपल्या हातें ही गोष्ट शेवटास जाते किंवा कसें या विषयीं माझें मन पहिल्यापासून साशंकच होतें. तथापि पुरी झाल्यास ठीकच आहे; न झाल्यास, ती पुरी करून लोकोपयोगार्थ छापून प्रसिद्ध करणारा कोणीही माझा मित्र उभा राहील असा भरंवसा धरून, मीं आरंभ केला आणि आपली हकीगत येथवर लिहीत आणली.

यापुढें माझ्या या हकीगतींत सांगण्यासारखा अतिभयंकर आणि केवळ असामान्य असा एक प्रसंग मजवर येऊन गुजरला तो येथें लिहावयाचा आहे. त्याच्याकडे आतां वाचकांनीं अवधान द्यावें. ही हकीगत लिहून काढीत असतां असतांनाच जी एक गोष्ट मनांत आली तिच्या योगानें हा प्रसंग.—

*　*　*　*　*　*　*

# प्रकरण ८ वें.

## कर्त्याचे बोल.

आतां तरी येथें हाच उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥
सकाळांच्या पायां माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥

तुकाराम.

मागील प्रकरणांत शेवटीं म्हटल्याप्रमाणें, 'अति-भयंकर आणि केवळ असामान्य' असा कोणता प्रसंग कवीश्वरावर येऊन गुदरला तो निश्चयात्मक कळला नाहीं. कारण त्यानें तो कोणासही कधीं सांगितला नाहीं, किंवा ही हकीगत अपुरीच सोडून दिली असल्यामुळें त्याचा उल्लेख हिच्यामध्येंही आला नाहीं; मग तो कळणार कसा? तथापि एवढी गोष्ट खरी आहे कीं, बायकोपोराचा व घरादाराचा विध्वंस झाल्यावर, त्याचें मन फार उद्विग्न झालें होतें, आणि शेवटले कांहीं दिवस तर त्यानें पुस्तकालयांत निव्वळ एकांतीं बसून काढले. या एकांतांत तो कांहीं गुप्त हकीगत लिहिण्यांत गुतला होता असें म्हणत असत. आणि पुढें पाहतात तों लौकरच तो कोणासही न कळतां किंवा न कळवितां एकाएकीं नाहींसा झाल्याचाच बोभाटा झाला. यावरून, वरील प्रसंग काय असावा, याची अटकळ चतुर वाचकांस करतां आल्यास, त्यांनीं करावी.

कवीश्वर नाहींसा झाला तो एकाएकींच नाहींसा झाला; त्याचा मुद्दापत्ता आजपर्यंत कांहीं एक लागला

नाहीं. मात्र, मागील सात प्रकरणांत आलेल्या हकीगतीचें एक पुडकें त्याच्या लिहिण्याच्या खोलींत टेबलावर पडलेलें सांपडलें. बहुधा एकांतीं बसून त्यानें गुप्तपणें लिहिलेली ती हकीगत हीच असा अदमास होतो. ही हकीगत अपुरीच राहून गेली आहे. कदाचित् त्यानें ती ' उद्यां ' पुरी केली असती; परंतु तसा योग आजवर आला नाहीं आणि पुढें येईलसें वाटत नाहीं. यास्तव ही हकीगत, त्याच्याच इच्छेस मान देऊन, आम्ही छापून प्रसिद्ध केली आहे.

याप्रमाणें कवीश्वराची ही हकीगत येथें संपली. ती जशी आम्हास मिळाली तशीच येथें दिली आहे. ती बरीच चित्तवेधक आणि बोधपर करण्याचा प्रयत्न केला आहे; तो कितपत साधला आहे हें सांगण्याचा पतकर आम्ही घेत नाहीं; त्याचा निर्णय करण्याचें काम सहृदय वाचकांचें आहे. तथापि या पुस्तकासंबंधें कांहीं गोष्टी सांगण्यासारख्या आहेत, त्या मात्र येथें सांगतों.

आजची गोष्ट उद्यांवर लोटण्याची द्वाड खोड एकदा लागली म्हणजे तिच्यापासून कसे दुःखप्रद प्रसंग ओढवतात हें मुख्यत्वें करून या पुस्तकांत सांगण्याचा उद्देश आहे. या खोडीचे पर्याय अनेक आहेत. हयगय करणें, आळस करणें, घमेंडीनें अव्यवस्थित राहणें, टापटीप न ठेवणें, बेताल वागणें इत्यादि प्रकार या खोडींतच मोडतात. म्हणून यांत प्रसंगानुरोधानें निरनिराळ्या शब्दांची योजना केली आहे; तथापि या सर्वांचा रोख एका मुख्य गोष्टीकडेसच आहे, हें सहज लक्षांत येईल.

ही हकीगत लिहितांना, आपलें सविस्तर चरित्र सांगावें असा कवीश्वराचा हेतु नव्हता; तर ज्या द्वाड खोडीचीं फळें त्याला एवढीं भोगावीं लागलीं, तिला अनुलक्षून, आपल्या चरित्राचा जेवढा भाग सांगणें योग्य वाटलें तेवढाच त्यानें येथें सांगितला आहे. यावरून ही हकीगत अपुरी व एकदेशीय आहे असें म्हणतां येणार नाहीं.

आतां, सामान्य दृष्टीनें पाहणारास ही खोड अगदीं यःकश्चित दिसेल, आणि तो म्हणेल कीं, खोड ती काय, आणि तिच्या पायीं एकाहून एक वरचढ असे बिकट प्रसंग बिचाऱ्या कवीश्वरावर ते काय गुजरतात ? हें सर्वच बिचित्र आहे ! तथापि बारकाईनें विचार केला असतां, याविषयीं एवढा अचंबा वाटण्याचें कारण नाहीं असें दिसून येईल. जसें बारिक कूस पायास रुतलें असतां वारंवार सलत असतें, आणि समयविशेषीं पाय मुरगाळण्यास आणि याहीपेक्षां अधिक दुखापतीस कारण होतें, त्याचप्रमाणें या खोडीची–या क्षुल्लक वाटणाऱ्या खोडीही गत आहे. एकदा ही खोड जडली म्हणजे ती पावलों पावलीं कशी नडते याची साक्ष, जर कोणी आपलीच वागणूक लक्षपूर्वक पाहील, तर त्यास सहज पटण्यासारखी आहे.

याच कारणामुळें, या ' उद्यांवरच्या गोष्टी 'ला एका प्रकारें सार्वत्रिक महत्व आहे असेंही म्हणतां येईल. पहा कीं जगांत कोणी कितीही बेतशीर आणि टापटिपीनें राहणारा मनुष्य असो–तरी अमुक काम आज करावयाचें असतां, उद्यांवर ठेवल्यामुळें नुकसान होऊन पश्चात्तापास कारण झालें नाहीं, असा एकही प्रसंग त्यास आ-

ठवत नाहीं असें होणार नाहीं. प्रथम आळसानें ‘ उद्यां केलें तरी चालेल ’ असें म्हणून, मागाहून नुकसान झाल्या-वर-मग तें अल्पही कां असेना-‘ अरेरे ! कालच करून टाकलें असतें तर बरें झालें असतें,’ असें हळहळण्याची पाळी अगदीं वेतशीर आणि टापटिपीच्या मनुष्यांवरही कित्येक वेळां येते ; मग सामान्य मनुष्यांची या खोडीमुळें दाणा-दाण झाली तर नवल काय ?

कित्येक वेळां असें दृष्टीस पडतें कीं अव्यवस्थित-पणें राहिल्यानें तत्काळ कांहीं नुकसान झालें नाहीं. तसेंच टापटिपीनें राहिल्यानेंही तावडतोब दिसण्यासारखा फायदाही झाला नाहीं, म्हणजे पुष्कळांस या खोडीचें फारसें म-हत्व वाटत नाहीं, एवढेंच नव्हे, तर हा केवळ दैवयोग आहे असेंही ते प्रतिपादितात. परंतु अशा कामीं आपल्या वागणुकीच्या सूक्ष्म परीक्षणाचीच जरूर आहे. त्याप्रमा प्रत्येकानें तें केलें असतां खरी स्थिति त्याच्या लक्षांत येईल

परंतु या ठिकाणीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं को णत्याही गोष्टीचा चांगला किंवा वाईट परिणाम तत्का व प्रत्यक्ष दिसतोच असा नियम नाहीं. तथापि काला तरानें व रूपांतरानें तरी ‘ बीज तशीं फळें ’ दिसतील य संशय नाहीं. आजपर्यंत आळसानें, दगगईनें, आणि अ जची गोष्ट उद्यांवर टाकल्यानें, कोणाचाही फायदा झ लेला नाहीं; नुकसान झाल्याचीं उदारणें मात्र शेकडों आढ ळतील. यास्तव आंधळ्या दैववादाच्या सांवळ्या गोंधळांत न पडतां प्रत्येकानें व्यवहारांत टापटिपीनें व वेतशीर वागून आपलें कल्याण करून घ्यावें हें योग्य आहे.

**समाप्त.**